CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | गुरुवार, २९ ऑगस्ट २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ३९ वे अंक २९९ | पाने १२ | किंमत रु. ६/- |RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



**सोलापूर** – **भवानी पेठ** – राठी सिमेंट, **नई जींदगी** – एस.ए.बडेपीर, **वि.डी घरकुल** – वैष्णवी स्टील, **न्यु पाच्चा पेठ** – हारूण स्टील, **होटगी रोड** – एम.आर.सेल्स, **शेळगी** – शहा ट्रेडर्स, **सिध्देश्वर पेठ** – बेसकर ॲण्ड कंपनी, **कुर्डुवाडी** – श्री.गणेश स्टील, **सांगोला** – महालक्ष्मी स्टील सेंटर, **माढा** – तांबोळी स्टील ॲण्ड हार्डवेअर, **पिंपळनेर** – डिमांड ट्रेडर्स, **नातेपुते** – पोतेकर एंटरप्रायजेस, **पंढरपूर** – दुर्गा स्टील, **मांडवे** – बालाजी ट्रेडर्स, **टेभुंर्णी** – श्री साई ट्रेडर्स, **बार्शी** – भराडीया स्टील, **करमाळा** – शिवम स्टील, **अक्कलकोट** – माशाळे स्टील, **मोहोळ** – तलफदार स्टील, **कुरूल रोड** – श्री.भैरवनाथ स्टील ट्रेडर्स, **अकलुज** – चकेंश्वरा स्टील, **वैराग** – गांधी एजन्सी, **दहिताने** – एस. एस. मकंदर स्टील कॉर्पोरेशन, **जेऊर** – तांबोळी सिमेंट ॲण्ड मार्बल, **मरवडे** – सह्याद्री ट्रेडर्स, **मोडलिंब** – शिवाई ट्रेडर्स, **करकंब** – लक्ष्मी स्टील, **मंगळवेढा** – महालक्ष्मी ट्रेडर्स, **बेगमपूर** – सिध्दनाथ ट्रेडर्स, **वेळापूर** – रॉयल बिल्डींग सोल्युशन, **टाकळी** – गुरूकृपा ट्रेडर्स, **कंदलगाव** – श्री.केदारेश्वर हार्डवेअर ॲण्ड सिमेंट, **मुळेगाव** – आदित्य ट्रेडर्स, **महुद** – शेवाळे हार्डवेअर, **हुन्नूर** – लक्की ट्रेडर्स, **साळमुख** – त्रिमूर्ति स्टील, **माळसिरश** – अभिनंदन टाईल्स्, **मैंदर्गी** – खलील ट्रेडर्स, **वसंत विहार** – पूजा स्टील, **श्रीपुर** – शक्ती स्टील अँड किसान मॉल, **भोसे (क)** – पटेल स्टील, **कुरुल** – जगदंबा हार्डवेअर, **सोड्डी** – ओम ट्रेडर्स, **तडवळ** – स्वामी समर्थ ट्रेडर्स, **टाकळी सिकंदर** – लक्ष्मी टाईल्स, **नारखेड** – राहुल एंटरप्रायझेस.

आयकॉन स्टील
टीएमटी बार

विनम्र अभिवादन



नरकेसरी बॅरिस्टर मो. वा. अभ्यंकर यांची आज जयंती

# 'बस्स...आता खूप झाले...भीती वाटतेय्'

## महिला अत्याचारावर राष्ट्रपतींच्या उद्विग्न भावना

◆ **नवी दिल्ली, २८ ऑगस्ट**

कोलकाता येथील महिला प्रशिक्षणार्थी डॉक्टरवील अत्याचार आणि हत्येच्या घटनेचे देशभरात संतप्त पडसाद उमटत असताना, आता अशा घटनांबाबत थेट राष्ट्रपतींनीही आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. महिलांना शक्तिहीन, असमर्थ आणि निर्बुद्ध समजणाऱ्या मानसिकतेवर प्रहार करीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशातील महिला अत्याचाराच्या घटनांवर तीव्र उद्विग्नता व्यक्त केली आहे. आता बस्स झाले. महिलांविषयी अत्याचाराच्या घटनांची तीव्रता आता अस्वस्थ करू लागली असून, निराशा आणि भयभीत झाल्यासारखे वाटत आहे, असे राष्ट्रपती म्हणाल्या.



वृत्तसंस्थेसाठी लिहिलेल्या एका लेखात राष्ट्रपती म्हणतात, कोलकाता येथे प्रशिक्षणार्थी डॉक्टरबाबत घडलेली ९ ऑगस्टची बलात्कार आणि हत्येची घटना अतिशय भीषण आहे. अशा घटनांची मालिका घडणे अतिशय खेदजनक आणि निराश करणारे आहे. कोणताही सुशिक्षित, सभ्य समाज महिला, मुलींबाबतच्या अशा प्रकारांना सहन करू शकत नाही. समाजाला प्रामाणिक, निष्पक्षपाती आत्मनिरीक्षणाची आणि स्वत:ला काही कठोर प्रश्न विचारण्याची गरज आहे.

**समाजाला स्वत:ला अवघड प्रश्न विचारावे लागतील**

महिला सशक्तीकरणात आपल्या मागील यशाबद्दल मी सकारात्मक आहे. भारतातील महिला सक्षमीकरणाच्या अद्भुत प्रवासाचे मी स्वत:ला एक उदाहरण मानते. रक्षाबंधनाला मी शाळकरी मुलांना भेटले. त्यांनी मला विचारले की, निर्भयासारखी प्रकरणे पुन्हा होणार नाहीत, याची खात्री देऊ शकता का? मी त्यांना सांगितले की, प्रत्येकाने स्वरक्षण आणि मार्शल आर्ट्‌सचे प्रशिक्षण घेणे महत्त्वाचे आहे, विशेषत: मुलींनी, जेणेकरून त्या बलवान बनू शकतील.

**निर्भया प्रकरणाचा उल्लेख**

दिल्लीतील निर्भया प्रकरणाचा दाखला देत राष्ट्रपती लिहितात, निर्भयाच्या घटनेनंतर आपल्याला सामूहिक स्मृतिभ्रंश झालेला दिसत आहे. अशा घटना विसरण्याची समाजाची सवयच मुळात घृणास्पद आहे. त्या प्रकरणानंतर १२ वर्षांत असंख्य बलात्कार झाले, ज्यांना समाज विसरला आहे. आता भारताला इतिहासाला सामोरे जाण्याची वेळ आली आहे. कोलकात्यात एकीकडे आंदोलन सुरू असताना, गुन्हेगार इतरत्र पीडितांना शोधत होते. बालवाडीतील मुलींचाही बळींमध्ये समावेश होता. ◂(वृत्तसंस्था)

### भूतकाळातील चुकांमधून शिकले पाहिजे

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या की, समाज शहामृगाप्रमाणे वाळूत डोके लपवतो. आता वेळ आली आहे की, आपण केवळ इतिहासाला धैर्याने सामोरे जाऊ नये, तर आपल्या आत्म्यात डोकावून महिलांवरील गुन्ह्यांची मानसिकता समजून घेण्याचा प्रयत्न करूया. पीडितांच्या स्मृतीचा सन्मान केला, तरच आपण हे करू शकू. समाजाने पीडितांचे स्मरण करण्याची संस्कृती निर्माण केली म्हणजे आपण कुठे चुकलो, ते आपल्या लक्षात येईल आणि हे लक्षात ठेवून आपण भविष्यात सजग राहू शकू.

## सरसंघचालकांच्या सुरक्षेत वाढ



◆ **नवी दिल्ली, २८ ऑगस्ट**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली आहे. केंद्रीय गृहमंत्रालयाने हा निर्णय घेतला.

सरसंघचालकांना केंद्र सरकारची झेड प्लस सुरक्षा होती, आता त्यात वाढ करून ॲडव्हान्स सिक्युरिटी लाइजन दर्जाची सुरक्षा देण्यात आली, अशी माहिती गृहमंत्रालयातील सूत्रांनी दिली. काही राज्यांमध्ये डॉ. मोहनजी भागवतांच्या सुरक्षेत त्रुटी पाहायला मिळाल्या. त्यामुळे गृहमंत्रालयाने हा निर्णय घेतला. ◂(वृत्तसंस्था)

### ▶▶ महत्त्वाचे...


#### मविआचे नेते ५ सप्टेंबरला सांगलीत

**मुंबई** : काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांच्यासह महाविकास आघाडीचे प्रमुख नेते ५ सप्टेंबरला सांगली जिल्ह्यातील कडेगाव येथे येणार आहेत. दिवंगत डॉ. पतंगराव कदम यांच्या पुतळ्याचा अनावरण सोहळा या दिवशी होणार आहे. यावेळी कडेगावमध्ये भव्य मेळावा पार पडणार आहे. यातूनच मविआचे नेते विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचे रणशिंग फुंकणार असल्याचे समजते. या कार्यक्रमासाठी राहुल गांधी यांच्यासह मल्लिकार्जुन खडगे, रद पवार, उद्धव ठाकरे आदी उपस्थित राहणार आहेत.

#### भारतीय नागरिकत्व मिळवणारा पहिला पाकिस्तानी ख्रिश्चन

**पणजी** : गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी बुधवारी नागरिकत्व दुरुस्ती कायद्यांतर्गत ७८ वर्षीय पाकिस्तानी ख्रिश्चनाला भारतीय नागरिकत्व प्रमाणपत्र सुपुर्द केले. किनारी राज्यातील अशी पहिलीच व्यक्ती आहे. जोसेफ फ्रान्सिस परेरा मुक्तीपूर्वी गोव्यातून पाकिस्तानला शिक्षणासाठी गेले आणि त्यानंतर त्यांनी तिथे नोकरी केली आणि पाकिस्तानचे नागरिकत्व प्राप्त केले. २०१३ मध्ये भारतात परतण्यापूर्वी ते कराचीमध्ये राहत होते.

## महाराष्ट्राच्या जनतेची माफी मागतो



### अजित पवारांनी हात जोडले

◆ **लातूर, २८ ऑगस्ट**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा दुर्घटनेवरून मी राज्यातील १३ कोटी जनतेची माफी मागतो. या दुर्घटनेतील दोषींची मुळीच गय केली जाणार नाही असा शब्द मी आज तुम्हाला देत आहो, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बुधवारी सांगितले.

लातूर येथील जनसन्मान यात्रेत अजित पवार म्हणाले, महाराजांचा पुतळा वाऱ्यामुळे पडला. या प्रकरणी दोषींवर कारवाई करण्यात येणार आहे. उपमुख्यमंत्री म्हणून राज्यातील १३ कोटी लोकांची मी माफी मागतो. या पुतळ्याचे काम चांगले व्हायला हवे होते, हे सर्व लोक राष्ट्रनिर्मिती करण्यात अग्रेसर राहिले आहेत. त्यांचे विचार कायमच आपणास प्रेरणा देत असतात. आज मी शब्द देतो की, अशी चूक पुन्हा होऊ नये यासाठी काम करणार आहे.

**मोटर सुरू करा, मागचं बिल विसरा**

मी कधीही विरोधकांवर टीका केली नाही, आम्ही फक्त काम करतो. शेतकऱ्यांचे १५ हजार कोटींचे वीज बिल माफ केले. शेतकऱ्यांनी आता फक्त मोटर सुरू करायची, मागच्या वीज बिलाचा विचार करायचा नाही, बाकी मी पाहतो, असे म्हणत अजित पवार यांनी वीज बिल माफी केल्याची माहिती दिली. ◂(वृत्तसंस्था)

# राजकोट किल्ल्यावर ठाकरे-राणे गटांत राडा

## प्रचंड हाणामारी, काही पोलिस जखमी ● नुकसान झाले किल्ल्याचे

◆ **सिंधुदुर्ग, २८ ऑगस्ट**

छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळण्याच्या घटनेनंतर अवघ्या शिवप्रेमींमध्ये संतापाची लाट पसरली असतानाच आज राजकोट किल्ल्यावर राजकीय महानाट्य पाहायला मिळाले. अभूतपूर्व असा राडा ठाकरे गट आणि भाजपामध्ये राजकोटच्या पवित्र भूमीत झाला. पुतळा कोसळल्यानंतर प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी खासदार नारायण राणे आणि काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार पोहोचले. त्याचवेळी आदित्य ठाकरे तिथे पोहोचल्यानंतर अभूतपूर्व असा राडा झाला. दोन्ही गटाकडून अर्वाच्च भाषेत हिणवण्याचा प्रयत्न झाला. अंगार, भंगार, पेंग्विन ते कोंबड्या आणल्या नाहीत, अशा पद्धतीने दोन्ही गटाकडून घोषणाबाजी करण्यात आली.

राजकोट किल्ल्यावर आदित्य ठाकरे आणि नारायण राणे यांनी आव्हान-प्रतिआव्हान दिल्याने तणावाची परिस्थिती निर्माण झाली. जयंत पाटील यांनी मध्यस्थी करून समजवण्याचा प्रयत्न केला. मात्र, आम्ही स्थानिक आहे, पहिले त्यांना मागच्या दाराने जायला सांगा, अशी भूमिका निलेश राणे यांनी भूमिका घेतली. यावेळी जयंत पाटील यांनी तुम्ही गेलात की ते १० मिनिटांत जातील असे सांगितले. आदित्य ठाकरे यांनीही मुख्य रस्त्यानेच जाणार, असा आक्रमक पवित्रा घेतल्याने तणाव निर्माण झाला. यादरम्यान राणे आणि ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी झाली. दोन गटाच्या राड्यात किल्ल्याचे नुकसान झाले आहे.

आंदोलकांनी किल्ल्याच्या भिंतींवर चढून घोषणाबाजी केली. यावेळी झालेल्या हाणामारीत पोलिस कर्मचारी जखमी झाले. दोन्हा गटांच्या कार्यकर्त्यांना पोलिसांनी समजवण्याचा प्रयत्न केला. मात्र, दोन्ही गट आपल्या भूमिकेवर ठाम राहिले.

छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळणे ही दुर्दैवी घटना आहे. याप्रकरणी संबंधित मंत्र्यांवरही गुन्हा दाखल झाला पाहिजे. जगभरात समुद्र किनाऱ्यावर अनेक पुतळे आहेत. कामात हलगर्जीपणा करणारे शिल्पकार जयदीप आपटे कुठे आहेत? त्याला येथून पळून जायला कोणी मदत केली आहे का, या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळायला पाहिजे. जे काही घडेल त्याला फडणवीस जबाबदार आहेत, असे आदित्य ठाकरे म्हणाले. ◂(वृत्तसंस्था)

### सरकार शिवद्रोही : उद्धव ठाकरे

राजकोट येथे मोदी-शाह यांच्या दलालांनी रस्ता अडवला. राज्य सरकार शिवद्रोही आहे, असा आरोप उद्धव ठाकरे यांनी मुंबईत पत्रपरिषदेत केला. माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचे कार्यालय समुद्रकिनारी होते. पण, त्यांची कधी टोपी उडाली नाही. यांचे मंत्री म्हणतात, हवेने पुतळा पडला, असा टोला ठाकरे यांनी लगावला.



# देशभरात रेल्वेवर हल्ले घडवणार

## रामेश्वरम् कॅफे बॉम्बस्फोटाच्या सूत्रधाराची धमकी

**नवी दिल्ली, २८ ऑगस्ट**

बंगळुरू येथील रामेश्वरम् कॅफे बॉम्बस्फोट प्रकरणातील सूत्रधाराची एक चित्रफीत समोर आली आहे. या चित्रफितीत दहशतवादी फराहतुल्लाह घोरी हा भारतातील स्लीपर सेलला दिल्ली, मुंबईसह देशभरातील रेल्वेवर हल्ले करण्यास सांगत आहे. ही चित्रफीत समोर आल्यानंतर भारतातील गुप्तचर संस्था हाय अलर्टवर आहेत.

घोरी हा फरारी जिहादी असून, सध्या तो पाकिस्तानात आहे. त्याने बंगळुरूच्या रामेश्वरम् कॅफेमध्ये स्लीपर सेलद्वारे पाकिस्तानी गुप्तचर संस्था आयएसआयच्या पाठिंब्याने स्फोट घडवून आणला होता. १ मार्च रोजी रामेश्वरम् कॅफेतील बॉम्बस्फोटात किमान १० लोक जखमी झाले होते. एनआयएने ३ मार्च रोजी या प्रकरणाचा तपास सुरू केला होता. १२ एप्रिल रोजी अब्दुल मतीन अहमद ताहा आणि मुसावीर हुसेन शाजीब या दोन प्रमुख आरोपींना अटक केली होती. ताहा हा या प्रकरणाचा सूत्रधार असून, शाजिबने रामेश्वरम् कॅफेमध्ये आयईडी ठेवल्याचा आरोप आहे. त्यांना कोलकाताजवळील एका लॉजमधून अटक करण्यात आली होती. हे दोघे कर्नाटकातील शिवमोग्गा येथील इसिसच्या मॉड्युलचे कथित सदस्य आहेत. याच मॉड्युलचा सदस्य असलेल्या शारिकने नोव्हेंबर २०२२ मध्ये मंगळुरूमध्ये स्फोट घडवून आणला होता. या प्रकरणाचा सूत्रधार घोरी हा भारतीय तपास एजन्सींच्या रडारवर आहे. त्याच्या ३ मिनिटांच्या चित्रफितीत भारतातील रेल्वे नेटवर्कमध्ये अडथळा आणून घातपात घडविण्यासाठी तो स्लीपर सेलला कॉल करीत असल्याचे दिसते.

# १२ शहरांतील इंडस्ट्रियल स्मार्ट सिटी प्रकल्पाला मंजुरी

## महाराष्ट्रातील दिघी बंदराचा समावेश

**नवी दिल्ली, २८ ऑगस्ट**

इंडस्ट्रियल कॉरिडॉर डेव्हलपमेंट योजनेंतर्गत देशातील १२ शहरातील इंडस्ट्रियल स्मार्ट सिटी प्रकल्पाला आज केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. यात महाराष्ट्रातील दिघी बंदराचा समावेश आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. नॅशनल मीडिया सेंटरमध्ये आयोजित पत्रपरिषदेत माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी या निर्णयांची माहिती दिली. या १२ शहरांतील औद्योगिक प्रकल्पांसाठी २८,६०२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, हे सर्व प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर यात एकूण १५ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे. भारताच्या ग्लोबल व्हॅल्यू चेनची स्थिती मजबूत करण्यासाठी सरकार स्मार्ट इंडस्ट्रियल सिटीतील विकसित जमीन गुंतवणूकदारांना त्यांच्या प्रकल्पांसाठी उपलब्ध करून देईल. या सर्व प्रकल्पांतून मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होणार असल्याचा दावा वैष्णव यांनी केला. १० राज्यांत १२ स्मार्ट इंडस्ट्रियल सिटी विकसित केल्या जाणार असून, ६ मुख्य कॉरिडॉरही तयार केले जाणार आहेत. महाराष्ट्रातील दिघी बंदरावर, उत्तराखंडमधील खुरपिया, केरळमधील पलक्कड, बिहारमधील गया, तेलंगणात जहिराबाद, राजस्थानमध्ये जोधपूर पाली, उत्तरप्रदेशात आग्रा आणि प्रयागराज तसेच आंध्रप्रदेशमध्ये ओरवक्कल व कोपारत्थी या ठिकाणी इंडस्ट्रियल स्मार्ट सिटी राहणार आहेत.

## बंगाल बंद विरोधातील याचिका फेटाळली

**कोलकाता** : भाजपाने पुकारलेल्या १२ तासांच्या बंदच्या विरोधात दाखल करण्यात आलेली जनहित याचिका कलकत्ता उच्च न्यायालयाने बुधवारी फेटाळली.

उच्च न्यायालयात वकील असलेल्या संजोय दास याने, हा बंद बेकायदेशीर घोषित करावा, अशी मागणी याचिकेतून केली होती. दासला कोणतीही जनहित याचिका दाखल करण्यास कायमची मनाई करण्यात आली आहे. त्यामुळे त्याची याचिका फेटाळली जात आहे, असे मुख्य न्यायाधीश टी. एस. शिवाग्ननम् प्रमुख असलेल्या खंडपीठाने सांगितले. दास याने याचिकेत स्वतःबद्दल खोटे निवेदन दिले. त्याने पोलिसांच्या निष्क्रियता आणि अती सक्रियतेच्या प्रकरणांबाबत सुनावणी करणाऱ्या न्यायमूर्तींच्या रोस्टरमध्ये बदल करण्याची मागणी केली होती, असे खंडपीठाने त्याची याचिका फेटाळताना म्हटले.

# भारतीयांचे आयुर्मान एक वर्षाने वाढले

## २०२२ मध्ये कण प्रदूषणात १९.३ टक्के घसरण ● नवीन अहवालातील माहिती

◆ **नवी दिल्ली, २८ ऑगस्ट**

२०२१ च्या तुलनेत कणांच्या प्रदूषणात २०२२ मध्ये भारतात १९.३ टक्क्यांनी घसरण झाली. बांगलादेशनंतर जगात नोंदवण्यात आलेली ही दुसऱ्या क्रमांकाची घसरण आहे. यामुळे प्रत्येक नागरिकाच्या आयुर्मानात सरासरी एक वर्षाची वाढ झाली आहे, असे एका नवीन अहवालात म्हटले आहे.

जागतिक आरोग्य संघटनेने (डब्ल्यूएचओ) ठेवलेल्या पीएम २.५ तीव्रता मानकाने पाच मायक्रोग्रॅम प्रती घनमीटरची पूर्तता न केल्यास भारतीयांचे आयुर्मान ३.६ वर्षांनी घटण्याची अपेक्षा आहे, असे शिकागो विद्यापीठातील ऊर्जा धोरण संस्थेने 'एअर क्वालिटी लाईफ इंडेक्स-२०२४' या वार्षिक अहवालात म्हटले आहे.



संशोधकांनी भारत आणि इतर दक्षिण आशियाई देशांमध्ये कणांच्या पातळीत घट होण्याचे श्रेय प्रामुख्याने अनुकूल हवामान परिस्थितीला दिले. यामुळे औष्णिक उलथापालथांची संख्या कमी केली आहे. २०२१ च्या तुलनेत २०२२ मध्ये भारतातील पीएम २.५ ची सांद्रता नऊ मायक्रोग्रॅम प्रती क्युबिक मीटरने (१९.३ टक्के) कमी होती. कणांच्या प्रदूषणातील सर्वात मोठी घसरण पश्चिम बंगालमधील पुरुलिया आणि बांकुरा, झारखंडमधील धनबाद, पूर्वी, पश्चिम सिंघभूम, पश्चिम मेदिनीपूर आणि बोकारो जिल्ह्यांत दिसली. या प्रत्येक जिल्ह्यांत पीएम २.५ सांद्रतेत २० मायक्रोग्रॅम प्रति क्युबिक मीटरने घसरण दिसून आली.

सर्वांत प्रदूषित असलेल्या देशातील उत्तरेच्या भागात २०२१ च्या तुलनेत २०२२ मध्ये कणांच्या प्रदूषणात १७.२ टक्के घसरण दिसून आली. मात्र, ही सुधारणा असूनही प्रदूषणाचे प्रमाण हेच राहिल्यास या भागांतील नागरिकांचे आयुर्माण सरासरी ५.४ वर्षांनी कमी होण्याची शक्यता आहे. दुसरीकडे, कणांच्या पातळीतील घट येत्या काही वर्षांत याच दराने सुरू राहिल्यास उत्तरेकडील मैदानी प्रदेशातील आयुर्मान १.२ टक्क्यांनी वाढू शकते, असे अहवालात म्हटले आहे. ◂(वृत्तसंस्था)

### महाराष्ट्र, मध्यप्रदेशावर प्रदूषणाचा सर्वाधिक दबाव

उत्तरेतील मैदानापलीकडे महाराष्ट्र, मध्यप्रदेश आणि राजस्थानात प्रदूषणाचा सर्वाधिक दबाव आहे. या राज्यांत राहणाऱ्या सरासरी २९.२३ कोटी लोकांचे आयुर्मान २.९ वर्षांनी घटत असल्याचे अहवालात म्हटले आहे.



## संक्षिप्त वृत्त

### फौजदार चावडी पोलिस ठाण्याचा पदभार अरविंद माने यांच्याकडे

**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट -**



सोलापूर शहर पोलिस आयुक्तालयातील पोलिस अधिकाऱ्यांच्या आयुक्तालयांतर्गत बदल्या करण्याचे आदेश पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी दिले आहेत. त्यानुसार फौजदार चावडी पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक पदाचा पदभार अरविंद माने यांच्याकडे देण्यात आला असून जेलरोड पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक पदाचा पदभार पोलिस निरीक्षक सुरेश चाटे यांच्याकडे देण्यात आला आहे. फौजदार चावडी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक दिलीप शिंदे यांची पदोन्नतीने पुणे ग्रामीण पोलिस मुख्यालयाच्या उपअधिक्षकपदी बदली झाल्याने त्यांना कार्यमुक्त करण्यात आले आहे. पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी आयुक्तालयातील पोलिस अधिकाऱ्यांचे बदल्या करण्याचे आदेश दिलेले आहेत.

**बदली करण्यात आलेले पुढीलप्रमाणे (कंसात कोठून ते कोठे) :** वरिष्ठ पोलिस निरीक्षक अरविंद खंडेराव माने (जेलरोड ते फौजदार चावडी पोलिस ठाणे), सुरेश सुधाकर चाटे (महिला सुरक्षा विभाग ते जेलरोड पोलिस ठाणे), धनाजी भगवान शिंगाडे (शहर वाहतूक शाखा उत्तर विभाग ते महिला सुरक्षा विभाग), सुरज गणी मुलाणी (नियत्रंण कक्ष ते शहर वाहतूक शाखा उत्तर विभाग), सहायक पोलिस निरीक्षक सारिका अनिल जगताप (विजापूर नाका पोलिस ठाणे ते सदर बझार पोलिस ठाणे).



### विद्यार्थ्यांना समान शैक्षणिक धोरणामुळे समान संधी मिळेल : डॉ. कांबळे

**सोलापूर दि. २८ ऑगस्ट-**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणअसंतुलित आहे. त्यामुळे उच्चशिक्षण हे संक्रमाणावस्थेत आहे. बहुतांशी राज्यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण स्वीकारलेले नाही. त्यामुळे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या आराखडयात समानता आल्यास विद्यार्थ्यांना सर्व क्षेत्रात समान संधी मिळतील, असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापाठातील सामाजिक शास्त्रे संकुलाचे संचालक मा. डॉ. गौतम कांबळे यांनी केले. ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयात अर्थ-वाणिज्य मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून मा. प्रा. डॉ. गौतम कांबळे विद्यार्थिनींना मार्गदर्शन करीत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. तुकाराम शिंदे होते. या कार्यक्रमाप्रसंगी व्यासपीठावर वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. डॉ. शिवानंद भांजे, प्रा. डॉ. रंजना बनसुडे, प्रा. डॉ. शंकर राजे उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. डॉ. शिवानंद भांजे यानी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. उमाशंकर नादरगी यांनी करुन दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. शंकर राजे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रा. मनोज वाघमारे यांनी मानले. या कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयातील प्रा. सुरेखा बत्तुल, प्रा. संगपाल शिंदे, प्रा. यमुना द्यावनपल्ली, प्रा. संपदा जिंदम आदी उपस्थित होते

### औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस झुआरी सिमेंट कंपनीकडून चार संगणक भेट

**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

सोलापुरातील नामवंत झुआरी सिमेंट लिमीटेड कंपनीकडून औद्योगिक प्रशिक्षण संस्था, विजापूर रोड सोलापूर येथील संस्थेस कंपनीच्या सी.एस.आर फंडातून शैक्षणिक विकास उद्देशांतर्गत अद्यावत चार संगणक भेट दिले असल्याची माहिती औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य सचिन धुमाळ यांनी दिली.यावेळी झुआरी सिमेंट लिमीटेड कंपनीचे प्लॅट हेड सुनील कक्कर, सिनियर एच. आर. शिवाजी चौगुले, सहाय्यक एच.आर. मॅनेजर अमोल जाधव, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य सचिन धुमाळ, उपप्राचार्य सुरेश भालचिम व प्रेटीस विभागाचे भिमाशंकर कोंडगुळी उपस्थित होते. आपली सामाजिक व शैक्षणिक बांधिलकी लक्षात घेऊन कंपनी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, विजापूर रोड, सोलापूर प्रशिक्षणार्थ्यांसाठी नेहमी मतद करेल असे प्लॅट हेड सुनील कक्कर यांनी सांगितले. तसेच कंपनीला इलेक्ट्रीशियन, जोडारी, मेसन, संधाता, तारतंत्री इत्यादी व्यवसायातील प्रशिक्षणार्थी शिकाऊ उमेदवारीसाठी कंपनीकडे पाठवावे असे आवाहन सिनियर एच.आर. शिवाजी चौगुले यांनी केले. यावेळी बोलताना संस्थेचे प्राचार्य धुमाळ यांनी कंपनीच्या सीएचआर फंडातून प्रशिक्षणार्थ्यांसाठी संगणक लॅब द्यावी अशी विनंती संस्थेतर्फे यावेळी केली. आभार बसवराज मोटे यांनी मानले तर सुत्रसंचलन प्रविण केंदळे यांनी केले सदर कार्यक्रमास संस्थेतील सर्व गटनिर्देशक, निर्देशक, कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.

### दाक्षिणात्य सुपस्टार देव गिल धडाकेबाज अंदाजात

**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

गेल्या अनेक दिवसांपासून देव गिल प्रॉडक्शन अंतर्गत येणाऱ्या 'अहो विक्रमार्का' चित्रपटाच्या चर्चा सुरु आहेत. दाक्षिणात्य सुपस्टार देव गिल 'अहो विक्रमार्का'च्या निमित्ताने मराठी चित्रपटसृष्टीत पदार्पण करतो आहे. या चित्रपटाच्या घोषणेनंतर चाहत्यांमध्ये 'अहो विक्रमार्का' चित्रपटाबद्दल उत्सुकता निर्माण झाली आहे. याच पार्श्वभूमीवर त्याच्या चाहत्यांनी देव गिल याचे ७५ फूटी भव्य पोस्टर बनवले आहेत. जे सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. माझ्या आजवरच्या सर्व कलाकृतीला व भूमिकांवर प्रेक्षकांनी भरभरून प्रेम केलं आहे. चाहत्यांच्या या प्रेमामुळे मी भारावून गेलो आहे. माझ्या आजवरच्या चित्रपटांना प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला आहे. 'अहो विक्रमार्का' ला सुद्धा हा प्रतिसाद मिळेल असा विश्वास व्यक्त करताना हा चित्रपट प्रेक्षकांचे जबरदस्त मनोरंजन करेल असा विश्वास देव गिल ने व्यक्त केला.या चित्रपटाचा धमाकेदार ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला असून ॲक्शन,इमोशन्स आणि ड्रामा अशा सगळा मसाला असलेला हा चित्रपट प्रेक्षकांचं 'फुल्ल ऑन' मनोरंजन करणार आहे.

## मुख्यमंत्री महिला सशक्तिकरण अभियान....

# शासकीय यंत्रणांनी जबाबदारी काटेकोरपणे पार पाडावी

### निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि. २८ ऑगस्ट-**

मुख्यमंत्री महिला सशक्तिकरण अभियानांतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा वचनपूर्ती सोहळा सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात सोलापूर येथे होत आहे. या मेळाव्यासाठी ३० ते ४० हजार महिला लाभार्थी उपस्थित राहण्याचे नियोजन केले जात आहे. हा मेळावा यशस्वी करण्यासाठी प्रत्येक शासकीय यंत्रणेने त्यांच्या वर सोपवलेली जबाबदारी अत्यंत काटेकोरपणे पार पाडावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित मुख्यमंत्री महिला सशक्तिकरण अभियान पूर्वतयारी आढावा बैठकीत उपजिल्हाधिकारी श्रीमती कुंभार बोलत होत्या. यावेळी उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर, उपजिल्हाधिकारी तथा भूसंपादन अधिकारी संतोष देशमुख, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी आर. बी. काटकर, जिल्हा परिषदेचे महिला व बाल विकास विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले, पोलीस उपाधीक्षक गृह विजया कुर्री, पोलीस उपायुक्त वाहतूक सुरेश खिरडकर, जिल्हा प्रशासन अधिकारी नगरपालिका वीणा पवार, तहसीलदार श्रीकांत पाटील यांच्यासह अन्य संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

निवासी उपजिल्हाधिकारी श्रीमती कुंभार पुढे म्हणाल्या की, माझी लाडकी बहीण योजना वचनपूर्ती सोहळा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी प्रत्येक शासकीय विभागांना जबाबदारीचे वाटप करण्यात आलेले आहे.

दिलेल्या जबाबदारी प्रमाणे सर्व संबंधित विभाग प्रमुख यांनी त्यांच्या अधिनस्त अधिकारी कर्मचारी यांच्याकडून चोखपणे काम करून घ्यावे. कोणत्याही विभागाला आपल्या कामाविषयी शंका असेल तर त्याचे निरसन तात्काळ करून घ्यावे, असेही त्यांनी सुचित केले. तहसीलदार श्रीकांत पाटील यांनी या मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी प्रत्येक विभागावर सोपवण्यात आलेल्या जबाबदारीची माहिती बैठकीत सादर केली.



# गणेशोत्सव परवान्यासाठी एक खिडकी योजना राबवावी

### सार्वजनिक मध्यवर्ती श्रीगणेशोत्सव मंडळाचे पोलीस आयुक्तांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट -**

गणेशोत्सव मंडळांना मंडप, स्पीकर, मिरवणुकीसाठी लागणारे सर्व परवाने पोलिस आयुक्तालयांने एकाच छताखाली उपलब्ध करावे अशा मागणीचे निवेदन आज सार्वजनिक मध्यवर्ती श्रीगणेशोत्सव मंडळाच्यावतीने पोलीस आयुक्त एम .राजकुमार यांना देण्यात आले. यावेळी झालेल्या चर्चे दरम्यान आयुक्तांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

याप्रसंगी उत्सव अध्यक्ष विनायक महिंद्रकर, ट्रस्टी अध्यक्ष बसवराज येरटे, ट्रस्टी सदस्य दास शेळके, माजी उपमहापौर दिलीप कोल्हे, ट्रस्टी विजय पुकाळे, अनिल गवळी, सोमनाथ मेंडके, गौरव जक्कापुरे, विजयकुमार बिराजदार, चक्रपाणी गज्जम, बाबा शेख, अभि रंपुरे, प्रशांत इंगळे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# झाडूवाले, बिगारी कामगारांसाठी स्वतंत्र आयोग स्थापन करावा

### महाराष्ट्र राज्य आरोग्य निरीक्षक संघटनेचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

झाडूवाले, गटार बिगारी, ड्रेनेज बिगारी या कामगारांसाठी लाड-पागे समिती प्रमाणेच एक स्वतंत्र आयोग स्थापन करावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य आरोग्य निरीक्षक संघटनेच्या वतीने नगर विकास विभागाच्या प्रधान सचिवांना देण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषदामधील झाडूवाले गटारबिगारी, ड्रेनेज बिगारी यांच्यासाठी लाड पागे समितीप्रमाणे स्वतंत्र आयोग स्थापन करून मलमूत्राशी निगडित काम करणाऱ्या सेवकांना न्याय द्यावा या मागणीचे निवेदन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, नगर विकास विभागाचे प्रधान सचिव यांना देण्यात आले.

यावेळी महापालिका कामगार संघटना कृती समितीचे अध्यक्ष अशोक जानराव , महाराष्ट्र राज्य आरोग्य निरीक्षक संघटनेचे अध्यक्ष शेषराव शिरसट आदी उपस्थित होते. दरम्यान, या प्रकरणी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यासाठी खा. प्रणिती शिंदे यांना निवेदन देण्यात येणार आहे, असे अध्यक्ष शेषराव शिरसट यांनी सांगितले.

# दुकानाच्या कब्जासाठी दोन गट एकमेकांना भिडले

### १५ जणांविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट -**

सोलापूर शहर आणि परिसरात सध्या भू माफीयांनी धुमाकूळ घातल्याचे चित्र दिसत असून अशातूनच बुधवारी सकाळी सात रस्ता परिसरात एका मेडीकल दुकानाच्या जागेचा कब्जा घेण्यासाठी दोन गट एकमेकांना भिडले. याप्रकरणी सदर बझार पोलिस ठाण्यात १५ जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सहायक फौजदार औदुंबर आटुळे यांना दिलेल्या फिर्यादीवरुन संजय शरदचंद्र गांधी (वय ६०), बालाजी हनमंतु सलगर (वय ४२), विशाल आनंद चंदनशिंवे (वय ३५), करण सुनिल वाघमारे (वय २४), श्रीकांत राम गांगुर्डे (वय ५२), महेंद्रसिंग माणिकसिंग चव्हाण (वय ३९), सुनिल श्रीमंत उघाडे (वय ४६), नागेश प्रकाश इंगळे (वय ४०), भिमा मऱ्याप्पा शिंदे (वय २८), राम अशोक जाधव (वय ३४), ऋषिकेश विनोद माने (वय २८), विजय जावीर गुडशेलू (वय ३३), शुभम धनराज बंगाळे (वय ३२), रोहन विजय काळे (वय २५), रजनिकांत गौतम गायकवाड (वय ३३, सर्व रा. सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल झालेल्यांमध्ये अनेकजण हे पोलिसांच्या रेकॉर्डवरील असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

सात रस्ता चौकाच्या कॉर्नरवर गोविंद मेडीकल नावाचे दुकान आहे. हे दुकान संजय गांधी व सुनिल उघाडे या दोघांमध्ये असून दुकानाच्या जागेबाबत या दोघांमध्ये वाद आहे. या वादातूनच बुधवारी सकाळी सहाच्या सुमारास सात रस्ता येथील गोविंद मेडीकल या दुकानाच्या समोर दुकानाच्या शटरला कुलूप लावण्यासाठी गांधी व उघाडे तसेच त्यांचे समर्थक एकमेकांच्यासमोर उभे ठाकले. त्यातूनच त्यांच्यात वादावादी होऊन आपापसात हाणामारी करण्यास सुरवात झाली. त्यामुळे याबाबत नियत्रंण कक्षास माहिती मिळाल्यानंतर सदर बझार पोलिसांनी घटनास्थळी येऊन दोन्ही गटातील लोकांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर गुन्हा दाखल केला. गुन्हा दाखल झाल्यानंतर सर्वांना अटक करण्यात आली असून सहायक पोलिस निरीक्षक अहिवळे पुढील तपास करीत आहेत.

**दोघांच्याही समर्थकांना पोलिसांनी चांगलेच चोपले...**

या हाणामारीबाबत पोलिसांना माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी येऊन दोन्ही गटातील लोकांना ताब्यात घेतले. या हाणामारीची माहिती वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांना मिळताच वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी येऊन समर्थकांना चांगलाच चोप दिला. त्यामुळे रस्त्यावर हाणामारी करणाऱ्यांची आता यापुढे गय केली जाणार नसल्याचे दिसून येत आहे.

# ॲड. प्रदिपसिंग राजपूत मित्र परिवारतर्फे १०१ झाडांचे वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**



सोलापूर जिल्हा सरकारी वकील व सी. बी. आय. चे वकील ॲड. प्रदिपसिंग राजपूत यांच्या मित्र परिवार तर्फे आज वृक्षारोपण करण्यात आले. ॲड. राजपूत यांनी शंभरहुन अधिक आरोपींना जन्मठेप व दोन आरोपींना फाशीची शिक्षा देऊ घातली. त्यानिमित्ताने त्यांनी शंभर सामाजिक उपक्रम करण्याचा निश्चय केला. त्याचाच एक भाग म्हणून आज वृक्षारोपण करण्यात आले.

ॲड. राजपूत मित्र परिवार यांनी १०१ झाडांचे वृक्षारोपण करण्याचे नियोजिले. त्याला सोलापूर वन विभाग यांनी सहकार्य केले. सोलापूर वन विभागाचे उपवनसंरक्षक धैर्यशील पाटील, अभियंता व पक्षिमित्र अनिल जोशी, वन अधिकारी खलाने, मदन मोरे, सुधांशू रानडे यांनी या वृक्षारोपण कार्यक्रमाचे नियोजन केले. निसर्गरम्य अश्या सिध्देश्वर वनविहार येथे वन अधिकारी सावंत यांनी सर्वांचे स्वागत केले. वृक्षारोपणची सुरुवात राजपूत वकील यांच्या हस्ते करण्यात आली. सर्व देशी प्रकारची झाडे लावण्यात आली. प्रत्येक पर्यावरण प्रेमी ने झाडे लावली. समारोप प्रसंगी वनरक्षक श्रीशैल पाटील यांनी सर्वांचे स्वागत व मनोगत व्यक्त केले.

सुधांशू रानडे यांनी पर्यावरण दिनाचे महत्त्व सांगितले, ॲड. राजपूत यांनी प्रत्येकानी वृक्ष लावलेच पाहिजे हे उद्देशून सांगितले. अनिल जोशी यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी मदन कुलकर्णी, नरहरी मुळे, आयुष शर्मा, संकल्प टाके, शुभम चव्हाण, सागर मुस्तापुरे, सुनील भराडकर आदी अनेक पर्यावरण प्रेमी तसेच वन कर्मचारी उपस्थित होते.



# वालचंद महाविद्यालयात विधी साक्षरता शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर बार असोसिएशन, सोलापूर व वालचंद कॉलेज ऑफ आर्टस अँड सायन्स यांच्या संयुक्त विद्यमाने वालचंद महाविद्यालयात विधी साक्षरता शिबीर घेण्यात आले.

या कार्यक्रमास जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव यू. पी देवर्षी, सोलापूर बार असोसिएशनचे अध्यख अँड अमित आळंगे, धम िदाय आयुक्त न्यायाधीश पी. ए कुंभोजकर, दिवाणी न्यायाधीश एस. व्ही केंदै आदी उपास्थित होते.

यावेळी बोलताना सोलापूर बारचे अध्यक्ष ॲड. अमित आळंगे यांनी हुंडा प्रथा, लिंगभेद आणि जातीभेद या सामाजिक सम स्येवर मार्गदर्शन केले. समाजाची मानसिकता बदलल्याशिवाय या समस्या समूळ नष्ट होणार नाहीत अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली. जात, धर्म, पंथ श्रेष्ठ नसून मानवता हा एकच सर्वश्रेष्ठ धर्म व प्रेम ही एकच जात अस्तित्वात हवी असे मत व्यक्त केले. त्यानंतर न्यायाधीश कुंभोजकर यांनी लैंगिक शिक्षण, लिंगभेद, स्त्रियांची सद्यस्थिती, स्त्रियांचे अधिकार आणि स्त्री विषयक कायदे, व कायदा साक्षरता यावर मार्गदर्शन केले. कायद्याची माहिती दिली.

प्रा. डॉ. कोटी यांनी अध्यक्षीय भाषणात शिस्त व सभ्य वर्तन विद्यार्थी दशेत अंगिकारली पाहिजे असे आवाहन केले. यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळातर्फे अभ्यासिका अन् वाचनालय सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**



शहरातील श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्यावतीने डाळींबी आड मैदान (इंदिरा कन्या प्रशाला) येथे नव्याने बांधण्यात आलेल्या अभ्यासिक व वाचनालयाच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून बुधवारी या नुतन इमारतीची महिलांच्या हस्ते वास्तुशांती करण्यात येऊन अभ्यासिका व वाचनालय सुरु करण्यात आले.

श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्यावतीने शिवजयंतीनिमित्त गेल्या अनेक वर्षापासून विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात. गेल्या चार वर्षापासून देशात कुठेही साजरा होत नसलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पाळणा सोहळा साजरा करण्यास सोलापुरातून महामंडळाच्यावतीने सुरुवात करण्यात आली. या महामंडळाला स्वतःच्या हक्काच्या जागेत अभ्यासिका व वाचनालय सुरु करण्यासाठी इमारत नव्हती. त्यामुळे याबाबत महामंडळाच्यावतीने प्रयत्न करण्यात येऊन डाळींबी आड मैदान येथे गेल्या एक वर्षापासून इमारतीचे बांधकाम सुरु करण्यात आलेले होते. या बांधकामासाठी आ. सुभाष देशमुख आणि शिवसेनेचे नेते मनिष काळजे यांनी जिल्हा नियोजन समितीतून ८० लाख रुपये, माजी आ. रणजितसिंह मोहिते-पाटील आणि माजी नगरसेवक विक्रांत वानकर यांच्या निधीतून प्रत्येकी १० लाख रुपयांचा निधी देण्यात आलेला आहे.

गेल्या एक वर्षापासून सुरु असलेल्या या इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले असून बुधवारी या इमारतीचा वास्तुशांतीचा सोहळा पार पडला. यावेळी पूजेसाठी श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाचे उत्सव अध्यक्ष सुभाष पवार यांनी सपत्नीक यजमानपद भूषविले. यावेळी महामंडळाच्या सर्व ट्रस्टी सदस्यांच्या पत्नींच्या हस्ते राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज आणि छत्रपती शाहू महाराज यांच्या मुर्तीची पुजा करून अभ्यासिका व वाचनालयाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष पद्माकर काळे, खासदार प्रणिती शिंदे, आ. सुभाष देशमुख, उपाध्यक्ष श्रीकांत डांगे, कार्याध्यक्ष श्रीकांत घाडगे, सचिव प्रितम परदेशी, अक्कलकोट येथील जन्मेजय भोसले, जयंत शेळके, दिलीप कोल्हे, शिवाजी घाडगे, पुरुषोत्तम बरडे, चंद्रकांत वानकर, राजन जाधव, नागेश ताकमोगे, महादेव गवळी, प्रभाकर रोडगे, विक्रांत वानकर, विनोद भोसले, ज्ञानेश्वर सपाटे, अनिकेत पिसे, बजरंग जाधव, प्रकाश ननवरे, सचिन स्वामी, देविदास घुले, भोजरंगे यांच्यासह शहराच्या विविध परिसरातील शिवजन्मोत्सव मंडळाच्या हजारो पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाला उपस्थिती लावली होती.



# आषाढी वारीचे केले उत्कृष्ट नियोजन

### रेल्वेच्या वाणिज्य विभागातील कर्मचाऱ्यांचा झाला गौरव

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दि. २८ ऑगस्ट -**

आषाढी यात्रेमध्ये उत्कृष्ट नियोजन केल्याबद्दल मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक राम करण यादव आणि सोलापूर रेल्वे विभागाचे विभागीय व्यवस्थापक नीरज कुमार दोहरे यांनी रेल्वे कर्मचाऱ्यांच्या कामाची दखल स्वतः घेत बक्षीस जाहीर करीत त्यांच्या कार्याचा गौरव केला होता.

दरम्यान त्याच पार्श्वभूमीवर सोलापूर रेल्वे विभागातील तिकीट निरीक्षक,वाणिज्य विभागातील कर्मचारी तसेच अन्य इतर कर्मचाऱ्यांना सोलापूर रेल्वे विभागाचे वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक योगेश पाटील यांनी प्रशस्तीपत्र देऊन गौरविले आहे.

सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर येथे महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश तसेच देशभरातून वारकरी मोठ्या संख्येने श्री विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी येत असतात, सालाबादप्रमाणे यंदाच्याही वर्षी सोलापूर रेल्वे विभागाने आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर उत्तम नियोजन केले होते.

रेल्वेने प्रवास करणाऱ्या भाविकांना संपूर्ण माहिती सोप्या भाषेत सांगण्याचे काम कर्तव्यावर असणाऱ्या रेल्वे कर्मचाऱ्यांनी केले. त्यामुळे भक्तगण समाधानी झाले होते. या उत्कृष्ट कार्याबद्दल रेल्वे प्रशासनाने कर्मचाऱ्यांना सन्मानित केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/




## सरपंच आंदोलनाच्या पाठिंब्यासाठी ठाकरे, पवार, पटोले आझाद मैदानावर

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि.२८ ऑगस्ट-**

ग्रामीण भागाचा कणा असलेला सरपंच हा महत्वाचा घटक आहे. त्यांच्या मागण्या म्हणजे सामान्य जनतेच्या मागण्या असतात. आमचे सरकार सत्तेत असताना या घटकासाठी अनेक लाभ मिळाले होते. भविष्यात या घटकाच्या सर्व मागण्या पूर्ण करू. असे आश्वासन देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक अध्यक्ष शरद पवार, माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे व काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी बुधवारी आझाद मैदानात येऊन सरपंच, ग्रामरोजगार सेवक, संगणक परिचालक, ग्रामविकास अधिकारी यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला.

यावेळी उध्दव ठाकरे म्हणाले, आता आमच्या हातात फक्त माईक आहे म्हणून आम्ही आता फक्त शब्द देऊ शकतो. सत्तेत आल्यावर आपल्या सर्व मागण्या मान्य पूर्ण करू. तर नाना पटोले म्हणाले, हे खोके सरकारने तुमचे भले करणार नाही. आम्ही सत्तेत आलो तर आपल्या कोणत्याच मागण्या प्रलंबित राहणार नाहीत. तर शरद पवार यांनी सांगितले की, हा घटक आहे म्हणून गावचा विकास होतो. हाच घटक जर दुर्लक्षित राहिला तर गावचा विकास कसा होईल. त्यामुळे आता या घटकाला न्याय दिल्याशिवाय राहणार नाही. मुंबईत सरपंच भवन असेल तर आम्हाला मुंबईत आल्यावर निवासाची सोय होईल. त्यामुळे सरपंच भवन बांधावे. ग्रामपंचायत करांच्या जुन्या थकबाकी साठी अभय योजना असावी. सरपंचांना विमा योजना असावी. मानधन वाढ व सभा भत्ता, १५ लाखापर्यंत विकासकामे करण्याची मान्यता इतर मागण्या यावेळी करण्यात आल्या.

# आमचा इतिहास माहित नाही का? तर एकजणही घरापर्यंत गेला नसता!

### नारायण राणे यांची आक्रमक भूमिका

**सिंधुदुर्ग, २८ ऑगस्ट-**

राजकोट किल्ल्यावर ठाकरे आणि राणे समर्थकांमध्ये जोरदार राडा झाल्यानंतर केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी पत्रपरिषदेत आपली आक्रमक भूमिका स्पष्ट केली. आम्ही काहीच केले नाही. आम्ही राजकोट किल्ल्यावर पाहणी करण्यासाठी गेलो होतो. खाली येत असताना, ते किल्ल्यावर जात होते. त्यांचे लोक आमच्या अंगावर आले. आम्हाला काही करायचे असते तर, एकही घरापर्यंत पोहोचू शकला नसता. तुम्हाला आमचा इतिहास माहिती नाही का, असे नारायण राणे यांनी म्हणाले.

आमच्यामुळे राजकोट किल्ल्यावर राडा झाला, असे आदित्य ठाकरे म्हणतात. पण, राड्यामुळेच शिवसेना नावारूपाला आली, तेव्हा आदित्य ठाकरे शेंबडा होता, उद्धव ठाकरेंना काही माहिती नव्हते, असे नारायण राणे यांनी स्पष्ट केले. उद्धव ठाकरे आम्हाला शिवद्रोही म्हणतात. त्यांच्यासाठी शिवसेनेच्या जन्मापासून छत्रपती शिवाजी महाराज आणि हिंदुत्व म्हणजे पैसे कमावण्याचे साधन आहे. उद्धव ठाकरे यांनी आजपर्यंत एक तरी पुतळा उभारला आहे का? त्यांना शिवाजी महाराजांविषयी बोलण्याचा नैतिक अधिकार नाही. शिव्या घालण्यापलीकडे त्यांना काही करता येत नाही. उद्धव ठाकरे यांनी अडीच वर्षांच्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात कोकणसाठी काय केले, कोकणातील किती लोकांना नोकऱ्या दिल्या, किती प्रकल्प आणले, किती पूल बांधले, असा सवाल राणे यांनी उपस्थित केला.

> **भ्रष्टाचार झाल्याचा पुरावा काय?**
>
> शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याची घटना दुर्दैवी आहे. पुतळ्याच्या बांधकामात भ्रष्टाचार झाल्याचा काही पुरावा आहे काय? ऐन पावसाळ्यात जोरदार वाऱ्यांमुळे पुतळा कोसळला. मी यात कोणावर दोषारोप करण्याऐवजी हा पुतळा ज्यांनी बांधला, त्या लोकांची चौकशी व्हावी, अशी मागणी करतो. कशामुळे हा पुतळा कोसळला, याचे कारण बाहेर यावे आणि संबंधितांवर कारवाई व्हावी, ही माझी इच्छा असल्याचे नारायण राणे यांनी म्हणाले.

## शिवरायांचा पुतळा बनवणारे 'नॉट रिचेबल'

**पुणे, २८ ऑगस्ट-**

मालवणच्या राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा महाकाय पुतळा दोन दिवसांपूर्वी कोसळला. यामुळे राज्यभरातील शिवप्रेमींमध्ये संतापाची लाट उसळली आहे. त्यातच हा पुतळा तयार करणारे शिल्पकार जयदीप आपटे व स्ट्रक्चरल कन्सल्टंट चेतन पाटील हे दोघेही बेपत्ता झाल्यामुळे खळबळ उडाली असून, सद्य:स्थितीत या दोघांच्याही घरांना टाळे आहे. यामुळे या प्रकरणाचा तपास पुढे कसा सरकणार, असा सवाल उपस्थित होत आहे.

ठाणे येथील २५ वर्षीय युवा शिल्पकार जयदीप आपटे यांना राजकोट येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बांधण्याचे कंत्राट देण्यात आले होते. आपटे यांना शिल्पकलेचा केवळ अडीच वर्षांचा अनुभव आहे. त्यानंतरही त्यांना एवढे मोठे काम देण्यात आले. त्यांनी आतापर्यंत केवळ दोन फुटांचे पुतळे बांधले. त्यांनी स्वतःच एका मुलाखतीत असा दावा केला होता. त्यानंतरही त्यांना छत्रपतींचा पुतळा उभारण्याचे काम का देण्यात आले, असा सवाल उपस्थित होत आहे. पुतळा पडल्यानंतर जयदीप आपटे कुटुंबासह बेपत्ता झाला आहे. मंगळवारी दुपारपर्यंत सुरू असलेला त्याचा मोबाईल आता 'नॉट रिचेबल' आहे. कल्याण पश्चिमेमध्ये असलेला त्याचा कारखानाही सध्या बंद आहे.

## द्रमुक खासदाराला ९०८ कोटींचा दंड

### ईडीची आतापर्यंतची सर्वात मोठी कारवाई

**चेन्नई, २८ ऑगस्ट-**

अंमलबजावणी संचालनालयाने फेमा प्रकरणात तामिळनाडूतील द्रमुकचे खासदार आणि व्यावसायिक एस. जगतरक्षकन् आणि त्यांच्या कुटुंबावर तब्बल ९०८ कोटी रुपयांचा दंड ठोठावला आहे. याशिवाय त्यांची ८९ कोटी रुपयांची मालमत्ताही जप्त करण्यात आली आहे.

ईडीने एक्सवर केलेल्या पोस्टद्वारे सांगितले की, परकीय चलनाशी संबंधित 'फेमा'च्या कलम ३७अ अंतर्गत जगतरक्षकन् यांची ८९.१९ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्याचा आदेश देण्यात आला. विशेष म्हणजे, गेल्या वर्षी आयकर विभागाने करचुकवेगिरी प्रकरणी खासदार जगतरक्षकन् यांच्या घर आणि कार्यालयासह ४० हून अधिक ठिकाणी छापे टाकले होते.

१ डिसेंबर २०२१ रोजी तपास संस्थेने फेमाच्या कलम १६ अंतर्गत जगतरक्षकन्, त्यांच्या कुटुंबातील सदस्य आणि संबंधित कंपनीविरुद्ध तक्रार दाखल केली. ही तक्रार २०१७ मध्ये सिंगापूरमधील एका शेल कंपनीमध्ये ४२ कोटी रुपयांची गुंतवणूक आणि कुटुंबातील सदस्यांमध्ये सिंगापूरचे शेअर्स घेण्याशी संबंधित आहे. ईडीने असेही म्हटले आहे की, जगतरक्षकन् यांनी श्रीलंकेतील एका कंपनीत सुमारे ९ कोटी रुपयांची गुंतवणूक केली होती. तक्रारीत ११ सप्टेंबर २०२० रोजी मालमत्ता जप्त करण्याची मागणीही करण्यात आली होती.

# मुख्यमंत्र्यांनी राजीनामा द्यावा : संजय कोकाटे

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २८ ऑगस्ट-**

नौदलाने उभारलेले महाराष्ट्राचे आराध्य दैवत मालवण येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा जेमतेम आठ महिन्यांपूर्वी अनावरण झालेला पुतळा कोसळला. या घटनेचा छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास दुग्धाभिषेक करून, सरकारच्या विरोधात निदर्शने व घोषणाबाजी करून शेलक्या शब्दात निषेध करण्यात आला.

यावेळी करमाळा चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर महाविकास आघाडी व सामाजिक संघटनांच्या वतीने निदर्शने करण्यात आली. एकच प्रायश्चित घ्यावे, मुख्यमंत्री यांनी क्षणाचाही विलंब न करता राजीनामा दिला पाहिजे, अशी मागणी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते संजय कोकाटे यांनी केली तर संजय घाटणेकर यांनी बोगस कामे करणाऱ्या व कमिशन खाऊ, ठेकेदारी सरकारवर जोरदार ताशेरे ओढले.



> **शिवप्रेमी माफ करणार नाहीत**
>
> शिवसेनेचे टेंभुर्णी शहरात प्रमुख सुरेश लोंढे यांनी सरकार प्रसिद्धीच्या नादी लागलेले सरकार आहे. अशा सरकारने राजीनामा द्यावा तर राष्ट्रवादी माढा तालुकाध्यक्ष औदुंबर महाडिक-देशमुख म्हणाले की आशा अपयशी सरकारला शिवप्रेमी माफ करणार नाहीत. संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सचिन जगताप यांनीही संताप व्यक्त केला.

यावेळी राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष औदुंबर महाडिक-देशमुख, भारत पाटील, ॲड. बाळासाहेब पाटील, युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष संजय पाटील, टेंभुर्णी शिवसेना शहर प्रमुख सुरेश भाऊ लोंढे, दत्तात्रय ढवळे, गोरख देशमुख, बलभीम लोंढे, परमेश्वर खरात, मयूर काळे, विठ्ठल मस्के, सुधीर पाटील, संतोष खैरमोडे, प्रशांत सोनवणे, नितीन मुळे, दादा देशमुख, सचिन खुळे, सतिश चांदगुडे, विलास देशमुख, भीमराव बंडगर, पपेश पाटील,तेजस निंबाळकर, संदीप कुटे, दत्ता खडके, अजीज शेख, भैय्या शेख, भारत नवले, बाबा महाडिक, योगेश महाडिक, दामोदर लामकाने, पांडुरंग महाडिक, सचिन देशमुख, मिटू देशमुख, जयवंत कोळपे, योगेश साळुंके, सुदर्शन गायकवाड, गजानन गायकवाड, विठ्ठल साळुंके, संजय टाकतोडे, तुकाराम पाटील, पिंटू पाटील, सचिन जाधव उपस्थित होते.




## एनएसयूआयचे 'महिलांना वाचवा, महाराष्ट्र वाचवा' अभियान : नाना पटोले

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. २८ ऑगस्ट-**

बदलापूरच्या घटनेने राज्याची मान शरमेने खाली गेली असून छत्रपती शिवाजी महाराज, शाहू, फुले, व आंबेडकर यांच्या राज्यात महिला तसेच शाळा, कॉलेजातील मुलीही सुरक्षित राहिलेल्या नाहीत. भाजपा महायुती सरकार महिला व मुलींचे संरक्षण करण्यात अपयशी ठरले आहे. या सरकारच्या विरोधात काँग्रेसची विद्यार्थी संघटना एनएसयुआय राज्यातील शाळा, महाविद्यालयामध्ये आंदोलन करीत सह्यांची मोहिम राबवणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिली आहे. टिळक भवनमध्ये पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले की, भाजपा युती सरकार महिला व मुलींना संरक्षण देऊ शकत नाही. मा. उच्च न्यायालयानेही या सरकारला फटकारले आहे तरीही त्यांना जाग येत नाही. महिलांचे संरक्षण तर ते करु शकत नाहीतच उलट मुलींनी ७ वाजल्यानंतर बाहेर पडू नये असे सल्ले देत आहेत.

संवेदना नसलेल्या महायुती सरकारच्या विरोधात काँग्रेसची विद्यार्थी संघटना जनजागृती करुन मुलींना आश्वस्त करणार आहे, या आंदोलनाची आणि जागृती मोहिमेची माहिती एनएसयुआयचे प्रदेशाध्यक्ष आमीर शेख यांनी दिली. यावेळी प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, माजी मंत्री सुरेश शेट्टी,आमदार अभिजीत वंजारी, सुरभी द्विवेदी आदी उपस्थित होते.

## शिवरायांचा पुतळा कोसळल्याप्रकरणी सरकारवर गुन्हे दाखल करा : नाना पटोले

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. २८ ऑगस्ट-**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवणच्या राजकोट भागातील छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा अवघ्या ८ महिन्यात कोसळतो ही अत्यंत लाजीरवाणी असून छत्रपती व महाराष्ट्राचा अपमान करणारी घटना आहे.

राज्य सरकारमधील मंत्री आता आपली जबाबदारी झटकून केंद्र सरकारकडे बोट दाखवत आहेत. छत्रपती शिवाजी महाराज महाराष्ट्राचे दैवत आहेत आणि आमच्या दैवताचा अपमान कदापी सहन केला जाणार नाही. या घटनेमुळे राज्यभरातील शिवप्रेमी जनतेमध्ये तीव्र संताप आहे. पुतळा कोसळल्या प्रकरणी फक्त ठेकेदार आणि अधिकारी नाही तर राज्य व केंद्र सरकारवर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. टिळक भवन येथे ते पत्रकारांशी बोलत होते.

> **शिंदे यांनी राजीनामा द्यावा : राऊत**
>
> छत्रपती शिवाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा कोसळल्याने अख्खा महाराष्ट्र दुःखात आहे. पण शिंदे सरकारच्या चेहऱ्यावर वेदनेची लकेर नाही. ज्यांचे महाराज लाडके होऊ शकले नाहीत. ते लाडकी बहीणच्या गोष्टी करतात, या घटनेमुळे त्यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी ठाकरे गटाचे नेते खा. संजय राऊत यांनी केली आहे. ते म्हणाले,'. मुघलांनीही महाराष्ट्रावर अनेकदा आक्रमनं केली. पण शिवरायांचा असा अपमान मुघलांनीही केला नव्हता. तो अपमान काल अवघ्या देशाने पाहिला. आग्र्यातून छत्रपती स्वाभिमानाने सुटून बाहेर आले. पण काल आपल्याच महाराष्ट्रात कोसळून पडण्याची वेळ त्यांच्यावर आली. याला पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार जबाबदार आहेत.. मुख्यमंत्री शिंदे यांनी त्यांच्या जवळच्या लोकांना काम दिलं. या प्रकल्पाचे ठेकेदार, शिल्पकार सगळे ठाण्यातले आहेत. ही अत्यंत गंभीर गोष्ट आहे. महाराजांचा पुतळा कोसळल्याने महाराष्ट्र दु:खी आहे. त्याची भरपाई कधीच कुणी करू शकणार नाही.

## काँग्रेस निवड समितीच्या अध्यक्षांची नेत्यांशी निवडणुकीबाबत खलबते

**मुंबई दि. २८ ऑगस्ट-**

विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेस पक्षाच्या निवड समितीचे अध्यक्ष व ज्येष्ठ नेते मधुसुदन मिस्री हे महाराष्ट्राच्या दौ-यावर असून त्यांनी आज टिळक भवन, दादर येथे राज्यातील वरिष्ठ नेत्यांशी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने चर्चा केली. निवड समितीचे अध्यक्ष मधुसुदन मिस्री, सदस्य खा. सप्तगिरी उलाका, डॉ. श्रीवेल्ला प्रसाद, मन्सूर अली खान हे महाराष्ट्राच्या दौ-यावर आले असून त्यांनी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, आ. सतेज पाटील, माजी केंद्रीय मंत्री विलास मुत्तेमवार, आदिवासी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शिवाजीराव मोघे, माजी मंत्री के. सी. पाडवी, डॉ. नितीन राऊत, खा. प्रतिभाताई धानोरकर, विधानसभेतील काँग्रेस पक्षाचे प्रतोद आ. सुरेश वरपुडकर, आ. भाई जगताप, आ. सुभाष धोटे, माजी मंत्री सुरेश शेट्टी, प्रा. वसंत पुरके, आ. कैलाश गोरंट्याल आ. अभिजीत वंजारी आ. शिरीष चौधरी माजी खासदार कुमार केतकर यांच्यासह वरिष्ठ नेत्यांनी मिस्री यांची भेट घेतली

# 'मविआ'चे रविवारी सरकार विरोधात जोडे मारो आंदोलन


### उद्धव ठाकरे यांची घोषणा

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि.२८ ऑगस्ट-**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा निकृष्ट दर्जामुळे कोसळल्याने राज्यभरातून संताप व्यक्त होत आहे. महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून या घटनेच्या निषेधार्थ राज्य सरकार विरोधात येत्या रविवारी (दि.१ सप्टेंबर )'जोडे मारो आंदोलन' करण्यात येणार असल्याची घोषणा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली आहे. मविआ आघाडीचे वरिष्ठ नेत्यांची मातोश्रीवर बैठक झाली त्यानंतर ठाकरे, शरद पवार आणि नाना पटोले यांनी श पत्रकार परिषद घेत शिवद्रोही सरकार असल्याचे सांगत टीकेची झोड उठवली.

राज्य सरकारने भ्रष्टाचार करण्यात कसलेच तारतम्य ठेवले नसल्याची टीका शरद पवार यांनी केली.

उद्धव ठाकरे म्हणाले, महाविकास आघाडीचे प्रमुख नेते आणि कार्यकर्ते रविवारी सकाळी ११ वाजता हुतात्मा चौकात जमतील. संयुक्त महाराष्ट्रासाठी बलिदान देणाऱ्या हुतात्मांना वंदन केल्यानंतर गेट ऑफ इंडियाच्या दिशेनं मोर्चा काढला जाईल. गेट ऑफ इंडियावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला वंदन केलं जाईल. त्या वेळी या सरकारला जोडे मारो आंदोलन करण्यात येईल,या आंदोलनाला शिवप्रेमींनी उपस्थित राहावे , असे आवाहन करून ते म्हणाले,



नौदल दिन कधी नव्हे ते सिंधुदुर्गच्या किनारी झाला याचा आम्हाला अभिमान वाटला होता. त्या किनाऱ्यावर महाराजांचा पुतळा उभारण्याचे काम घाईने आणि श्रेय लाटण्यासाठी केले गेलं. तो पुतळा कुणी उभारला ती कंपनी कोणती होती? या सर्वांचं 'ठाणे कनेक्शन' आता समोर आलंय. भ्रष्टाचारामुळेच हा पुतळा पडला. पुतळा उभारण्याचे टेंडर देऊन पुन्हा घोटाळा करतील, महाराजांचा पुतळा पडल्याने सर्वांच्या मनात संताप होता. त्याच्या निषेधार्थ तेथील राजकोट किल्ल्यावर आंदोलन करण्यात आले. त्याला विरोध करणारे शिवद्रोही आहेत, अशी टीकाही ठाकरे यांनी केला. ते म्हणाले, महाराष्ट्रात एकप्रकारची अस्वस्थता आहे. महिलांवरील अत्याचार वाढत आहेत. भ्रष्टाचार वाढत आहे. त्यातच सिंधुदुर्गात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळला. महायुतीला जेवढी इंजिन लावले, तेवढा भ्रष्टाचार वाढत आहे. शरद पवार म्हणाले,' कोठे भ्रष्टाचार करायचा, याचे तारतम्यही सरकारला राहिलेले नाही, सरकारने मोठा भ्रष्टाचार केल्याने आज शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळला. राज्यात भ्रष्टाचार टोकाला पोहोचला आहे.,बदलापूर घटनेवरून विरोधक राजकारण करत असल्याची टीका सत्ताधाऱ्यांनी केली. त्यावरही शरद पवार यांनी ताशेरे ओढले.' शिवाजी महाराजांच्या काळात लोकांना एक गोष्ट भावली. त्यांच्या काळात एका महिलेवर अत्याचार झाल्याची तक्रार महाराजांकडे आली की त्यांनी त्याचे दोन्ही हात कलम केले. अशी प्रकारची नीती त्यांनी जनतेसमोर ठेवली होती. असेही त्यांनी स्पष्ट केले.

## उबाठाचे आंदोलन म्हणजे राजकीय गिधाडीवृत्ती : आशिष शेलार

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. २८ ऑगस्ट-**



राजकीय गिधाडी वृत्ती उबाठा गटाची झाली असून आपण स्वत: काही करायचे नाही, पण एखादी घटना, दुर्घटना घडली की त्यावर राजकीय पोळी भाजण्याचे काम करायचे, अशा शब्दात मुंबई भाजपा अध्यक्ष आमदार ॲड. आशिष शेलार यांनी उद्धव ठाकरे गटाला प्रत्यूत्तर दिले. उध्दवजी भाषा जपून वापरा कामाठीपूरातील भाषा आम्हालाही येते, असा इशारा त्यांनी यावेळी दिला.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा दुर्घटना प्रकरणी आज मालवणमध्ये आंदोलनकर्ते आमनेसामने आले त्यानंतर शेलार यांनी मुंबई भाजपा कार्यालयात पत्रकार परिषद घेऊन पक्षाची भूमिका स्पष्ट केली. महाराज यांचा पुतळा पडण्याची घटना अत्यंत वेदनादायी आणि मनात संताप निर्माण करणारी आहे. हा एक अपघात होता याबाबत सरकारने आपली बाजू मांडली असली तरी शिवप्रेमी म्हणून या दुदैवी घटनेबाबत सरकारच्यावतीने मी माफी मागितली आहे. या प्रकरणी दोषी कोण हे ठरेल, सर्व चौकशा होतील आणि कारवाई सुध्दा होईल, यामध्ये सरकार कुणालाही पाठीशी घालणार नाही. पुन्हा उत्तम दर्जाचे स्मारक उभेही करण्यात येईल, असे सांगून आमदार ते म्हणाले की, लोकशाही आंदोलन करण्याचा अधिकार सर्वांना आहे. जे राजकीय पक्ष मालवणमध्ये आंदोलन करण्यासाठी गेले होते तसेच तिथल्या स्थानिक जनतेला आणि निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना ही आंदोलन करण्याचा अधिकार आहे. आज जे आरोप करीत आहेत त्यांनी मात्र दुर्घटना घडताच गिधाडा सारखे आता या विषयावर राजकारण करीत आहेत.

### बदलापूर बालिका अत्याचारप्रकरणी

## ३ सप्टेंबरपर्यंत प्रतिज्ञापत्र सादर करा : उच्च न्यायालय

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.२८ ऑगस्ट-**

बदलापुरातील बालिका वरील अत्याचाराबाबत झालेल्या तपास कामाचा आढावा घेण्यासाठी समिती नेमण्यात नेहमी व त्याबाबतचे प्रतिज्ञापत्र तीन सप्टेंबरला न्यायालयात सादर करण्यात यावे असे आदेश उच्च न्यायालयाने मंगळवारी राज्य सरकारला दिले.

दरम्यान ,याप्रकरणी शिवसेना शिंदे गटाचा नेता वामन म्हात्रे यांच्याविरुद्ध दाखल असलेल्या विनयभंग व अट्रोसिटीच्या गुन्ह्यात अटकपूर्व जामीन अर्ज उच्च न्यायालयाने फेटाळून लावला.

बदलापुरातील आदर्श विद्या मंदिर या शाळेत १३ ऑगस्टला दोन बालिकावर स्वच्छता कर्मचारी अक्षय शिंदे यांच्याकडून अमानुषपणे लैंगिक अत्याचार करण्यात आला होता. याबाबत पीडीतेच्या पालकांनी तक्रार करूनही शाळेच्या संस्थाचालक व पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ केली होती त्यामुळे २० ऑगस्टला बदलापूर बंद करून नागरिकांनी दहा तास रेल रोको आंदोलन केले होते या अमानुष घटनेची उच्च न्यायालयाने मोटो याचिका दाखल करून घेत राज्य सरकारला अत्यंत तिखट शब्दात खडसाविले होते. त्याबाबत आज पुन्हा न्या. रेवती मोहिते -ढेरे व न्या. पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठांसमोर सुनावणी झाली. पिढीतावरील अत्याचाराबाबत तपासासाठी या नेमलेल्या एसआयडीने केलेल्या तपास कामाची माहिती घेत त्याच्या संथगतीबद्दल खडसावले. तसेच या प्रकरणाचा आढावा घेण्यासाठी समिती नेमण्यात यावी, संबंधित संस्था व पोलिसांवर काय कारवाई केली व अशा घटना रोखण्यासाठी करावयाच्या उपायोजनाबाबतचे प्रतिज्ञापत्र पुढील सुनावणीत ३ सप्टेंबरला सादर करण्याचे निर्देश राजे सरकारला दिले.

> **वामन म्हात्रेचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला**
>
> बदलापूर अत्याचार प्रकरणी वार्तांकन करत असलेल्या एका महिला पत्रकाराला शिंदे गटाचा नेते व माजी नगराध्यक्ष वामन म्हात्रे यांनी तुझ्यावर बलात्कार झाला आहे का अशा पद्धतीने का बातम्या देतेस असे असले शेरेबाजी केली होती त्या विरोधात आंदोलन केल्यानंतर पोलिसांनी त्याच्या विरोधात विनयभंग व ॲट्रॉसिटी च्या गुन्हे अंतर्गत गुन्हा दाखल केला असून तेव्हापासून वामन म्हात्रे हा फरारी आहे त्याने उच्च न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी धाव घेतली होती. मात्र त्यावर सुनावणी घेताना आज न्यायालयाने अर्ज फेटाळून लावत याबाबत कल्याणच्या कोर्टात दाद मागावी असे निर्देश दिले.

## पुतळा दुर्घटनेप्रकरणी 'वर्षा' वर मुख्यमंत्र्यांची रात्री उशिरापर्यंत खलबते

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.२८ ऑगस्ट-**

मालवण येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळण्याच्या दुर्दैवी घटनेमुळे राज्यात निर्माण झालेला असंतोष मिटविण्यासाठी राज्य सरकारने आता पुढाकार घेतला आहे. याबाबत विरोधकाकडून केला जाणाऱ्या टीकेवर योग्य उपाययोजना करण्याबाबत प्रमुख मंत्री व वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये बुधवारी रात्री उशिरापर्यंत चर्चा सुरू होती.

सोमवारी दुपारी पुतळा कोसळण्याची दुर्घटना घडली. आठ महिन्यात पुतळा कोसळल्याने निकृष्ट दर्जा चव्हाट्यावर आले आहे. विरोधकांकडून हा मुद्दा आक्रमकपणे मांडला जात असल्याने महायुती सरकार बॅकफूटवर आली आहे. त्यामुळे त्याबाबत तातडीने पावले उचलण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी रात्री वर्षा निवासस्थानी बैठक बोलाविले. या बैठकीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, नेव्हीचे व्हाईस ॲडमिरल अजय कोचर, अतिरिक्त मुख्य सचिव गृह इक्बाल सिंग चहल, अतिरिक्त मुख्य सचिव सार्वजनिक बांधकाम मनिषा म्हैसकर, अतिरिक्त मुख्य सचिव नगर विकास असीम गुप्ता, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव ब्रिजेश सिंह, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, व्हाईस ॲडमिरल अजय कोचर, रियर ॲडमिरल मनीष चड्ढा उपस्थित होते.

## अग्रलेख...

# हवा राष्ट्रपती राजवटीचा दणका!


पश्चिम बंगालमध्ये कायदा आणि सुव्यवस्था अस्तित्वात आहे की नाही, असा प्रश्न देशातील जनता एकमेकांना विचारीत आहे. ममतांच्या पश्चिम बंगालमध्ये कोणाचे राज्य आहे, अशीही विचारणा करीत आहे. दिल्लीपासून कन्याकुमारीपर्यंत देशात सर्वत्र कोलकात्यातील घटनेचीच चर्चा आहे. माँ, माटी, मानुषचा जयघोष करीत सत्तेवर आलेल्या ममता दीदी राज्यात ठिकठिकाणी होणाऱ्या महिलांवरील हिंसाचाराच्या आणि अत्याचाराच्या घटनांबद्दल शांत का आहेत? परिस्थिती हाताळणे कठीण झाले असेल तर त्या राजीनामा का देत नाहीत? महिला शक्तीचा आवाज बुलंद करणाऱ्या तृणमूलच्या कार्यकर्त्यांना बलात्काऱ्यांबाबत एवढी सहानुभूती का? सामान्य लोकांना किती दिवस न्यायासाठी प्रतीक्षा करावी लागणार? असे प्रश्न विचारले जात आहेत. राजधानी कोलकात्यातील एका प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर सामूहिक बलात्कार करून तिची नृशंस हत्या करण्याच्या घटनेची या प्रश्नांना पृष्ठभूमी आहे. या घटनेतील गुन्हेगारांना शिक्षा व्हावी, यासाठी सुरू असलेले प्रयत्न यशस्वी होतील, यासाठी झटायचे सोडून ममता बॅनर्जी आणि त्यांच्या पक्षाचे नेते आरोपी सुटून कसे जातील, यासाठी खटाटोप करीत आहेत. ममता सरकारने तर ही केस काहीही करून हातची जाऊ द्यायची नाही, असा चंगच बांधलेला आहे. खासदार आणि सर्वोच्च न्यायालयात प्रॅक्टिस करणारे कपिल सिब्बल यांच्या नेतृत्वात २१ वकिलांची फौज या युवतीविरुद्ध त्यांनी उतरविली आहे. कपिल सिब्बल यांना अयोध्येच्या राम मंदिराविरोधात, तिहेरी तलाकविरोधात लढा देण्याचा दांडगा अनुभव आहे. प्रचंड चीड आणि लज्जास्पद बाब म्हणजे सिब्बल यांच्या फौजेत बहुतांशी महिला वकिलांचाच समावेश आहे. एका असहाय्य युवतीच्या न्यायाच्या मार्गात असंख्य काटे पेरण्याचे काम ममता सरकार करीत आहे. गेल्या काही दिवसांपासून कोलकात्यातील रस्ते, डॉक्टर युवतीला न्याय मिळावा म्हणून आंदोलनांनी फुलून आले आहेत. आबालवृद्ध या युवतीच्या पाठीशी उभे असलेले दिसत आहेत. एवढेच काय, तृणमूलच्या एका खासदारानेही पक्षाच्या भूमिकेविरुद्ध आवाज उठवला आहे. याच आंदोलनात काल एका विद्यार्थी आंदोलनाची भर पडली. कुठल्याही पक्षाचा झेंडा हाती न घेतलेल्या हजारो युवकांनी त्यांच्या नबान्न अभियानाची ताकद सरकारला दाखवून दिली. नबन्ना ही हावडा स्थित एक प्रशासकीय इमारत आहे. पश्चिम बंगाल सरकारचे तात्पुरते राज्य सचिवालय या इमारतीत आहे. नबान्नचा अर्थ 'भाताचे नवीन पीक.' हजारोंच्या संख्येत तरुणाई कोलकात्याच्या रस्त्यावर उतरली. राज्यात स्त्रियांविरुद्धच्या अत्याचारांना वाचा फोडण्यासाठी मोर्चातील सारेच उत्सुक होते. पण या युवा आंदोलनकर्त्यांची समजूत घालायचे सोडून ममता सरकारच्या पोलिसांनी निःशस्त्र विद्यार्थ्यांना बॅरिकेड्स लावून रोखण्याचा प्रयत्न केला. लाठीचार्ज केला. त्यांच्याविरुद्ध पाण्याच्या तोफा आणि अश्रुधुराचा वापर केला. आपले हक्क आणि न्याय्य मागण्यांसाठी विद्यार्थी शांततेत आंदोलन करीत असताना अनेक विद्यार्थ्यांविरोधात एफआयआरही नोंदविण्यात आला. सरकारची ही कृती दडपशाहीचीच नसून ती अत्यंत लज्जास्पदही आहे. निःशस्त्र विद्यार्थ्यांविरुद्ध लाठ्या उगारून पोलिसांनी त्यांचा रानटीपणाच दाखवला आहे. एकीकडे पोलिस नि:शस्त्र विद्यार्थ्यांवर बळाचा वापर करीत आहेत आणि दुसरीकडे बलात्कार, खुनासारख्या गंभीर घटना रोखण्यात त्यांना अपयश येत आहे. महिला डॉक्टरवर झालेला बलात्कार, तिची हत्या, घटनास्थळावरील (इस्पितळातील) गुन्ह्याचे पुरावे नष्ट करणे, हजारोंचा जमाव गोळा करून इस्पितळावर आणि आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर हल्ला करणे, हा प्रकार झुंडशाहीचाच म्हणायला हवा. या साऱ्या समाजविघातक कृत्यांचा निषेध करतानाच केंद्रातील मोदी सरकारने राष्ट्रपती राजवट लावून तेथे शांतता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न करावे, अशी मागणी येथे आम्ही करीत आहोत. कोलकात्याच्या रोगावर राष्ट्रपती राजवट हाच रामबाण उपाय ठरायला हवा. राज्य सरकारच्या दडपशाहीविरुद्ध आज आणखी एक आंदोलन भारतीय जनता पार्टीने हाती घेतले आहे. पण भाजपाने आयोजित केलेले १२ तासांचे बंदचे आंदोलनही चिरडून काढण्याचे पोलिसांचे प्रयत्न सुरू आहेत. काही ठिकाणी आंदोलनकर्त्यांवर गोळ्या चालवल्या गेल्याच्या बातम्या आल्या आहेत. अनेक ठिकाणी आंदोलनकर्ते आणि पोलिसांमध्ये झडप झाल्याचे चित्र आहे. रस्त्यांवर टायर जाळून आंदोलनकर्ते निषेध व्यक्त करीत आहेत. दिवसेंदिवस ममता हिंसक होत असल्याचाच हा पुरावा आहे. भाजपाच्या अनेक नेत्यांना अटक केली गेली आहे. तृणमूलच्या कार्यकर्त्यांनाही रस्त्यावर उतरून आंदोलन मोडून काढण्याचे निर्देश दिले गेले आहेत. राज्य सरकारच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीवर टीका करताना अनेक मानवाधिकार संघटना आणि विरोधी पक्षांनी ही बाब अत्यंत दुःखद असल्याचे म्हटले आहे. कुठे गेली ममतांची संवेदनशीलता, असा प्रश्नही यानिमित्ताने उभा ठाकला आहे. न्यायापेक्षा विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांना दडपण्याला प्राधान्य दिले जात आहे. त्यामुळे समाजात तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. या परिस्थितीकडे बघता पोलिसांची दडपशाही तातडीने थांबविण्याची गरज असल्याचे मत अनेक तज्ज्ञ आणि सिव्हिल सोसायटीच्या नेत्यांनी व्यक्त केले आहे. आता राज्यात निर्माण झालेला हा तणाव आणि असंतोष पाहता सरकार आपली धोरणे आणि पोलिस यंत्रणेत सुधारणा करणार का, हे बघावे लागणार आहे.

खरे तर पश्चिम बंगालमध्ये निर्माण झालेल्या परिस्थितीच्या पृष्ठभूमीवर तेथे राष्ट्रपती राजवट लावणेच उचित आहे. काही दिवसांपूर्वी राज्यपालांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेऊन त्यांना पश्चिम बंगालमधील ढासळलेल्या परिस्थितीबाबत अवगत केले होते. त्यावेळीच तेथे राष्ट्रपती राजवट लागेल, असे गृहीत धरले गेले. मात्र ती का लावली गेली नाही, याबाबत शंकाकुशंका व्यक्त केल्या जात आहेत. घटनेतील ३५६ कलमाचा वापर गेल्या १० वर्षांत करण्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी टाळले. मात्र यंदा पश्चिम बंगालमध्ये हे कलम वापरले जाण्यासारखी परिस्थिती उद्भवली आहे. आता तर राज्यसभेतही रालोआला बहुमत मिळाले आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या निर्णयाविरोधात ना लोकसभा ना राज्यसभा मतदान करू शकेल. आज जी परिस्थिती कोलकात्यात उद्भवली आहे, त्या पृष्ठभूमीवर मोदींनी राष्ट्रपती राजवटीची घोषणा केली तर विरोधकांमधीलही काही खासदार त्यांच्यासोबत येऊ शकतात. एकीकडे राज्याचे पोलिस कारवाईच्या नावाने चालढकल करीत असताना इंडिया आघाडीतील राजकीय पक्ष ममतांची साथ देताना दिसत आहेत. त्यांच्या मते ममता बॅनर्जी अतिशय संवेदनशील असून त्या योग्य वेळी उचित निर्णय घेतील. काँग्रेस, समाजवादी पार्टी, शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस, आम आदमी पार्टी आदींचे प्रवक्ते ममतांचीच री ओढताना दिसत आहेत. बदलापूरच्या घटनेचा निषेध करताना हिंसक झालेले या पक्षांचे कार्यकर्ते ममतांबाबत ब्र काढायला तयार नाहीत. यावरून त्यांना महिलांबाबत किती कळवळा आहे, हे दिसून येते. राष्ट्रवादीच्या सुप्रिया सुळे बदलापूरच्या घटनेबद्दल व्यक्त होताना म्हणाल्या, प्रसंगी माझी सुरक्षा काढून टाका, पण महिलांच्या अत्याचारांबाबत तडजोड नको. पण अशाच कोलकात्यात घडलेल्या घटनेबद्दल त्या अवाक्षरही बोलायला तयार नाहीत. ज्या रुग्णालयात हा सारा दुर्दैवी प्रकार घडला त्या रुग्णालयाच्या संचालकाला ताबडतोब निलंबित करायला हवे होते. मात्र, त्याला तेथून दुसऱ्या मोठ्या रुग्णालयात पोस्टिंग देण्यात आली. हा सारा प्रकार अनाकलनीयच म्हणायला हवा. या रुग्णालयाबाबतही अनेक प्रकारच्या चर्चा रंगत आहेत. या रुग्णालयाने अवयवांचा बाजार मांडल्याची चर्चा माध्यमांमध्ये रंगली असून या सर्व प्रकाराला ममता सरकारचा दुजोरा असल्याचेही सांगितले जात आहे. मानवी मृतदेहांच्या व्यापाराच्या बातम्याही माध्यमांनी शोधून काढल्या आहेत. याप्रकरणात अटक करण्यात आलेल्या आरोपीच्या गुन्हेगारीवर प्रकाश टाकला गेला आहे. इतके सारे घडून आणि त्याबाबतची कथानके बाहेर येऊनही ममतांनी त्याबाबत साधलेली चुप्पी संतापजनकच म्हणायला हवी. पश्चिम बंगालमध्ये हिंसाचार आता नवा राहिलेला नाही. या पृष्ठभूमीवर तेथे राष्ट्रपती राजवट लावून मोदींनीच राज्यातील जनतेला मोकळा श्वास घेण्याची व्यवस्था करावी आणि जनतेचा साधुवाद मिळवावा.

## दखल

**श्रीशा वागळे**

# गब्बरची निवृत्ती



भारताचा सलामीचा फलंदाज शिखर धवनने अचानक निवृत्तीची घोषणा करून क्रिकेटप्रेमींना धक्का दिला. आनंदी, हसरा, मिश्यांना झोकात पीळ देणारा शिखर 'गब्बर' या टोपण नावाने ओळखला जाऊ लागला. आक्रमक फलंदाजीने मैदान गाजवणाऱ्या शिखरला दुखापतींनी ग्रासल्याने भारतीय संघाबाहेर पडावे लागले. त्यानंतर शिखरकडे दुर्लक्षच झाले. शिखरच्या निवृत्तीमुळे भारतीय क्रिकेटमधला एक आक्रमक अध्याय संपला आहे.

शिखर धवन... भारताचा एकेकाळचा सलामीवीर आणि हिटमॅन रोहित शर्माचा सलामीचा सहकारी. शिखरने अनेक सामने गाजवले. सध्याच्या क्रिकेटला साजेशी आक्रमकता शिखरच्या फलंदाजीत होती. शिखर समोर असला की भल्या भल्या गोलंदाजांच्या मनात धडकी भरायची. संघाला चांगली सुरुवात करून देण्याची जबाबदारी त्याच्या खांद्यावर असायची. शिखरने तब्बल बारा वर्षे भारतीय क्रिकेटची सेवा केली. शिखरने २०१० मध्ये भारतीय क्रिकेट संघात पदार्पण केले असले तरी २००४ च्या एकोणीस वर्षांखालील युवकांच्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेतच आपल्या गुणवत्तेची चुणूक दाखवली. शिखर त्या स्पर्धेतला सर्वाधिक धावा करणारा फलंदाज होता. तीन शतके आणि एका अर्धशतकाच्या बळावर शिखरने ५०५ धावा केल्या होत्या. त्यावेळी त्याची सरासरी होती ८४.१६ आणि स्ट्राईक रेट होता ९३.५१. बांगलादेशमध्ये आयोजित या स्पर्धेच्या उपांत्य सामन्यात पाकिस्तानने भारताचा पराभव केला असला तरी शिखरला स्पर्धेतल्या सर्वोत्तम खेळाडूचा पुरस्कार देण्यात आला होता. १९ वर्षांखालील एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत सर्वाधिक धावा करण्याचा त्याचा विक्रम २०२२ पर्यंत अबाधित राहिला होता. या विश्वचषकानंतर शिखर धवन या नावाने सर्वांचे लक्ष वेधले. शिखर धवनच्या अंगी गुणवत्ता ठासून भरली होती. युवा विश्वचषकातल्या देदीप्यमान कामगिरीनंतरही शिखरच्या भारतीय संघातल्या पदार्पणासाठी २०१० हे वर्ष उजाडावे लागले. त्याची सुरुवात मनासारखी झाली नाही. २०१० ते २०११ या कालावधीत खेळलेल्या पाच एकदिवसीय सामन्यांमध्ये शिखरने अवघ्या ६९ धावा केल्यामुळे शिखरने भारताच्या एकदिवसीय संघातले स्थान गमावले. मात्र २०१३ हे वर्ष त्याच्या कारकिर्दीला कलाटणी देणारे ठरले. इथूनच नव्या शिखर धवनचा उदय झाला. क्रिकेटचे उंच शिखर गाठायला हा युवा फलंदाज सज्ज झाला होता. २०१३ मधल्या ऑस्ट्रेलियाच्या भारत दौऱ्यादरम्यानच्या मोहाली कसोटीत शिखरने कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण केले. ऑस्ट्रेलियासारखा संघ समोर असतानाही युवा शिखर अजिबात डगमगला नाही. आधीचे अपयश मागे टाकून नव्या उमेदीने फलंदाजीला उतरला. त्याने ही कसोटी गाजवली, अवघ्या ८५ चेंडूंमध्ये कसोटी शतक झळकावले. पदार्पणातच एखाद्या फलंदाजाने कसोटीत झळकावलेले हे सर्वात वेगवान शतक होते. शिखर शतकावर थांबला नाही, तर १८७ धावा केल्या. या कामगिरीच्या बळावर शिखरला एकदिवसीय संघात पुन्हा संधी मिळाली. २०१३ च्या आयसीसी चॅम्पियन्स चषक स्पर्धेतल्या चमकदार कामगिरीने एकदिवसीय क्रिकेटमधील शिखरच्या कारकिर्दीला नवसंजीवनी मिळाली. या स्पर्धेत भारताने मिळवलेल्या विजयात शिखरचा सिंहाचा वाटा होता. शिखर सलामीवीर म्हणून स्पर्धेत उतरला. आपल्यावर दाखवलेला विश्वास त्याने सार्थ ठरवला. त्याने या स्पर्धेत ३६३ धावा केल्या. स्पर्धेतल्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्याच सामन्यात त्याने शतकी खेळी साकारताना ११४ धावा करत एकदिवसीय संघातले पुनरागमन साजरे केले. हे शिखरचे पहिले एकदिवसीय शतक होते. त्यानंतर त्याने वेस्ट इंडिजविरुद्धच्या सामन्यातही शतक झळकावले.

एकमागोमाग झळकवलेल्या दोन शतकांमुळे शिखरचा आत्मविश्वास चांगलाच वाढला होता. यानंतर पाकिस्तान आणि श्रीलंकेविरुद्ध त्याने अनुक्रमे ४८ आणि ६८ धावा केल्या. इंग्लंडविरुद्धच्या अंतिम सामन्यात त्याने २४ चेंडूंमध्ये ३१ धावा करत भारताचा विजयाचा मार्ग मोकळा केला. या स्पर्धेत शिखरने ९०.७५ च्या सरासरीने आणि १०१.३९ च्या स्ट्राईक रेटने धावा केल्या. त्याने आक्रमकतेला सातत्याची जोड दिली. या स्पर्धेत त्याला मालिकावीर म्हणून गौरवण्यात आले. २०१३ हे शिखरच्या एकदिवसीय कारकिर्दीतले सर्वोत्तम वर्ष म्हणता येईल. या वर्षातल्या २६ एकदिवसीय सामन्यांमध्ये त्याने ५०.५२ च्या सरासरीने आणि ९७.८९ च्या स्ट्राईक रेटने ११६२ धावा केल्या. या वर्षभरात त्याने आक्रमकतेने आणि जलदगतीने खेळत खोऱ्याने धावा खेचल्या. त्याच्या रुपात भारताला एक आक्रमक आणि गुणवान सलामीवीर लाभला.

२०१३ च्या चॅम्पियन्स चषकानंतर शिखर धवनने सलामीवीर म्हणून भारतीय संघात स्थान पक्के केले. २०१५ च्या एकदिवसीय विश्वचषकात शिखरने पुन्हा एकदा कमाल केली. स्पर्धेतल्या आठ सामन्यांमध्ये ४१२ धावा करत शिखर धवन या स्पर्धे सर्वाधिक धावा करणारा भारतीय फलंदाज बनला. पाकिस्तानविरुद्धच्या पहिल्याच सामन्यापासून शिखरने चुणूक दाखवायला सुरुवात केली. या सामन्यात त्याने ७२ धावा केल्या. त्यानंतर दक्षिण आफ्रिका आणि आयर्लंडविरुद्ध दोन दमदार शतकेही ठोकली. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यात त्याने १३७ धावा केल्या. या सामन्यात रोहित शर्मा तिसऱ्याच षट्कात धावबाद झाल्यानंतर शिखरने सगळी जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली. विराट कोहली आणि अजिंक्य रहाणे यांच्या साथीने त्याने भारताला चांगली धावसंख्या रचून दिली. याआधीच्या म्हणजे १९९२, १९९९ आणि २०११ च्या एकदिवसीय विश्वचषकांमध्ये दक्षिण आफ्रिकेने भारताचा दारुण पराभव केला होता. मात्र या सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेचा १३० धावांनी पराभव करत सव्याज परतफेड केली. शिखर धवनच्या शतकामुळेच हे शक्य झाले होते. २०१७ च्या चॅम्पियन्स चषक स्पर्धेत त्याने २०१३ च्या कामगिरीची पुनरावृत्ती केली. या स्पर्धेतल्या पाच सामन्यांमध्ये शिखरने ३३८ धावा केल्या. याही वेळी तो स्पर्धेत सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला आणि मालिकावीराचा गोल्डन बॅट पुरस्कार पटकावला. चॅम्पियन्स चषक स्पर्धेत त्याने सलग दुसऱ्यांदा हा किताब पटकावला.

२०१९ च्या विश्वचषकातही शिखर धवनने धडाक्यात सुरुवात केली होती. या स्पर्धेतल्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या सामन्यात त्याने १०९ चेंडूंमध्ये ११७ धावा केल्या. त्याच्या या खेळीमुळे भारत ऑस्ट्रेलियाला पराभूत करू शकला. दुर्दैवाने शिखरची ही अखेरची आयसीसी स्पर्धा ठरली. या सामन्यानंतर शिखरला दुखापतीमुळे विश्वचषक स्पर्धा अर्ध्यावर सोडावी लागली. शिखरने आयसीसी स्पर्धा गाजवल्या. या स्पर्धांमधली त्याची कामगिरी थक्क करणारी होती. एकदिवसीय विश्वचषक आणि चॅम्पियन्स चषक स्पर्धांमध्ये खेळलेल्या २० सामन्यांमध्ये शिखरने सहा शतके आणि दहा अर्धशतके ठोकली. या स्पर्धांमधली त्याची सरासरी किमान १००० धावा केलेल्या ५१ फलंदाजांमध्ये सर्वाधिक राहिली. विराट कोहलीच्या ६४.५५ च्या सरासरीपेक्षाही धवनची सरासरी काहीशी अधिक राहिली. या दिग्गज फलंदाजांमध्ये सर विवियन रिचर्डस, सईद अन्वर आणि केन विलियमसनसारख्या मातब्बर फलंदाजांचा समावेश आहे. फक्त विश्वचषकाचा विचार केल्यास शिखर धवनची दहा सामन्यांमध्ये ५३.७० इतकी सरासरी आहे. तर चॅम्पियन्स चषकातल्या दहा सामन्यांमध्ये त्याने ७७.८८ च्या सरासरीने धावा केल्या. शिखर धवनने १६७ एकदिवसीय सामन्यांमधल्या १६४ डावांमध्ये ४४.११ च्या सरासरीने आणि ९१.३५ च्या सरासरीने ६७९३ धावा केल्या आहेत तर ३४ कसोटी तसेच ६८ टी-२० मध्ये अनुक्रमे २३१५ आणि १७५९ धावा केल्या. शिखर सतत महेंद्रसह धोनी, रोहित शर्मा, विराट कोहली यांच्या छायेत राहिला. आयसीसी स्पर्धांमध्ये थक्क करणारी कामगिरी करूनही शिखरच्या वाट्याला म्हणावे तितके कौतुक आलेच नाही. मात्र, त्याची कामगिरी बोलकी आहे. आज शिखर निवृत्त झाला असला तरी आयसीसी स्पर्धांमधली त्याची कामगिरी कधीही विसरता येणार नाही. भारतीय क्रिकेटमधल्या या गब्बरने साकारलेल्या महत्त्वपूर्ण खेळी नेहमीच स्मरणात राहतील.

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# गौरव सेवेचा, सन्मान शिक्षकांचा!

काही शिक्षक शाळेचा गोठा करतात तर काही शिक्षक आपल्या निष्काम कर्माच्या बळावर गोठ्याची शाळा करतात. सध्याच्या व्यावसायिक शिक्षण प्रणालीत शिक्षणाचा बाजार मांडलेल्यांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारे हाडाचे शिक्षक आजही महाराष्ट्रात आहेत, हे बघून ऊर भरून येतो. घरावर तुळशीपत्र ठेवून विद्यादान करणारे शिक्षक आता समाजात केवळ थोडेच उरले आहेत, हे अगदी ठामपणे सांगता येईल. कष्ट उपसण्याची तयारी, गरीब मुलांच्या शिक्षणाची धडपड, चांगले संस्कार आणि गरिबांच्या मुलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ज्यांनी गुरू म्हणून आपले कर्तव्य चोख बजाविले आहे, त्या सेवेचा गौरव व त्या शिक्षकांचा सन्मान करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या भारत सरकारचे मन:पूर्वक अभिनंदन. महाराष्ट्रातील दोन शिक्षकांना यंदाचा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यामध्ये गडचिरोली जिल्ह्याच्या एटापल्ली तालुक्यातील अतिदुर्गम जाजावंडी येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेचे शिक्षक मांतय्या बेडके व कोल्हापूर येथील जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक सागर बगाडे यांचा समावेश आहे. येत्या ५ सप्टेंबर रोजी दिल्ली येथे होणाऱ्या शिक्षक दिनाच्या कार्यक्रमात या दोन्ही कर्तबगार शिक्षकांचा सरकारकडून सन्मान केला जाणार आहे. त्या शिक्षकांना प्रत्येकी ५० हजार रुपये रोख व रजत पदक देऊन सन्मानित केले जाणार आहे. ही बाब संपूर्ण महाराष्ट्राकरिता गौरवाची आहे. एका निष्काम सेवेचा हा गौरव असून महाराष्ट्रात मांतय्या बेडके व सागर बगाडे यांच्यासारख्या हाडाच्या शिक्षकांची खरंच नितांत गरज आहे. एकीकडे बदलापूरसारख्या शहरातील शाळेत शिकविणाऱ्या शिक्षकाकडून चिमुकल्या मुलींची छेड काढली जाते, त्या शिक्षकाच्या किळसवाण्या कृत्याच्या निषेध नोंदविण्यासाठी लोकांना रस्त्यावर उतरावे लागते. संपूर्ण शिक्षकी पेशाला काळिमा फासण्याचा प्रयत्न करणाऱ्या अशा शिक्षकाविरुद्ध समाजात संतापाची लाट निर्माण होते. तर, दुसरीकडे मात्र पुरोगामी महाराष्ट्रातील गरिबांच्या मुलांसाठी झटणारे शिक्षकही महाराष्ट्राच्या मातीतच जन्माला आले आहेत, हे विसरून चालणार नाही. विद्यादानाचे कार्य करणारे शिक्षक त्यांच्या शिष्यांसोबतच गैरवर्तन करीत असतील तर त्यांना धडा शिकवायला आपण रस्त्यावर उतरतो आणि अशा शिक्षकांवर निश्चितच कारवाई होणे अपेक्षित आहे.

मात्र, जे शिक्षक प्रामाणिकपणे शासन दरबारी सेवा देऊन समाजाला दिशा देण्यासाठी व सदृढ समाज निर्माण करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत, त्या प्रामाणिक शिक्षकांचा गौरव केवळ सरकारनेच नाही तर समाजानेसुद्धा करण्याची गरज आहे. गडचिरोलीसारख्या दुर्गम भागात जिथे जायला रस्ते नाहीत, कुठल्याही सुखसोयी नाहीत अशा जाजावंडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत कार्यरत मांतय्या बेडके यांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार जाहीर झाला, ही बाब गडचिरोलीकरांसाठी गौरवाची आहे. ६०० लोकसंख्येचे गाव असलेल्या एटापल्ली तालुक्यातील जाजावंडीत पहिली ते चौथीपर्यंत पटावर फक्त सात विद्यार्थी होते. त्यातील चार विद्यार्थी शाळेत यायचे तर तीन विद्यार्थ्यांचा पत्ताच नव्हता. अशा परिस्थितीत मांतय्या बेडके यांनी २०१० ते २०११ च्या दरम्यान या शाळेत आपले पाऊल ठेवले आणि आज त्या शाळेत १४० विद्यार्थी आपल्या आयुष्याचा कित्ता गिरवायला सज्ज झाले आहेत. शाळेत जिथे विद्यार्थीच यायला तयार नसतात त्या शाळेच्या गुणवत्तेबद्दल बोलायलाच नको; मात्र माझीही मुले इतर शाळांतील विद्यार्थ्यांपेक्षा कमी राहू नये, असा चंग बांधलेल्या मांतय्या बेडकेंनी शाळेत विविध उपक्रम राबवायला सुरुवात केली आणि सरकारलादेखील आपल्या शाळेकडे लक्ष देण्याकरिता भुरळ घातली. शाळेच्या विद्यार्थ्यांनाच नाही तर बेडके यांनी विद्यार्थ्यांच्या निरक्षर पालकांनाही साक्षर करण्याचा वसा घेतला व गावातील १५० प्रौढांना साक्षर केले. शिक्षणाचे महत्त्व गावकऱ्यांना पटवून देण्यासोबतच बेडके यांनी शाळाबाह्य ३० मुलांना दत्तक घेऊन त्या मुलांच्या निवासाची व जेवणाची सोयदेखील शाळेच्या परिसरात करून त्या मुलांना शिकविण्यासाठी धडपड चालविली आहे. त्यांच्या या उपक्रमाची दखल घेऊन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आयुषी सिंह यांनी त्यांचे अभिनंदन करून त्यांच्या या सेवेचा सन्मान जिल्ह्यासाठी गौरवाची बाब असल्याचे बोलून बेडके शिक्षकाची जणू पाठ थोपटली. राज्यातल्या दोन्ही शिक्षकांना भारत सरकार शिक्षक दिनी गौरविणार आहे. येत्या काळात केवळ दोनच नाही तर प्रत्येक जिल्ह्यातील प्रत्येक शाळेतील शिक्षक गौरवास पात्र ठरतील, असा आशावाद व्यक्त करायला हरकत नाही.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# कोलकात्यातील घटनेचा शोध आणि बोध

कोलकाताच्या आर. जी. कार वैद्यकीय महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी डॉक्टरवरील बलात्कार आणि तिच्या निर्घृण हत्येच्या प्रकरणामुळे पश्चिम बंगालमधील ममता बॅनर्जी यांचे सरकार अडचणीत आले आहे. सुरुवातीपासूनच पश्चिम बंगाल सरकारने हे प्रकरण अतिशय संवेदनशून्यतेने तसेच बेजबाबदारपणे हाताळले. या प्रकरणात दोषी आरोपीसोबत 'इंद्राय स्वाहा तक्षकाय स्वाहा' या नात्याने मुख्यमंत्री म्हणून ममता बॅनर्जी यांनाही शिक्षा व्हायला पाहिजे. सामान्यपणे पुरुषांपेक्षा महिला अधिक संवेदनशील असतात, असे मानले जाते; पण ते फारसे खरे नसल्याचे दिसून आले. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्रिपदी एक महिला ममता बॅनर्जी असताना पश्चिम बंगाल पोलिसांनी तसेच एकूणच राज्य सरकारनेही हे प्रकरण संवेदनशीलतेने आणि पूर्ण जबाबदारीने हाताळले, असे म्हणता येत नाही. महाराष्ट्रातील बदलापूर येथेही पोलिस ठाण्यात एक महिला पोलिस निरीक्षक असताना तिने दोन शालेय चिमुकल्यांवरील बलात्काराची तक्रार बारा तासपर्यंत दाखल करून घेतली नव्हती. त्यामुळे पुरुषांच्या तुलनेत महिला अधिक संवेदनशील असतात, महिलांवरील अत्याचाराच्या बाबतीत पीडितांना न्याय देण्यासाठी त्या तत्पर असतात, चिडून उठतात, असे म्हणायची सोय राहिली नाही. हे प्रशासनातील एका महिला पोलिस निरीक्षकाने आणि राज्य सरकारच्या प्रमुख असलेल्या मुख्यमंत्र्यांनीही दाखवून दिले आहे.

१२ वर्षांपूर्वी देशाच्या राजधानीत निर्भया बलात्कार आणि तिच्या हत्येचे प्रकरण घडले होते, त्यावेळी त्या घटनेने संपूर्ण देश पेटून उठला होता. २०१४ मध्ये देशात संपुआ सरकारला सत्तेवरून खाली खेचण्यात त्या प्रकरणाचा आणि त्या प्रकरणावरून उठलेल्या असंतोषाचा मोठा हात होता, हे कोणालाही नाकारता येणार नाही. अशी घटना घडल्यानंतर संबंधित राज्य सरकार, प्रशासन आणि पोलिस यंत्रणेचा प्रयत्न पीडितेला न्याय देण्याऐवजी आणि दोषींना कठोरातील कठोर शिक्षा देण्याऐवजी त्या प्रकरणावर पांघरूण टाकण्याचा, ते दडपण्याचा असतो. सरकार आणि पोलिस यंत्रणा दोषींना पाठीशी का घालतात, हा अनाकलनीय मुद्दा आहे. अशा घटनेने सर्वसामान्य माणसाला जेवढा संताप येतो, तो पेटून उठतो, तेवढा संताप पोलिस प्रशासनाला का येत नाही, या प्रश्नाचे उत्तर आजवर मिळाले नाही. एकतर अशी प्रकरणे कशी हाताळायची, पुरावे कसे गोळा करायचे, दोषींना पकडून त्यांच्यावर न्यायालयात लवकरात लवकर आरोपपत्र दाखल करायचे, दोषींना कठोरातील कठोर शिक्षा होईल, याची काळजी कशी घ्यायची, याचे एकतर प्रशिक्षण पोलिसांना मिळाले नाही वा पोलिस यंत्रणा आर्थिक आमिषाला वा राजकीय दबावाला बळी तरी पडत असतील. या प्रश्नाचे तिसरे उत्तर नाही.

अशा कोणत्याही प्रकरणात संबंधित पोलिस ठाण्याची आणि तेथील पोलिस निरीक्षकाची म्हणजे जो पहिल्यांदा घटनास्थळाला भेट देतो, त्या चौकशी अधिकाऱ्याची भूमिका महत्त्वपूर्ण असते. अशा कोणत्याही प्रकरणात प्रथम तक्रार अहवाल (एफआयआर) कसा नोंदवला गेला, ते खूप महत्त्वपूर्ण असते. अनेक वेळा सदोष एफआयआरमुळे आरोपीला संशयाचा फायदा मिळतो. घटनेनंतर दहा-वीस वर्षांनंतर लागणाऱ्या निकालात तो निर्दोष सुटतो. त्यामुळे अशा प्रकरणाच्या एकूणच तपासावर आणि नंतरच्या संपूर्ण प्रक्रियेवर आयपीएस दर्जाच्या पोलिस अधिकाऱ्यांचे लक्ष नसते का, असा प्रश्न उपस्थित होतो. याचा अर्थ पोलिस खात्यातील सगळेच अधिकारी खराब आहेत, कार्यक्षम नाहीत असे नाही. काही चांगले, प्रामाणिक, संवेदनशील आणि जबाबदारीने काम करणारे अधिकारीही पोलिस खात्यात आहेत. पण दुर्दैवाने त्यांची संख्या कमी होत चालली आहे. निवृत्त झाल्यानंतर पोलिस महासंचालक आणि समकक्ष दर्जाचे दर्जाचे अनेक अधिकारी अशा एखाद्या घटनेनंतर पोलिसांनी असे करायला पाहिजे होते, तसे करायला पाहिजे होते, असे नाकाने कांदे सोलतात. पण ते जेव्हा अशा महत्त्वाच्या पदावर असतात, त्यांच्या हातात जेव्हा सर्व अधिकार असतात, त्यावेळी हे पोलिस अधिकारी खात्याला अशी शिस्त का लावत नाही, बलात्कार आणि हत्येसारख्या संवेदनशील प्रकरणाच्या तपासाचा प्रोटोकॉल का निश्चित करत नाही, असा प्रश्न देशातील सर्वसामान्य माणसाला पडला तर त्याला दोष कसा द्यायचा?

कोलकाता प्रकरणातील तपासाने आणि सर्वोच्च न्यायालयाच्या ताशेऱ्यांमुळे आपल्या अब्रूचे पुरते धिंडवडे निघाल्यानंतर पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना जाग आली. या बलात्कार आणि हत्येच्या प्रकरणातील आरोपींना कठोरातील कठोर शिक्षा होण्याची मागणी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे एका पत्रातून केली. हा प्रकार पाहून हसावे की रडावे ते समजत नाही. मुळात या प्रकरणाचा तपास राज्य सरकारच्या अखत्यारीतील पोलिसांकडे असताना ममता बॅनर्जी यांनी काय केले, तपासाचा बट्ट्याबोळ का केला, आरोपीची पाठराखण का केली, त्यावेळी पीडित मुलीबद्दल त्यांची ममता का जागृत झाली नाही, याचे उत्तर त्यांनीच दिले पाहिजे. नंतर ममता बॅनर्जी यांनी आपली खूर्ची डळमळीत झाल्यानंतर, मुख्यमंत्रिपद गमावण्याची वेळ आल्यानंतर या घटनेचा निषेध म्हणून कोलकात्यात धरणे आंदोलन केले, मोर्चाही काढला. हा प्रकार म्हणजे 'सौ चुहे खांकर बिल्ली हज को चली' असा म्हणावा लागेल. ममता बॅनर्जी यांनी आधीच संवेदनशीलता दाखवली असती आणि कोलकाता पोलिस जबाबदारीने वागले असते तर त्यांच्या अब्रूचे देशभर धिंडवडे निघाले नसते. या घटनेचे राजकारण करण्यापेक्षा पीडित मुलीच्या कुटुंबाला न्याय कसा मिळेल, दोषीला कठोरातील कठोर, अगदी मृत्युदंडाची शिक्षा कशी होईल, याची काळजी आता सीबीआयने घेतली पाहिजे तसेच भविष्यात अशा घटना घडणार नाही, यादृष्टीने उपाययोजना केल्या पाहिजे.

९८८१७१७८१७

### विकृत मनोवृत्ती थांबणार कशी?

कोलकाता येथील डॉक्टर भगिनीवर झालेला अमानुष अत्याचार आणि बदलापूर येथील दोन चिमुकल्या मुलींचे झालेले शोषण या दोन घटनांमुळे संपूर्ण भारत हादरला आहे. या दोन अमानुष व क्रूर घटनांना पुरुषांची विकृत मनोवृत्ती कारणीभूत ठरली आहे. अशा घटना दररोज घडत असतात आणि अबला नारी बळी पडतात. या अशा विकृत घटना घडूच नये यासाठी ठोस कृती कधी होणार आहे की नाही? स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारांमुळे पुरुष जातीकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला आहे. जिकडे तिकडे विकृत मनोवृत्तीचे व वासनांध पुरुष असतात की काय, अशी भीती वाटायला लागली आहे. एकीकडे आपण आपल्या संस्कृतीचे व धर्माचे गोडवे गातो आणि दुसरीकडे मात्र संस्कारहीन मनोवृत्ती बाळगतो. आसपासच्या आयाबहिणींकडे वासनांध व आसुसलेल्या डोळ्यांनी पाहणाऱ्या पुरुषांना आपण सगळ्यांनी मिळून पायबंद घातला पाहिजे. आपल्या गावात, घरी, शेजारी, शाळेत, रुग्णालयात व सरकारी कार्यालयात एखादा पुरुष स्त्रियांकडे, मुलींकडे वाईट नजरेने वा वासनांध हेतूने बघत असेल तर त्याला इतरांनी वेळीच इशारा दिला पाहिजे; पुन्हा असे घडले तर तुला पोलिसांच्या ताब्यात दिले जाईल, अशी सक्त ताकीदही दिली पाहिजे. नाहीतर बऱ्याच वेळा असे होते की, आपल्याला काय करायचे? म्हणून विकृत व वासनांध पुरुषांकडे आपण दुर्लक्ष करत राहिल्यास एखादी वाईट घटना घडते आणि आपण मेणबत्ती हातात घेऊन हिंडतो. त्यापेक्षा पुरुष व स्त्रियांनी मिळून आपल्या संपर्कातील वाईट व वासनांध पुरुषांचा वेळीच बंदोबस्त करावा.

**बबन गुळवे**/९५४५४४२६४८

●● ●●

### परतवाडा-अमरावती मेट्रो आवश्यक

नुकतेच नागपूर ते अमरावती मेट्रोमार्ग निर्मितीची घोषणा अनेकांना आनंद देऊन गेली. वेळेची बचत होण्यास याचा नक्कीच फायदा होणार आहे तसेच परतवाडा ते अमरावती हा ५० कि. मी.चा मार्ग सतत रहदारीने अत्यंत व्यस्त मानला जातो. राज्य मार्ग अरुंद असल्याने वाहनांची कोंडी, अपघात व रोही अशा वन्यप्राण्यांचे वाहनावर धडकणे तसेच दिवसरात्र हजारो प्रवासी एकमेव सडक मार्गानेच प्रवास करतात. हे सर्व धकाधकीचे आहे. एसटीसुद्धा दिवसभर असंख्य फेऱ्या मारूनदेखील गर्दी कायमच राहते. परतवाडा-अमरावती व पुढे नागपूर अशी मेट्रो सेवा निर्माण केल्यास खूप सोयीचे व वेळ वाचविणारे वरदान ठरणार आहे. नागपूर-अमरावती मेट्रो मार्गाचा आराखडा तयार करताना त्याचा विस्तार परतवाड्यापर्यंत अवश्य करावा. ही काळाची गरज आहे. या मागणीचा शासनाने अवश्य विचार करावा तसेच लोकप्रतिनिधींनी याबाबत पाठपुरावा करावा, अशी मेळघाटसहित लक्षावधी प्रवाशांची मागणी आहे.

**डॉ. राजा धर्माधिकारी**/परतवाडा

●● ●●

## वाचक पत्रे



### शेतीपूरक धोरण राबविण्याची गरज

आपल्या राज्यातील हवामान वैविध्यपूर्ण भौगोलिक स्थितीमुळे वेगवेगळे राहिले आहे. राज्याच्या एकूण ३०० लाख हेक्टर जमिनीपैकी अडीचशे लाख हेक्टरवर शेती केली जाते. शेती प्रामुख्याने पर्जन्यमानावर अवलंबून असल्याने आणि यंदाच्या खरीप हंगामात चांगल्या पावसाची शक्यता असल्याने शेती क्षेत्र वाढण्याची शक्यता आहे. राज्याच्या एकूण जमिनीपैकी दोन तृतीयांश क्षेत्र कृषी उत्पादनासाठी वापरले जाते. महाराष्ट्रातील शेती आजपर्यंतच्या हवामानाच्या अनुभव, अंदाजावर आधारित परंपरागत पद्धतीने केली जाते. विशेषकरून अल्पभूधारक शेतकरी पाऊसपाण्याच्या अनुभवावरच शेती करतो. राज्यातील मराठवाड्यातील काही भाग हा अवर्षणप्रवण क्षेत्रात मोडला जात असल्याने पाण्याची कमतरता कायम आहे. भौगोलिक वैविध्यामुळे राज्यात दोन हंगाम प्रमुख आहेत. जूनपासून ते सप्टेंबरपर्यंत खरिपाचा तर ऑक्टोबर ते मे रबीचा हंगाम असतो. रबी हंगाम हा सुरक्षित मानला जातो. यंदाच्या मोसमात राज्यभर मान्सून वेळेवर दाखल झाला आहे. पर्जन्यमानही पुरेसे असल्याने शेतीसाठी पूरक हवामान यावर्षी आहे. राज्यातील ८४ टक्के क्षेत्र खरीप म्हणजेच पावसाळी शेतीवर अवलंबून आहे. आणि उर्वरित १७ टक्के बागायती क्षेत्र असून ते साठवणूक केलेल्या पाण्यावर जसे की ओढे, तलावावर अवलंबून आहे. त्यामुळे बागायतीसाठी पावसाळ्यातील जलसंचय महत्त्वाचा मुद्दा आहे. राज्यात पुरेसा जलसंचय झाल्यास चारा छावण्यांची गरज भासणार नाही. उन्हाळ्यात जेवढी जास्त उष्णता तेवढेच अधिक बाष्पीभवन या नियमाने यंदाच्या तीव्र उन्हाळ्यानंतर येणाऱ्या पावसाळ्यामुळे हिरवी पालवी जास्त येऊ शकते. लोकसभेच्या निवडणुकीनंतर सत्ताधाऱ्यांनी विधानसभेच्या निवडणुकांच्या राजकारणात वेळ घालवताना निसर्गाच्या ओल्या हाकेकडेही अधिक लक्ष देण्याची गरज आहे.

**मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

●● ●●

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# मिळकत कराची रक्कम जमा न केल्याप्रकरणी वसुली लिपिक निलंबित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट -**

मिळकतदाराकडून कराची रक्कम घेऊन महापालिकेत जमा न केल्याप्रकरणी मालमत्ता कर विभागातील वसुली लिपिक राजेंद्र हत्तुरे यांना निलंबित केले आहे. महापालिका प्रशासनाकडून चौकशी होणार आहे. मालमत्ता कर विभागाच्या शहर तसेच हद्दवाढ भागातील कर वसुली कर्मचाऱ्यांना सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात मालमत्ता कर जास्तीत जास्त वसुल होण्याच्या दृष्टीने लागू करण्यात आलेल्या अभय योजनेअतर्गत वसुलपात्र मिळकतदारांकडून कराच्या रक्कम फक्त धनादेशाद्वारे स्वीकारण्याच्या सुचना वरिष्ठ पातळीवर देण्यात आल्या होत्या. अशावेळी मालमत्ता कर विभागाच्या हद्दवाढ विभागाकडे पेठ ५४ कडे कार्यरत वसुली लिपिक राजेंद्र हत्तुरे यांनी धनादेश स्वरूपात मालमत्ता कर वसुल करण्याऐवजी शास्तीची रक्कम वजा जाता, रोख स्वरूपात रक्कम स्विकारून ती रक्कम महापालिका कोषागारात जमा केली नसल्याचे निदर्शनास आले. ही बाब अत्यंत गंभीर, कार्यालयीन शिस्तीस बाधा पोहोचविणारी तसेच महानगरपालिकेची जनमानसातील प्रतिमा मलिन करणारी आहे.

कनिष्ठ श्रेणी लिपिक हत्तुरे यांच्याकडून महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) १९७९ चे नियम ३ (१) (एक व दोन) च्या तरतुदीचा भंग झाला असून त्यास सर्वस्वी ते जबाबदार आहेत. त्यांच्या या गैरवर्तनासाठी महाराष्ट्र नागरीसेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील तरतुदीनुसार त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याचे प्रस्तावित असून, त्याबाबत अधिक चौकशी करणे गरजेचे आहे. या चौकशीस बाधा येऊ नये म्हणून त्यांना या प्रकरणात निलंबित करण्यात येत असल्याचे महापालिका आयुक्तांनी काढलेल्या आदेशात नमूद आहे.

## निधन वार्ता

### डॉ. आनंद मुदकण्णा



**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**
येथील डॉ. आनंद मुदकण्णा यांचे बुधवारी (दि. २८) अल्पशा आजाराने निधन झाले. दुपारी त्यांच्या पार्थिवावर मुरूम येथील त्यांच्या निवासस्थानी अंत्यसंस्कार करण्यात आले.

### नागरबाई क्षीरसागर



**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**
देशमुख पाटील वस्ती येथील नागरबाई वसंत क्षीरसागर (वय ८१) यांचे बुधवारी (दि.२८)रोजी सकाळी निधन झाले. त्यांच्या पश्चात ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. राशनकर गुरुजी बुवा फड पंढरपूर यांचे चोफदार बापूराव वसंत क्षीरसागर यांच्या त्या मातोश्री होत.


## जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. २८९/२०२४**

**१) मंजुषा बाबासाहेब मुंढे,** रा. उक्कडगाव, ता. बार्शी, सोलापूर (असल्यास, तर्फे वकील पी. डी. जाधव) — **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**२) जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक,** ग्रामपंचायत, जामगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर — **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचे पती, बाबासाहेब सूर्यभान मुंढे, रा. उक्कडगाव, ता. बार्शी यांचा मौजे जामगाव (पा), ता. बार्शी येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक १५ डिसेंबर २००२ रोजी मृत्यू झालेला असून त्यांची मृत्यू नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराचे पती बाबासाहेब सूर्यभान मुंढे यांचा दिनांक १५ जुलै २००२ रोजी मौजे जामगाव (पा), ता. बार्शी येथे राहत्या घरी या ठिकाणी मृत्यू झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.
आज ता. १२ ऑगस्ट २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(गोल शिक्का)

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर



## वास्तु हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लि.

VASTU HOUSING FINANCE

युनिट 203 आणि 204, दुसरा मजला, ए विंग, नवभारत इस्टेट, झकेरिया बंदर रोड, शिवडी (पश्चिम), मुंबई 400015. महाराष्ट्र. CIN क्रमांक: U65922MH2005PLC272501

**ताबा सूचना**

तर, अधोस्वाक्षरीदार हे सिक्युरिटायझेशन अंतर्गत वास्तू हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेडचे अधिकृत अधिकारी आहेत आणि आर्थिक मालमत्तेची पुनर्रचना आणि सुरक्षा हितसंबंधांची अंमलबजावणी कायदा, 2002 आणि त्यांना दिलेल्या अधिकारांचा वापर करून सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम 2002 च्या नियम 9 सह वाचलेले कलम 13 (12), कर्जदारांना मागणी करणारी नोटीस जारी केली. संबंधित नोटीसमध्ये नमूद केलेल्या रकमेची परतफेड ही नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत करण्यासाठी येथे खाली नमूद केली आहे. कर्जदारांनी रकमेची परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, खाली स्वाक्षरीने खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे. या कायद्याच्या कलम 13(4) अन्वये मला दिलेले अधिकार खाली नमूद केलेल्या तारखेला उक्त नियमांच्या नियम ९ सह वाचले आहेत. विशेषतः कर्जदार आणि जामीनदार आणि सामान्यतः जनतेला याद्वारे सावध केले जाते की मालमत्तेशी व्यवहार करू नका आणि त्यांच्याशी कोणतेही व्यवहार करू नका. खाली नमूद केलेल्या रकमेसाठी मालमत्ता वास्तु हाउसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड शाखेच्या शुल्काच्या अधीन असेल आणित्यावरील व्याज, खर्च इ.

| अ. क्र. | कर्जदाराचे नाव, सह-कर्जदार आणि कर्ज खाते क्रमांक | तारीख आणि रक्कम डिमांड नोटीस अंतर्गत से. 13(2) | मालमत्तेचे वर्णन | तारीख आणि ताबा प्रकार |
|---|---|---|---|---|
| 1 | अझरुद्दीन मौला शेख, बेगमनिसा मौला शेख, मौला अमीन शेख, अलिशान अझरुद्दीन शेख **LP0000000123286** | 24 मे 2024 8,54,834 रु 23 मे 2024 | गट क्रमांक 275/2/1, प्लॉटचा पूर्व-दक्षिण कोपरा भाग क्र. 13, मौजे येथील ग्रामपंचायत घर क्र. 1110 कारंबा, सोलापूर, महाराष्ट्र, 413222; सुमारे 1000 चौ.फूट | 24-08-2024 रोजी प्रतिकात्मक ताबा घेतला |
| 2 | किशोर महादेव शिंदे कै (मृत) सर्व कायदेशीर वारसांद्वारे (अर्जदार), नम्रता किशोर शिंदे कै.किशोर महादेव शिंदे यांच्या पत्नी (सह अर्जदार आणि कायदेशीर वारस मयत अर्जदार), रुपाली महादेव शिंदे यांच्या मातोश्री कै किशोर महादेव शिंदे (कॉ अर्जदार आणि कायदेशीर वारस मयत अर्जदार), महादेव रातू शिंदे हे कै.किशोरचे वडील महादेव शिंदे (सह अर्जदार आणि मृत अर्जदाराचा कायदेशीर वारस), श्रावणी किशोर शिंदे यांची मुलगी कै.किशोर महादेव शिंदे (कायदेशीर मृत अर्जदाराचा वारस पालक), शिवम किशोर शिंदे कै.किशोर महादेव शिंदे यांचे सुपुत्र (मृत अर्जदाराचा कायदेशीर वारस गार्डियन द्वारे) **LP0000000103627** | 20-नोव्हेंबर-2023 रु. 16,71,920 पर्यंत 14-नोव्हेंबर-2023 | 1650 चौ.फूट आणि बिल्ट अप एरिया 1188 चौ.फुट मोजणारे, ग्रामपंचायत मिकत क्र. 317, येथे पांगरदारवाडी, तुळजापूर, उस्म ानाबाद, महाराष्ट्र 413623 | 24-08-2024 रोजी प्रतिकात्मक ताबा घेतला |
| 3 | सुशांत बंडू साठे, शोभा बंडू साठे, बंडू रामा साठे **HL0000000113463** आणि **LP0000000114451** | 20-जानेवारी-2024 रु. 26,40,571 आणि 6,11,415 रु 16-जानेवारी-2024 | जुना सर्व्हे नं. 840/2a ते 2c/2 नवीन सर्व्हे क्र. 156/2a ते 2c/2 प्लॉट क्रमांक 45, नवीन शिवाजीनगर, मिरज सांगली, महाराष्ट्र, 416410, वा क्षेत्र 187.00 चौ.मीटर, | 24-08-2024 रोजी प्रतिकात्मक ताबा घेतला |

**तारीख : 29/08/2024**
**ठिकाण : सोलापूर, सांगली**

अधिकृत अधिकारी,
**वास्तु हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लि**



## जाहीर प्रगटन

समर्थ महेश शेटे, महेश भुजंग शेटे, जयदेवी महेश शेटे व श्रुती अशोक बिडवे, सर्व रा. बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांनी दिनांक : २७/०८/२०२४ रोजी इक्वीटास स्मॉल फायनान्स बँक लि. शाखा बार्शी यांचे हक्कात मौजे बार्शी शहर, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील सिटी सर्वे क्रं. ३८९५/१अ/१/१७ब याचे क्षेत्र १९.६ चौ.मी. या घर मिळकतीचे नोटीस ऑफ इंटीमेटन नगनगनगनगनग गहाणखत क्रं. ३२४/२०२४ करुन दिलेले असून सदरील गहाण खताबद्दल कोणासही काही आक्षेप असल्यास जाहीर प्रगटनाच्या तारखेपासून ०७ (सात) दिवसांच्या आत खालील व्यक्तीशी संपर्क करावा.
तारीख : २८/०८/२०२४

सही/-
**ॲड. शेखर एस. गुंडपाटील**
रा. बार्शी,ता. बार्शी, जि. सोलापूर
मो.नं. ९८५०७८०१०५



## जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. २४५/२०२४**

**१) सौदागर माविक राऊत,** रा. कसबा पेठ, बार्शी, ता. बार्शी, सोलापूर (असल्यास, तर्फे वकील एस. एन. शेटे) — **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**२) जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी,** नगरपरिषद, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर — **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार, सौदागर माणिक राऊत, रा. कसबा पेठ, बार्शी, ता. बार्शी यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि. सोलापूर या ठिकाणी दिनांक २ जून १९५८ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार सौदागर माणिक राऊत यांचा दिनांक २ जून १९५८ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि. सोलापूर या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.
आज ता. १२ ऑगस्ट २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(गोल शिक्का)

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर



## वैराग नगरपंचायत, वैराग

आज़ादी का अमृत महोत्सव

**ता. बार्शी, जिल्हा. सोलापूर**
**स्थापना:- दि. १८/०५/२०२१**

### जाहीर सूचना

**(कचरा कुंडी मुक्त शहर-Bin Free City) ULB CODE-900860**

याद्वारे वैराग शहरातील नागरिकांना कळविण्यात येते की, स्वच्छ सर्वेक्षण २०२४ अंतर्गत वैराग नगरपंचायत रहिवासी भागातील कचरा घरोघरी जावून १००% संकलीत केला जातो. तसेच रहिवासी भागातील दिवसातून एकदा व व्यापारी व सार्वजनिक क्षेत्रातील दिवसातून दोनदा साफसफाई करण्यात येत असून व्यापारी व सार्वजनिक क्षेत्रात आवश्यक त्या ठिकाणी Litter Bins ची व्यवस्था केलेली आहे. तसेच रहिवासी भागातील सर्व कोंडावळे नष्ट केलेले आहेत. त्या अनुषंगाने वैराग शहर हे **कचरा कुंडी मुक्त शहर (Bin Free City)** म्हणून घोषित करण्यात येत आहे. तरी याद्वारे सर्व नागरिकांना सूचित करण्यात येते की, नागरीक, व्यापारी व व्यावसायिक यांनी उघड्यावर कचरा न टाकता वैराग नगरपरिषदेच्या घंटागाडीमध्ये वर्गीकृत करून टाकणेत यावा. अन्यथा घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २०१६ अन्वये कायदेशीर कारवाई करणेत येईल याची सर्व नागरिकांनी स्पष्ट नोंद घ्यावी.

**जाहीर सूचना (BWG)**
**ULB CODE-900860**

वैराग शहरात स्वच्छ सर्वेक्षण २०२४ ची प्रभावीपणे अंमलबजावणी सुरु आहे. तरी याद्वारे वैरागशहरातील नागरिकांना कळविण्यात येते की, वैराग नगरपंचायत हद्दीतील ५० ते १०० किलो अथवा पेक्षा जास्त कचरा निर्माण करणारे स्थळ (BWG) यांनी त्यांच्याकडे निर्माण होणाऱ्या ओल्या कचऱ्याची निर्मिती स्थळीच प्रक्रिया करून विल्हेवाट लावावी. तसेच निर्माण होणारा सुका कचरा हा नगरपंचायतेच्या घंटागाडीत टाकावा. (BWG) Bulk Waste Generator यांनी इतरत्र कोठेही कचरा टाकू नये. अन्यथा आपणांवर घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २०१६ अन्वये कायदेशीर व दंडात्मक कारवाई करणेत येईल याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**मुख्याधिकारी,**
**वैराग नगरपंचायत, वैराग**



## जाहिर पब्लिकेशन

बदल अर्ज क्र. १२९६/२४
किरकोळ अर्ज क्र. १२९७/२४

### सोलापूर येथील मे. धर्मादाय उप आयुक्त साहेब / सहाय्यक धर्मादाय आयुक्त साहेब यांच्या न्यायालयात

**सद्संकल्प शिक्षण व समाजसेवा संस्था, सोलापूर नोंदणी क्र. एफ १४७३ सोलापूर** या संस्थेचे उद्देशात, घटना नियम नियमावली वाढ व बदल करण्या बाबत घटना दुरुस्ती अर्ज दाखल केला आहे. अर्जदार **श्री. अण्णासाहेब नामदेव भालशंकर** यांनी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय येथे दाखल केलेले आहे. सदर संस्थेच्या उद्देशात, घटना नियम नियमावली मध्ये बदल व वाढ करण्यात आले आहे. सदर प्रकरणामध्ये कुणालाही कुठल्याही विश्वस्तांना 'किंवा सभासदांना जर हरकत घ्यायचे असेल त्यांनी सदरची जाहिर पब्लिकेशन प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसाच्या आत स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत सदर अर्जास उत्तर देणे कामी मे. कार्यालयात हजर व्हावे अन्यथा सदरचे मे. कार्यालय हे वर नमुद संस्थेचे संस्थेच्या उद्देशात, घटना नियम नियमावली मध्ये बदल व वाढ बाबतचे प्रकरण एकतर्फी चालवुन सदरचा अर्ज निकाली काढतील. त्यानंतर कोणतेही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.
हे जाहिर पब्लिकेशन केले ता. २७/०८/२०२७

शिक्का

**सही/-**
**(एस.एस. कुमठेकर)**
**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**सोलापूर विभाग, सोलापूर**



## चुकीची दुरुस्ती

दैनिक तरुण भारतमध्ये दि. २८/०८/२०२४ रोजी ॲड. वीरसेन लक्ष्मण फुलझळके यांची खरेदीपूर्व जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर त्या खरेदीपूर्व जाहीर नोटीसीमध्ये **भूमापन क्र./गट क्र.१५०/१/अ/९/२** असे प्रसिध्द झाले आहे. तरी त्याऐवजी **भूमापन क्र./गट क्र.१५०/१/अ/१/२** असे वाचण्यात यावे. ही विनंती.

**जाहीरात व्यवस्थापक**



## वैराग नगरपंचायत, वैराग

### जाहीर प्रगटन

**जा.नं.१८४०/२०२४ दिनांक २७/०८/२०२४**
**फा.नं. नामांतरण २८१५/२०२४ प्रकरण**

सर्व नागरिकांना कळविणेत येते की, श्री. संगीत रामचंद्र कसबे, सि.स.नं. -, गट नं. - प्लॉट नं. - न.प. मिळकत नं. १८४७/१ चे वर नामांतर करिता अर्ज दाखल केला आहे. त्यची चतुःसिमा खालीलप्रमाणे आहे.
पूर्व - कसबे, पश्चिम - कसबे, दक्षिण - रस्ता, उत्तर - काळे
वरीलप्रमाणे नामांतरणाबाबत ज्या कोणास जो काही आक्षेप असेल तो (१५) दिवसाचे आत इकडील कार्यालयास दाखल करावा नसता मुदतीनंतर कोणीतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

**शिक्का**

**सही/-**
**कर निर्धारण अधिकारी**
**वैराग, नगरपंचायत, वैराग**



## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

खरेदीपुर्व जहीर नोटीस तमाम लोकंना विशेषतः मौजे राजुरी, ता. सांगोला, जि. सोलापूर येथील व परिसरातील लोकांना ॲड. श्री. सुधीर नंदकुमार वाघ बी.ए. एलएल.बी., रा. सांगोला, यांचेमार्फत कळविणेत येते की,

**१) मिळकतीचे वर्णन -** तुकडी सोलापुर, पोटतुकडी व तालुके सांगोला पैकी मौजे राजुरी येथील सोलापुर जिल्हा परिषेदेच्या अधिकार क्षेत्रातील तालुका सांगोला पंचायत समिती हद्दीतील मौजे राजुरी ग्रामपंचायत हद्दीतील मिळकत जमिन गट नं. ७१२/३ क्षेत्र ० हे, ०० आर, पो.ख. १४९ हे ८८ आर आकार ० रु.०० पैसे पैकी क्षेत्र ० हे. ०० आर, पो.ख. १७ हे-६० आर, आकार ० रु.०० पैसे पैकी क्षेत्र ० हे ०० आर, पो.ख २ हे ८० आर, आकार ० रू.०० पैसे यासी चतुःसिमा पुर्व - गट नंबर ७११/१, दक्षिण - गट नंबर ७१२/३ पैकी हात्तीद जवळा रस्ता, पश्चिम - राजुरी हटकर मंगेवाडी रस्ता, उत्तर - गट नंबर ७०९, चालू वहिवाटीचे रस्त्याने येणेजाणेचे हक्कासह ही मिळकत अजितकुमार मिलापचंद जैन यांचे खरेदी मालकी हक्क प्रत्यक्ष कब्जे वहीवाटीची मिळकत असून सदर मिळकतीबाबत अजितकुमार मिलापचंद जैन यांचे व आमचे अशिल श्रुती इंडस्ट्रीज तर्फे संचालक श्री. संजय बन्सीलाल जग्गी रा. प्लॉट न सी. २१. एम.आय.डी.सी. अहमदनगर, नगर, अहमदनगर, महाराष्ट्र ४१४१११ यांचे दरम्यान कायमखुष खरेदी विक्रीचा व्यवहार ठरला असून सदर मिळकत निर्वेध, निजोखमी, असलेबाबत आमचे अशिलांना अजितकुमार मिलापचंद जैन यांनी खात्री व हमी दिलेली आहे.

**२)** सबब सदरील मिळकतीवर कोणाचा खरेदी विक्री, तारण, गहाण, लीज, दान, पोटगी, बक्षीसपत्र, बँकेचा बोजा, वहीवाट अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसात आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील नमुद पत्यावर संपर्क करून कागदपत्रांसह शहानिशा करून द्यावी. अन्यथा आमचे अशिल सदर मिळकतीबाबत कोणाची कसलीही तक्रार नाही असे समजुन कायमखुष खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही कोणाची कसलीही फसगत होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे. ता. २८/०८/२०२४.

**सही/-**
**(अशिलातर्फे ॲड)**
**ॲड. एस.एन. वाघ**
**रा. सांगोला, ता. सांगोला, जि. सोलापूर.**
**मोबाईल नं. ७८७५७१९९०९.**
**ऑफिस पत्ता - चंद्रमाला, कुंभार गल्ली, सांगोला, ता. सांगोला, जि. सोलापूर.**



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, जिल्हा व उपजिल्हा सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका हद्दीतील पेठ-न्यू पाच्छा पेठ येथील एकता नगर पोलीस व सरकारी आजी/माजी कर्मचारी सहकारी भाडेकरु मालकी गृहनिर्माण संस्था मर्यादित, सोलापूर या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या संस्थेमधील टी.पी. स्कीम नं.१, सिटी सर्व्हे नं. १०३८५, फायनल प्लॉट नं.३० (अ), सब प्लॉट नं.१०८-ब याचे एकूण क्षेत्र ६८ चौ. मीटर किंवा ७३१.६८ चौ. फुट इतकी असून, यांची हद्द पूर्व पश्चिम-उत्तर बाजूस-११.७४ व दक्षिण बाजूस १०.७४ X दक्षिण उत्तर ६.०५ चौ.मी. अशी आहे. यात २० चौ.मी. क्षेत्राचे आरसीसी पध्दतीचे बांधकामाच्या दोन खोल्या व यात संडास, बाथरुम, नळ व लाईट कनेक्शन आहे. यांसी सो.म.नं.१६६५०५ असे आहे. यांसी चतुःसिमा :- पुर्वेस - प्लॉट नं. १०४ब व १०५ब, पश्चिमेस - रस्ता, दक्षिणेस - प्लॉट नं. १०७-अ, उत्तरेस - प्लॉट नं.१०९-ब.

येणेप्रमाणे वर वर्णन केलेली घरजागा ही श्री. जहांगीर महंमद शेख यांचे मालकी व कब्जेवहिवाटीची आहे. सदरची घरजागा ही आमचे अशिल यांना विक्री करण्याचे ठरवून त्यापोटी आमचे अशिलाकडून इसारा रक्कम स्विकारुन तशी इसारापावती लिहून दिली आहे. सदर वर नमूद केलेली घरजागा ही निर्वेध व निजोखमी असल्याची हमी व खात्री वरील नमूद मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे.

तरी परंतु वर नमूद घरजागेवर अन्य कोणत्याही बँकेचे, वित्तीय संस्थेचे अथवा अन्य कोणाचेही, कसल्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध व अधिकार, टाच, दान, लिज, साठेखत, पोटगी, कोर्ट दावा, गहाणखत, तारण वा बोजा वगैरे असल्यास त्यांनी ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसाच्या आत खालील पत्यावर लेखी कागदोपत्री हरकत आणून द्यावी. कोणाचेही कसलेही हरकत वा तक्रार मुदतीत न आल्यास आमचे अशिल वरील मिळकतीचे पुढील व्यवहार पुर्ण करतील याची नोंद घ्यावी.

ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली ता. २८/०८/२०२४.

**सही/-**
**ॲड. पुजा महादेव नाईकवाडे**
**रा. ५७६, न्यु पाच्छा पेठ, सोलापूर**
**मो.नं.९९७०७६७३०६/९५११६५३५७७**
**अशिल तर्फे ॲडव्होकेट**



## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविण्यात येते की, डिस्ट्रीक्ट व सब डिस्ट्रीक्ट सोलापूर पैकी, तालुका उत्तर सोलापूर पैकी मौजे मजरेवाडी पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दीतील डी. आय.सी. ऑफिससमोर, होटगी रोड, सोलापूर येथील भुमापन क्र. / गट क्र.१५०/१/अ/३ यांसी एकूण क्षेत्र १५०० चौ.मी. यांसी आकार ०० रुपये ०० पैसे, यांसी चतुःसिमा :- पुर्वेस - भुमापन क्र. १५०/१/अ/२, पश्चिमेस - सेंट्रल एक्साईज ऑफिस, दक्षिणेस रस्ता, उत्तरेस रस्ता, त्यामध्ये असलेल्या तदंगभूत वस्तुसह पैकी विक्री करत असलेले क्षेत्र १२२० चौ.मी. यांसी

चतुःसिमा :- पूर्वेस - भुमापन क्र.१५०/१/अ/२, पश्चिमेस - सेंट्रल एक्साईज ऑफिस, दक्षिणेस - भूमापन क्र.१५०/१/अ/३ पैकी शिल्लक जागा, उत्तरेस - रस्ता, त्यामध्ये असलेल्या तदंगभूत वस्तुसह

येणेप्रमाणे चतुःसीमेतील बिगरशेती जागा ही स्वाती रघुनंदन दहिहंडे, रा. सोलापूर यांच्या मालकीची व कब्जे वहिवाटीची असून सदर जागा ही आमचे अशिलांनी यांना खूषखरेदीने विक्री करण्याचे ठरविले आहे.

सदर जागा ही निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री आमचे अशिलांनीदिलेली आहे. तरी सदर जागेबाबत कोणाचाही व कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास किंवा पोटगी, लिज, दान, टाच, हक्कसोडपत्र, साठेखत, खरेदीखत, गहाणखत इसारापावती व अन्य कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास सदरची जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ (सात) दिवसाच्या आत योग्य कागदपत्रांसह खालील पत्त्यावर लेखी कळवावे. या मुदतीच्या आत कोणाचीहि व कसलीही हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणत्याही स्वरुपाची हरकत आल्यास ती आमचे अशिलांवर व सदरहू मिळकतीवर मुळीच बंधनकारक राहणार नाही, यांची नोंद घ्यावी.

ही खरेदीपूर्व जाहिर नोटीस दिली ता. २९/०८/२०२४

**सही/-**
**जागा विकत घेणार**

**सही/-**
**ॲड. विरसेन लक्ष्मण फुलझळके**
**बी.ए., एलएल.एम.**
**पत्ता. द्वरा चेंबर नं. ४१,**
**जिल्हा न्यायालय आवार, सोलापूर.**
**मोबा. नं.- ९५७९६९५५३७**
**अशिला तर्फे ॲडव्होकेट**



## जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. २७०/२०२४**

**१) दिगंबर मारुती चौगुले,** रा. मानेगाव, ता. बार्शी, सोलापूर (असल्यास, तर्फे वकील रोहित आर. घोडके) — **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**२) जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी,** नगरपरिषद, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर — **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचा मुलगा, समर्थ दिगंबर चौगुले, रा. मानेगाव, ता. बार्शी यांचा मौजे वैराग, ता. बार्शी गोवर्धन हॉस्पिटल वैराग या ठिकाणी दिनांक ८ जानेवारी २०१६ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराचा मुलगा समर्थ दिगंबर चौगुले यांचा दिनांक ८ जानेवारी २०१६ रोजी मौजे वैराग ता. बार्शी, गोवर्धन हॉस्पिटल वैराग या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.
आज ता. १२ ऑगस्ट २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(गोल शिक्का)

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर



## जाहीर प्रसिद्धीकरण

तमाम लोकांना विशेषतः डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे सौंदरे, ता. बार्शी, जि. सोलापूर या भागातील खालील शेतजमिनीचे मिळकतीबाबतचे या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते ते खालीलप्रमाणे असे की,

मौजे सौंदरे, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील गट नं. ६०५ क्षेत्र हे. ००-८६ आर, आकार रु. ०२-२९ पैसे, गट नं. ६१२ क्षेत्र हे. ०१-१७ आर, आकार रु. २०-५० पैसे, गट नं. ६१९ क्षेत्र हे. ००-२८ आर, आकार रु. ००-५३ पैसे, गट नं. ६०४ क्षेत्र हे. ००-६५ आर, आकार रु. ०१-६२ पैसे, गट नं. ६२० क्षेत्र हे. ००-२९ आर, आकार रु. ००-५३ पैसे गट नं. ५९८ क्षेत्र हे. ००-८७ आर, आकार रु. ०२-५० पैसे. येणेप्रमाणे वर्णनाची शेतजमिनी या वडिलोपार्जित एकत्र कुटुंबाच्या होत्या आहेत. असे असताना सदर मिळकतीचे खातेदार कै. कृष्णा महादेव कानगुडे यांचे नावे होत्या व आहेत. ते दि. २४/०४/२०२४ रोजी मयत झालेले आहेत. त्यांचे मिळकतीबाबत बार्शी न्यायालयात वाटपाचा रे.मु.नं. ३८२/२०२४ चा दावा दाखल आहे. सदर मिळकतीमधील गट नं. ५९८ मधील क्षेत्र हे. ००-६० आर,चे खोटे लबाडीचे बोगस कविता नारायण नाईकवाडी हिने सदर मिळकतीचे खातेदार कॅन्सरचे आजारी असताना पोकळ, खोटे, लबाडीचे बोगस, बेकायदेशीर मजकुराचे मृत्यूपत्र करुन घेतलेले असून त्या मृत्युपत्राचे आधारे गट नं. ५९८ मधील ६० आर क्षेत्राची फेरफार नोंद नं. ४७९६ ने ७/१२ उतारेवर गावकामगार तलाठी व मंडळ अधिकारी यांचेशी संगनमत करुन नोंद करुन घेतलेली आहे. ती सदरची नोंद बेकायदेशीर आहे. तरी पण त्या नोंदीचे आधारे वरील नोंदीचे आधारे सदर मिळकतीचे विल्हेवाट लावण्याच्या विचारात आहे. तरी कविता नारायण नाईकवाडी हिचे बरोबर बेकायदेशीर असे दान, गहाण खते, साठेखत, खरेदीखत, सावकारी कर्ज वगैरे हस्तांतरणाचे व्यवहार करु नयेत. या उपर बेकायदेशीर सदर व्यवहार केल्यास आमचे इतर संबंधित हिस्सेदारावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून हे जाहीर प्रसिद्धीकरण या नोटीसीद्वारे केले आहे.

कळावे, हे जाहीर प्रसिद्धीकरण असे. दिनांक : २७/०८/२०२४

सही/-
**श्री. माणिकराव एल. मुंढे, ॲडव्होकेट,**
जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर
अशिलातर्फे ॲडव्होकेट मो.नं. ९९२३९६८६५५



## श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

SHRIRAM HOUSING FINANCE

**मुख्य कार्यालय:** लेव्हल-३, वोक्खार्ड टॉवर्स, ईस्ट विंग, सी-२ ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१;
**दूरध्वनी:** ०२२ ४२४१ ०४००, ०२२ ४०६० ३१०० **वेबसाइट:** http://www.shriramhousing.in
**नोंदणीकृत कार्यालय:** कार्यालय क्रमांक १२३, अंगप्पा नायकन स्ट्रीट, चेन्नई-६०० ००१; **शाखा कार्यालय:** कार्यालय क्र. एफ-३, पहिला मजला, कनाळे प्लाझा, डफरीनचौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर – ४१३००१

**परिशिष्ट-४-ए [नियम ८(६) ची तरतूद पहा] स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना**

**सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रकशन ऑफ फिनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टेरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचिता सिक्युरिटी इन्टेरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स , २००२ च्या नियम ८ (६) तरतुदीअनव्ये स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई - लिलाव विक्री सूचना.**

सर्व सामान्य जनतेस व विशेषतः कर्जदार, तारणकर्ता / कर्ते आणि जामीनदाराना येथे सूचना देण्यात येत आहे कि, श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेडकडे तारण /अधिभारीत असलेल्या खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्तेचा वास्तविक ताबा श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (एसएचएफएल) सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतलेला आहे आणि खाली नमूद केलेले कर्जदार व जामीनदारांकडून श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड यांना देय असलेली खाली तक्त्यात नमूद रक्कम वसुलीकरिता खाली दिलेल्या तपशिलानुसार लिलावाच्या आधारावर **'जसे आहे जेथे आहे', 'जसे आहे जे आहे' आणि 'जसे जेथे आहे ' या तत्वावर दिनांक ३०/०९/२०२४ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० वा** या वेळेत विक्री केली जाईल. कर्जदार/जामीनदार / तारणकर्ता , देय रक्कम , स्थावर मालमत्तेचे लघु वर्णन व ज्ञात अधिभार , ताबा प्रकार , आरक्षित मुल्य व इसारा रक्कम आणि वाढीव मूल्याचे तपशील खालीलप्रमाणे :

| कर्जदार/सहकर्जदार/ जमानतदार/ तारण ठेवण्याऱ्यांचे नाव | तारीख व रक्कम १३(२) डिमांड सूचनेनुसार | संपत्तीचे विवरण | राखीव किंमत (रु. ) आणि वाढीव बोली | अनामत राशी ठेवींचा (ईएमडी ) तपशील | लिलावाची तारीख व वेळ | व्यक्तींचे संपर्क आणि सर्वेक्षण तारीख |
|---|---|---|---|---|---|---|
| **(१). श्री अर्जुन दशरथ आसदे (कर्जदार ), (२). सौ. रेणुका अर्जुन आसदे (सह-कर्जदार) सर्वांचा निवास पत्ता येथे आहे: फ्लॅट नं. १, पहिला मजला, "यशश्री अपार्टमेंट" प्लॉट क्र. १५, एस. क्र. १३२/१A (नवीन) {जुना क्र. ३०५}, नरसिंग नगर, केएलई शाळेच्या मागे, मजरेवाडी, जुळे सोलापूर, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर- ४१३००४ आणि येथे पत्ता देखील आहे: बी.एल. क्रमांक २६, बापूजी नगर, महालक्ष्मी मंदिराजवळ, सोलापूर- ४१३००३ लॅनः SHLHSOLR0000227**<br>**ताबा दिनांक व ताबा प्रकार**<br>**५ जुलै २०२४ भौतिक ताबा**<br>**ज्ञात अधिभार** ज्ञात नाही | **मागणी सूचना दिनांक: २०.०६.२०२३** दिनांक १२/०६/२०२३ रोजी कर्ज खाते क्र. SHLHSOLR0 000227 अंतर्गत रु. २७,४६,९५०/- (रुपये सत्तावीस लाख छचाळीस हजार नऊशे पन्नास फक्त) संविदात्मक दराने पुढील व्याजासह, उक्त सूचना प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत . | स्थावर मालमत्तेचे ते सर्व तुकडा आणि पार्सल, फ्लॅट क्र.०१, पहिल्या मजल्यावर, कार्पेट क्षेत्रफळ ३८.२८ चौ. मीटर, "यशश्री अपार्टमेंट" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीत, प्लॉट क्र. १५ सर्व्हे नं.३०५ (जुना) आणि १३२/१ ए (नवीन) वर बांधण्यात आलेले असून ते मजरेवाडी, जुळे सोलापूर, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर, येथे स्थित आहे आणि खालीलप्रमाणे सीमा:- उत्तर:- फ्लॅट क्रमांक २ आणि फ्लॅट क्रमांक ११, दक्षिण:- ९ मीटर रस्ता आणि आकाशात मोकळा. पूर्व:- फ्लॅट क्रमांक ४, पश्चिम:- प्लॉट क्रमांक १७ नरसिंग नगर, | रु. २३,८६,५००/- रुपये तेवीस लाख श्याऐंशी हजार पाचशे फक्त) **बोली वाढविणे :** रु. १०,०००/- आणि त्यापटीने<br>**बयाणा ठेव रक्कम (ईएमडी ) (रुपयात )**<br>रु. २,३८,६५० /- (रुपये दोन लाख अडतीस हजार सहाशे पन्नास फक्त) **ईएमडी सादर करण्याची अंतिम तारीख : २८ सप्टेंबर २०२४ वेळ : सकाळी १० ते सायं. ५.००** | ईएमडी रक्कम खाली नमूद केलेल्या खात्याच्या तपशिलानुसार आरटीजीएस / एनईएफटी स्वरूपात जमा करावी: **बँकेचे नाव-** ॲक्सिस बँक लिमिटेड **शाखा:** वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई **बँक खाते क्रमांक-** चालू खाते क्रमांक ९११०२००४५६ ७७६३३ **आयएफएससी कोड-** यूटीआयबी ००००२३० | **३० सप्टेंबर २०२४ वेळ : सकाळी ११ वा. ते दुपारी १२.००** | **सुनील मानेकर ८९९३४४८९७ अश्फाक पत्का- ९८१९४ १५४७७ मयूर भोजने ८८९८५२७०७६ निरीक्षण तारीख: १४ सप्टेंबर. २०२४ वेळ: दुपारी १२..०० वा. ते ३.००** |

कोणतेही कारण न देता काही किंवा सर्व बोली नाकारण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकारी राखून ठेवीत आहे. लिलावाचे नियम व अटी आणि निविदा सादर करण्याची / बोली अर्ज प्राप्त करण्याची जागा / निविदा उघडणे व लिलाव प्रक्रिया यासंबंधी तपशिलांसाठी कृपया संकेतस्थळाला भेट द्या, कृपया श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या संकेतस्थळाला भेट द्या जे संकेतस्थळाच्या **https://shriramhousing.in/e-auction-Residential** या पत्त्यावर श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
ऑनलाईन लिलाव आमची लिलाव एजन्सी सी१ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, पत्ता: प्लॉट क्र.६८, ३ रा मजला, सेक्टर–४४, गुरूग्राम – १२२००३, हरयाणा यांच्या **https://www.bankeauctions.com** या वेबसाईटवर पार पाडला जाईल. कोणत्याही सहाय्यासाठी, तुम्ही tn@c1india.com, support@bankeauctions.com या इमेल आयडीवर इमेल पाठवू शकता.

सूचना: कृपया नोंद घ्या की सिक्योर्ड क्रेडीटर कर्ज घेणा–याला / खात्रीदाराला सेल नोटीस जारी करणार आहे जी स्पीड / रजिस्टर पोस्ट / कुरियर केली जाईल. जर कोणत्याही पक्षाला ती न मिळाल्यास हे सेल नोटीसचे प्रकाशन सेवेचा पर्यायी मार्ग असे समजले जाईल.


**सरफेसी कायदा,२००२ च्या नियम ८(६) अन्वये वैधानिक ३० दिवसांची विक्री सूचना:**
कर्जदार / तारणकर्ता / जामिनदार यांना येथे सूचित करण्यात येत आहे की, ई–लिलावाच्या तारखेपूर्वी अर्थात ३०/०९/२०२४पूर्वी अद्ययावत व्याज व अनुषंगिक खर्चांसह वर नमूद केलेली संपूर्ण रक्कम जमा करावी, अन्यथा मालमत्तेचा लिलाव / विक्री केली जाईल आणि उर्वरित रक्कम असल्यास ती व्याज व शुल्कासह वसूल करण्यात येईल.

ठिकाण - सोलापूर
दिनांक - २९-०८.२०२४

स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी
श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

## महत्त्वाचे

### अमेरिकन ओपनमध्ये रंगला विक्रमी वेळचा सामना



**न्यू यॉर्क** : प्रतिष्ठेच्या ग्रॅण्ड स्लॅम- अमेरिकन ओपन टेनिस स्पर्धेत सर्वाधिक वेळच्या सामन्याचा विक्रम नोंदवला गेला. डॅन इव्हान्स व खाचानोव्ह यांच्यादरम्यानचा सामना तब्बल ५ तास ३५ मिनिटे रंगला. एका तासापेक्षा जास्त वेळानंतर इव्हान्सने अमेरिकन ओपनमध्ये १९७० मध्ये टायब्रेकर सुरू केल्यापासून सर्वात लांब सामना जिंकला. त्याने ५ तास ३५ मिनिटे झुंज देत कॅरेन खाचानोव्हवर ६-७ (६), ७-६ (२), ७-६ (४), ४-६, ६-४ असा विजय नोंदविला. यापूर्वीचा विक्रम ५ तास २६ मिनिटांचा होता. १९९२ च्या उपांत्य फेरीत स्टीफन एडबर्गने मायकेलला पाच-सेटरमध्ये पराभूत केले होते. २३ व्या मानांकित खाचोव्हविरुद्धचा चौथा सेट गमावल्यानंतर इव्हान्स पाचव्या सेटमध्ये प्रारंभी ०-४ ने पिछाडीवर राहिला, मात्र त्यानंतर ३४ वर्षीय इव्हान्सने जोरदार मुसंडी मारली व विजयश्री केचून आणली. मी पाच तास खेळलो आहे, यावर माझा विश्वास बसत नाही. कारण मी कधीही दोन तास, दोन तास सराव केला नाही. साधारणपणे दीड तास असतो. मात्र आता अंग दुखत आहे. विशेषतः हात-पाय दुखत आहे, असे इव्हान्स म्हणाला.

# कसोटी क्रिकेटला प्राधान्य : जय शाह

**◆ नवी दिल्ली, २८ ऑगस्ट**

कसोटी क्रिकेट हा आमच्या खेळाचा पाया आहे, हे सुनिश्चित करण्यासाठी आपण कसोटी क्रिकेटला प्राधान्य देणर आहे. क्रिकेटच्या विकासासाठी अडथळे दूर करण्याचा प्रयत्न करणार आहे, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे (आयसीसी) नवनिर्वाचित अध्यक्ष जय शाह म्हणाले.

३५ वर्षीय जय शाह हे सध्या बीसीसीआयच्या सचिवपदावर असून ते ग्रेग बार्कले यांचा उत्तराधिकारी म्हणून दनो वर्षांच्या कार्यकाळासाठी १ डिसेंबर रोजी आयसीसीचे सर्वात युवा अध्यक्ष म्हणून पदभार स्वीकारतील.

टी-२० क्रिकेट हा नैसर्गिक निवडक फॉर्मेट आहे. परंतु कसोटी क्रिकेटला प्राधान्य देणे तितकेच महत्त्वाचे



आहे. कारण ते आमच्या खेळाचा पाया आहे. क्रिकेटपटूंना कसोटी क्रिकेटला चालना दिली पाहिजे व आमच्या प्रयत्नांमुळे ते सर्व कसोटी क्रिकेटकडे वळतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

कसोटी क्रिकेटचा दर्जा उंचावणे शक्य आहे व त्याकरिता सर्वांना प्रयत्न करावे लागतील. कसोटी क्रिकेटला अधिक सुंदर करण्याच्या कार्यासाठी आयसीसी अध्यक्ष म्हणून पुढाकार घेत व ते पूर्णत्वास नेण्यास मी कटिबद्ध आहे, असे ते म्हणाले.

जय शाह हे केंद्रीय मंत्री अमित शाह यांचे चिरंजीव आहेत. दिवंगत जगमोहन दालमिया, शरद पवार, एन श्रीनिवासन् व शशांक मनोहर यांच्यानंतर आयसीसीया अध्यक्षपदावर निवडून येणारे जय शाह हे पाचवे भारतीय ठरले.

२०२८ मध्ये ऑलिम्पिकमध्ये ऐतिहासिक पदार्पण करण्याच्या तयारीत असताना, आम्ही एका परिवर्तनीय युगाच्या उंबरठ्यावर उभे आहोत. हा प्रसंग केवळ मैलाचा दगड नाही, तर या क्रीडा महाकुंभात सहभागी असलेल्या आपल्या सर्वांसाठी हा एक महत्त्वाचा संदेश आहे, असे ते म्हणाले. ◄(वृत्तसंस्था)

# गुकेश-गिरी, प्रज्ञानंद-फॅबियानो लढत बरोबरीत

### सिंकफिल्ड चषक बुद्धिबळ

**◆ सेंट लुईस, २८ ऑगस्ट**

येथे सुरु असलेल्या ग्रॅण्ड चेस टूर-सिंकफिल्ड चषक बुद्धिबळ स्पर्धेत आठव्या फेरीत भारताचे ग्रॅण्डमास्टर डी. गुकेश व आर. प्रज्ञानंद यांनी आपापले सामने बरोबरीत राखले.

जागतिक बुद्धिबळ स्पर्धेतील आव्हानकर्ता डी. गुकेशने नेदररलॅण्डच्या अनिश गिरीविरुद्धची लढत केवळ २३ चालींमध्ये बरोबरीत राखली, तर प्रज्ञानंदने अवघ्या २८ चालींमध्ये अमेरिकेच्या फॅबियानो कारुआनासोबतची लढत बरोबरीत राखली. आठव्या फेरीत बहुतांश लढती अनिर्णीत राहिल्यामुळे फ्रान्सच्या अलिरेझा फिरोझाने स्पर्धेतील एक फेरी शिल्लक असताना ग्रॅण्ड चेस टूरच्या विजेतेपदावर जवळपास आपले नाव निश्चित केले आहे. आठव्या फेरीत फिरोझाने रशियाच्यान इयान नेपोम्नियाचीविरुद्धचा सामना ८० चालीनंतर बरोबरीत संपविला.




नेदरलॅण्डचा अनिश गिरी व भारताचा डी. गुकेश

दहा खेळाडूंच्या दुहेरी राऊंड-रॉबिन स्पर्धेत दिवसाच्या इतर दोन गेममध्ये उझबेकिस्तानच्या नोदिरबेक अब्दुसत्तोरोव्हने चीनच्या डिंग लिरेनला आणि फ्रान्सच्या मॅक्सिम व्हॅचियर-लॅग्रेव्हने अमेरिकेच्या वेस्ली सोला बरोबरी रोखले. अलिरेझाने आठ सामन्यांतून ५.५ गुण मिळवले. फॅबियानोचे सध्या ४.५ गुण आहेत. जर नवव्या व अंतिम फेरीत अलीरेझा हरला व अमेरिकेचा फॅबियानोने गिरीवर मात केली, तर फॅबियानो गुणतालिकेत अलिरेझाशी बरोबरी करू शकतो. जरी अलिरेझा पराभूत झाला तरी, तो त्याच्या एकूण गुणसंख्येमुळे प्रथमच स्पर्धा जिंकेल.

पाच खेळाडू प्रत्येकी चार गुणांसह संयुक्तपणे तिसऱ्या स्थानावर आहेत, यात गुकेश, प्रज्ञानंद, मॅक्सिम वॅचियर-लॅग्रेव्ह, वेस्ले सो आणि अब्दुसत्तोरोव्हचा समावेश आहे. नेपोम्नियाची व डिंग लिरेन ३.५ गुणांसह चौथ्या स्थानावर आहेत व तीन गुणांसह अनिश गिरी तळाच्या स्थानी आहे. स्पर्धा जिंकणे खूप कठीण आहे. कोणताही दौरा जिंकणे कठीण आहे, परंतु हा जगातील सर्वात मजबूत दौरा आहे. खूप आनंदी आहे, परंतु खूप थकवा आणणारा आणि थकल्यासारखे वाटत आहे मी खूप आनंदी आहे, असे अलिरेझा म्हणाला. ◄(वृत्तसंस्था)

# बांगलादेश मालिकेपूर्वी टीम इंडियाला धक्का! जडेजा अन् सिराज दुलीप ट्रॉफीतून बाहेर

**मुंबई, दि. २८ ऑगस्ट-**

दुलीप ट्रॉफी २०२४ चा थरार ५ सप्टेंबरपासून रंगणार आहे. बांगलादेश मालिकेपूर्वीच्या विश्रांतीमुळे या स्पर्धेच्या पहिल्या फेरीत अनेक प्रमुख भारतीय खेळाडू खेळताना दिसणार आहेत, जे कसोटी संघाचा देखील भाग असतील. पण याआधी एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे.

बीसीसीआयने अशी माहिती दिली



आहे की, टीम बी मध्ये समाविष्ट असलेले फिरकी अष्टपैलू रवींद्र जडेजा आणि मोहम्मद सिराज हे दुलीप ट्रॉफीच्या पहिल्या फेरीत सहभागी होणार नाहीत. या दोघांशिवाय टीम सीचा गोलंदाज उमरान मलिकही बाहेर आहे. सिराजच्या जागी नवदीप सैनी आणि उमरान मलिकच्या जागी गौरव यादवचा समावेश करण्यात आला आहे. रवींद्र जडेजाला संघातून मुक्त करण्यात आल्याचे बीसीसीआयने प्रसिद्धीमाध्यमांमध्ये म्हटले आहे. मात्र, जडेजाला का सुट्टी दिली यामागील कारण स्पष्ट झालेले नाही. दुलीप ट्रॉफीमध्ये जडेजाचा संघ ब मध्ये समावेश करण्यात आला होता.



सोलापूर : शालेय शहर वुशु स्पर्धेचे उद्घाटन मार्ग फाउंडेशनचे संस्थापक संतोष पवार यांच्या हस्ते झाले. यावेळी ऑल इंडिया जीत कुने डो फाउंडेशनचे उपाध्यक्ष युवराज गायकवाड, जिल्हाप्रमुख अभिजीत गायकवाड, किशोर चंदनशिवे, भास्कर देडे, सम्राट गायकवाड, आंनद जाधव, संदिप गायकवाड, विश्वजीत गायकवाड आदी उपस्थित होते.

# शिवाजी महाविद्यालयाच्या साईराज हणमेची आंतरराष्ट्रीय आर्चरी स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

हरियाना सोनीपत येथे सुरु असलेल्या आंतरराष्ट्रीय निवडचाचणी रिकर्व ६० मीटर धनुर्विद्या स्पर्धेतून मराठा समाज सेवा मंडळ संचलित छत्रपती शिवाजी सायं कनिष्ठ महाविद्यालयाच्या साईराज हणमेची तैवान (चीन) येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली.



साईराजे याने मागील वर्षी शालेय राष्ट्रीय स्पर्धेमध्ये आर्चरी रिकव्हर प्रकारात सांघिक सुवर्णपदक मिळविले होते. तसेच यावर्षी संघटनेच्या राज्य स्पर्धेत त्याने प्रथम क्रमांक मिळविला होता. हरियाणा सोनीपत येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय स्पर्धापूर्व निवड चाचणी राष्ट्रीय स्पर्धेमध्ये ६० मीटर रिकव्हर आर्चरी प्रकारात त्याने सुवर्णपदक मिळविले. या कामगिरीवर त्याची निवड झाली. आंतरराष्ट्रीय पातळीवर सोलापूर जिल्ह्यातील पहिलाच धनुर्धर होण्याचा सन्मान साईराजने मिळविला आहे.

त्याला जिल्हा धनुर्धर संघटनेचे सचिव हरिदास रणदिवे, प्रशिक्षक दीपक चिकणे, प्रा. संतोष गवळी, प्रा सचिन गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले. त्याच्या या यशाबद्दल जिल्हा आर्चरी संघटनेचे अध्यक्ष खासदार धैर्यशील भैय्या मोहिते पाटील, मराठा समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष माजी महापौर मनोहर सपाटे, उपाध्यक्ष विनायकराव पाटील, सचिव प्रा महेश माने, संचालक महादेव गवळी, वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम. एस पवार, छत्रपती शिवाजी प्रशालेच्या प्राचार्य सुजाता जुगदार, कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्य मंजुश्री सपाटे पाटील आदींनी हणमे यांचे अभिनंदन केले.

# दि स्पोर्टस पॅव्हेलियनच्या वतीने ज्येष्ठ क्रीडा संघटक पुणेकर, क्रीडा शिक्षक कुणगुलवार यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

शहर-जिल्ह्याच्या क्रीडा विकासात योगदान देणाऱ्या ज्येष्ठ क्रीडा संघटक झेड. एम. पुणेकर आणि क्रीडा शिक्षक प्रमोद कुणगुलवार यांचा राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या पूर्वसंध्येला दि स्पोर्टस पॅव्हेलियनच्या वतीने सत्कार करण्यात आला. स्पोर्टस पॅव्हेलियनचे अध्यक्ष प्रकाश भुतडा यांच्या हस्ते हा सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रा. बाळासाहेब भास्कर, मरगू जाधव, मुख्याध्यापक अनिल पाटील, चंद्रकांत रेम्बर्सू, क्रीडा शिक्षक वीरेश अंगडी, सुवर्णा कांबळे, सिद्राम मुनोळी, गोवर्धन हवाशंक, गणेश दळवी आदी उपस्थित होते. क्रीडा क्षेत्रात योगदान देणाऱ्या खेळाडू, क्रीडा शिक्षक, संघटकांचा गौरव करण्याची परंपरा स्पोर्टस पॅव्हेलियनने गेल्या अनेक वर्षांपासून जपली आहे. मैदानावर सातत्याने उपस्थित राहून खेळाडू घडविणाऱ्या, मात्र दुर्लक्षित राहिलेल्यांचा शोध घेऊन त्यांच्या योगदानाची गौरवाने दखल घेण्याचा पायंडा स्पोर्टस पॅव्हेलियनने जपला आहे.



### सत्कारमूर्तींची कामगिरी :

**श्री. पुणेकर** : १९८२ पासून टेबल टेनिस खेळात असून सोलापूर जिल्हा टेबल टेनिस संघटनेचे ते विद्यमान सचिव आहेत. गेली ४० वर्षांपासून प्रशिक्षक या नात्याने अनेक खेळाडूंना घडविले आहे. हे खेळाडू राज्य, राष्ट्रीय स्तरावर खेळले आहेत. ते राज्य परिवहन महामंडळात लेखनिक म्हणून कार्यरत होते. ३६ वर्षांच्या सेवेनंतर ते २०१९ निवृत्त झाले. महामंडळाचे राज्य व राष्ट्रीय; तसेच इंटर इन्स्टिट्यूशनल स्पर्धेत त्यांनी महामंडळाला पदके मिळून दिली आहेत.

**श्री. कुणगुलवार** : १९९२ पासून हँडबाल खेळाची सुरवात केली. ज्या शाळेतून शिक्षण घेतले त्याच दयानंद काशिनाथ आसावा प्रशालेत ते २००६ मध्ये क्रीडा शिक्षक म्हणून रुजू झाले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेल्या सुमारे १०० खेळाडूंनी राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग नोंदवला आहे. जॉर्डन येथे ३ ते १४ सप्टेंबर दरम्यान होत असलेल्या युवा आशियाई स्पर्धेत भाग घेणाऱ्या भारतीय संघात कुणगुलवार यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेल्या आदित्य प्रधान याची निवड झाली आहे.

# ध्यानचंद यांचे गोल करण्याचे कौशल्य कौतुकास्पद



मेजर ध्यानचंद यांचा २९ ऑगस्ट १९०५ प्रयाग अलाहाबाद (उत्तर प्रदेश) येथे राजपूत कुटुंबात जन्म झाला. त्यांचे वडील भारतीय सैन्यात सेंच्युरीअन म्हणून काम करीत होते. ते हॉकीही खेळत असत. वडिलांचा खेळ ध्यानसिंग एकटक पाहत असत. त्यांची दृष्टी फार पैनी होती. हे तिघे भाऊ होते. तेही हॉकी खेळत असत. भारतीय सैन्यात वडील असल्याने त्यांच्यासारखी बदली होत असे. त्यामुळे सहावीनंतर शिक्षण घेतले नाही. यांना कुस्तीची फार आवड होती. पण वडिलांचा खेळ पाहून त्यांनी या खेळात रुची निर्माण झाली. मित्रांसोबत खजुराच्या फांदी, कापडाचा चेंडू करुन हॉकी खेळायला सुरुवात केली. वयाच्या १४व्या वर्षी वडिलांसोबत हॉकी सामन्याला भेट दिली. जो संघ खेळत होता, तो दोन गोलने मागे पडला होता.

वडिलांचा संघ हरल्यावर त्यांनी वडिलांच्या बाजूंनी संघाबरोबर हॉकी खेळण्याचा आग्रह धरला. लष्कराच्या अधिकारी खेळण्यासाठी संमती दिली. तेव्हा त्यांनी ४ गोल केले. त्यांच्या कौशल्याने प्रभावित होऊन ध्यानचंद यांना सैन्यात भरती करुन घेतले.

ध्यानचंद यांचे खेळातील गोल करण्याचे कौशल्य कौतुक करण्यासारखे होते. त्यांच्या स्टीकची एकदा तपासणी केली होती, त्यांच्या बॅटला काय चिकटवले आहे का? काय जादू आहे बघता बघता ते गोल करीत असत म्हणून त्यांना ध्यानचंद हॉकीचे जादूगार म्हणत असत. तद्नंतर वयाच्या १६ व्या वर्षी १९२२ साली पंजाब रेजिमेंटमध्ये सैनिक म्हणून सामील करण्यात आले. सुभेदार मेजर भोले तिवारी हे सैन्यातील ध्यानचंदजीचे संरक्षक बनले आणि खेळाच्या मूलभूत गोष्टी शिकवल्या. पंकज गुप्ता हे ध्यानचंदजीचे हॉकी खेळाचे पहिले प्रशिक्षक. त्यांनी भाकित केले होते की, एकदिवस ध्यान हा चंद्रासारखा चमकेल. त्यामुळे ध्यानसिंग हे नंतर ध्यानचंद म्हणून ओळखले जाऊ लागले. भारताने १९२६ मध्ये न्यूझीलंड दौऱ्यात २० गोल केले होते. त्यात ध्यानचंदजी एकट्याने १० गोल होते. १९२८मध्ये मस्टरडॅम ऑलिम्पिक सामन्यात नेदरलँडस् विरूद्धच्या सामन्यात ३ पैकी २ गोल केले आणि भारताला ३-0ने सुवर्णपदक मिळवून दिले. १९३२च्या लॉस एंजिल्सच्या बुखारी यांच्या नेतृत्वाखाली पुन्हा भारताला सुवर्णपदक मिळवून दिले. युनायटेड स्टेटचा २००३चा विश्वविक्रम होता. २३-१पराभव केले. पैकी ८ गोल एकट्या ध्यानचंदच्या नावे होती. बर्लिनच्या ऑलिम्पिक सामन्यात भारताने एकही गोल करु न देता हंगेरी ४-0, युएसए ७-0, जपान ९-0 खेळून अंतिम सामन्यात प्रवेश केला. उपांत्य फेरीत फ्रान्सचा १० गोलने पराभव केला. अंतिम सामना जर्मनीबरोबर होता. जर्मनीचा एक गोल झाला होता. आपला एकही गोल नाही पाहून ध्यानचंद पायातील बूट काढले व अनवाणी पायाने खेळू लागले. ८-१नी जर्मनीचा सामना जिंकला. त्यांना मेजर ध्यानचंद हॉकीचे जादूगार हा किताब मिळाला. १९५६ला त्यांनी निवृत्ती घेतली. त्याचवेळेस त्यांना पद्मभूषण पुरस्कार मिळाला. पतियाळा येथे राष्ट्रीय प्रशिक्षक म्हणून नेमणूक झाली. अनेक शिबिरे, प्रशिक्षणासाठी मार्गदर्शन केले. ३ डिसेंबर १९७९ साली त्यांची प्राणज्योत मालवली.

**- उषा हंचाटे,**
**माजी मुख्याध्यापिका, सेवासदन प्रशाला, सोलापूर**
**मो.- ९८२२६१७२५१**

# भारतीय हँडबॉल संघाची कामगिरी उंचावण्याचा प्रयत्न : आदित्य प्रधान

**अमन जॉर्डन येथे ३ ते १४ सप्टेंबर २०२४ या कालावधीत होणाऱ्या १० व्या आशियाई युवा पुरुष हँडबॉल स्पर्धेसाठी सोलापूरच्या आदित्य चंद्रकांत प्रधान या युवा खेळाडूची निवड झाली. नुकताच तो सराव शिबीरासाठी रवाना झाला. त्यापूर्वी त्याच्याशी केलेली बातचीत.**

**– अजितकुमार संगवे**

हँडबॉलकडे कसे वळलो हे सांगताना आदित्य म्हणतो, ‘‘ माझे माध्यमिक शिक्षण दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला येथे झाले. मी पाचवीत होतो. विध्यार्थी मैदानावर हँडबॉल हा खेळ खूप आवडीने खेळायचे. मला कळाले की या खेळाचा सराव प्रशालेत घेतला जातो. तेव्हापासून आवड निर्माण झाली. दरवर्षी उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये फिटनेस शिबिर, आठवड्यातील सातही दिवस वेगवेगळे प्रकारचे व्यायाम घेतले जात होते.



या शिबिरात मी सहभागी झालो. फिटनेस हा खेळासाठी खूप महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे सर्व खेळाडूंना फिटनेसची गरज असते, असे क्रीडा शिक्षक व माझे गुरु प्रमोद कुनगुलवार यांनी शिबिरावेळी सांगितले. त्या शिबिरातूनच मी हँडबॉल शिकलो. मग मी हॅडबॉलचा सराव दयानंदच्या ग्राउंडवर सकाळ व संध्याकाळी करण्यात सुरुवात केली.’’

मार्केट यार्ड मधील हॉटेल व पान टपरीवर उदरनिर्वाह चालविणारे माझे वडील चंद्रकांत प्रधान यांनी मला हा खेळ खेळण्यासाठी प्रोत्साहन दिले. त्यामुळेच माझी कामगिरी बहरत केली. कामगिरी कशी बहरत गेली हे सांगताना आदित्य म्हणाला, ‘‘ २०१७ मध्ये सहावीला असताना १४ वर्षे वयोगटात माझी प्रशालेच्या टीममध्ये निवड झाली होती व त्यावर्षी आम्ही विभागात उपविजयी ठरलो. दयानंदच्या प्रांगणात दयानंद हँडबॉल लीगचे खूप मोठ्या प्रमाणात आयोजन केले जाते. त्यामध्ये नेव्ही, पोलीस, आर्मी अशा नामांकित संघाचा समावेश असतो. त्या स्पर्धेमध्ये त्यांचा खेळ पाहून माझ्या खेळामध्ये खूप सुधारणा झाल्या. आम्ही शहापूर, ठाणे येथे झालेल्या १४ वर्षे वयोगटातील राज्यस्तरीय हँडबॉल स्पर्धेत आमच्या संघास विजेतेपद मिळाले. त्याच वर्षी शिवपुरी (मध्यप्रदेश) येथे झालेल्या राष्ट्रीय हँडबॉल स्पर्धेत माझी राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली.

२०२३ मध्ये सिन्नर (नाशिक) येथे झालेल्या १९वर्षे वयोगटातील राज्यस्तरीय हँडबॉल स्पर्धेत विजेतेपद पटकावले. त्याच वर्षी राष्ट्रीय संघात निवड झाली ही स्पर्धा हिसार हरियाणा येथे झाली. अश्या २ राज्य व २ राष्ट्रीय स्पर्धेतून गोल अडविण्यात मी अर्धशतक गाठले आहे. ७ वर्षाच्या तंत्रशुद्ध सरावानंतर या कामगिरीवर माझी भारतीय संघात निवड झाली. मी या संघात नवखा जरी असलो तरी भारतीय हँडबॉल संघाची कामगिरी उंचावण्याचा मी प्रयत्न करेन.’’

### अविस्मरणीय क्षण

२०१९ मध्ये आठवीत असताना फुरसुंगी पुणे येथे झालेल्या विभागीय स्पर्धेत आमच्या दयानंद काशिनाथ असावा प्रशालेचा संघ विजय झाला. आमचा सामना सोलापूर शहर विरुद्ध पुणे शहर असा होता. आमच्या संघावर पुण्याची ७ गोलची आघाडी होती. मी त्या सामन्यात उत्कृष्ट गोलरक्षक म्हणून गोल अडवले. सात गोलचा लीड तोडून आम्ही त्यांच्यावर दोन गोलने विजय मिळविला. तो अंतिम सामन्यातला विजयी क्षण माझ्यासाठी अविस्मरणीय क्षण होता.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### रक्तदान चळवळ व्हावी : डॉ. प्रवीणकुमार वराडे

**मोहोळ, दि. २८ ऑगस्ट-**

रक्ताला पर्याय नसून, ते बाहेर कुठेही तयार करता येत नाही. रक्तदान ही काळाची गरज आहे. त्यासाठी सर्वांनी नियमित रक्तदान केले पाहिजे आणि ती एक चळवळ झाली पाहिजे, असे प्रतिपादन मोहोळ चे निवासी नायब मोहोळ येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तत्कालीन तालुका संघ चालक स्व. ॲड. द. ना. कुलकर्णी यांच्या १८ व्या स्मृतिदिनानिमित्त सुयश क्रीडा शिक्षण व बहुउद्देशीय मंडळाच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिराचे उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मोहोळ विधीज्ञ मंडळाच्या अध्यक्षा ॲड. शमशाद मुलाणी होत्या. यावेळी एकूण ५६ जणांनी रक्तदान केले. यावेळी डॉ. जयंत गोळवलकर, डॉ. एम. ए. गायकवाड, पत्रकार संघाचे अध्यक्ष विष्णू शिंदे, सुशिल क्षीरसागर, रणजीत भोसले, डॉ. अमोल हराळे, मोहोळ चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष प्रवीण डोके, महेश आंडगे, सचिन शास्त्री, डॉ. वसीम शेख, नागनाथ देवस्थान समितीचे अध्यक्ष प्रकाश देशमुख, संघाचे तालुका कार्यवाह महावीर जाधव उपस्थित होते. प्रास्ताविक अमोल देशपांडे यांनी तर सूत्रसंचालन महेश सोवनी केले. आभार राजाभाऊ देशमुख यांनी मानले. सोलापूर येथील डॉ. हेडगेवार रक्तपेढीने सहकार्य केले. हे शिबिरासाठी राजाभाऊ देशमुख, दिलीप देशपांडे, ॲड. अमोल देशपांडे, मदन लाळे, महेश सोवनी, अविनाश पांढरे, मंगेश सोवनी, दिलीप वाघमोडे, मनोज गुरव, विलास म्हमाणे, धनंजय मोहोळकर, प्रशांत देशमुख, दीपक राऊळ, संदेश कोरे, तिम्मा पवार, मुकुंद कुलकर्णी, बिरूदेव शेजाळ, दिनेश सुतार, धीरज खंदारे, मनोज गुरव, अरविंद माने, विकास देशपांडे, आनंद देशपांडे, अभिजीत सत्तीकर, पद्माकर कोळेकर, हर्षवर्धन पाटील उपस्थित होते.

### अपघाताला निमंत्रण; नगरपरिषेचे दुर्लक्ष!

**अक्कलकोट, दि.२८ ऑगस्ट-**

अक्कलकोट शहरातील मुख्य बाजारपेठेला जाणाऱ्या तुप चौक येथे चेंबरवर बसवण्यात आलेल्या लोखंडी जाळीच्या पट्ट्यामध्ये मोठ्या



प्रमाणात गॅप (खड्डे) पडले आहेत. या गॅप पडलेला खड्ड्यामध्ये गेल्या दोन-तीन दिवसांमध्ये अनेक टू-व्हीलर आणि रिक्षाचे चाके अडतून पडून अनेकजण जखमी झाले आहेत. तूप चौक येथील मुख्य चौकात एक चेंबर आहे. त्या चेंबरवर लोखंडी जाळी बसवण्यात आलेली होती, त्या चेंबरवरून मुख्य बाजारपेठेमध्ये येणाऱ्या अनेक वाहन आणि अवजड वाहनामुळे मुख्य रस्त्यावरील चेंबर गेल्या दोन आठवड्याभरापासून खराब झाला आहे. त्या जाळीमध्ये अडकलेल्या टू व्हीलर आणि रिक्षांची चाके तेथे आजूबाजूला असणाऱ्या लोकांनी त्या टू व्हीलर आणि रिक्षांचे चाके लोकांच्या मदतीने काढण्यात येत आहे. दुर्दैवी गोष्ट म्हणजे या अपघाताला निमंत्रण देणाऱ्या चेंबरचा अक्कलकोट नगरपरिषदेचे दुर्लक्ष झाले आहे. यापुढे होणाऱ्या अपघात टाळण्यासाठी अक्कलकोट नगरपरिषदेच्या संबंधित विभागाने ताबडतोब त्या चेंबरची दुरुस्ती करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ता सोहेल फरास यांनी केली आहे.



### भंडारकवठे सोसायटीच्या रिक्त पदावर प्रवीण बिराजदार यांची बिनविरोध निवड


**मंद्रुप, दि. २८ ऑगस्ट-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील भंडारकवठे विकास सोसायटीच्या हणमंत पाटील या संचालकाचे निधन झाल्याने ती जागा रिक्त झाली होती. त्या जागेवर नूतन संचालक म्हणून नामदेव उर्फ प्रवीण बिराजदार यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी सरपंच भीमाशंकर बबलेश्वर, सोसायटीचे अध्यक्ष इरप्पा कोरे, उपाध्यक्ष महादेव हत्ताळे, तंटामुक्त, अध्यक्ष उमेश पाटील, आमसिध्द घोडके, पोलिस पाटील अशोक मुक्काणे, सुरेश धुरपे, मुकेश व्हनकोरे, सोमनिंग विरदे, व्हन्नप्पा आरकेरी, आमसिध्द बुधाळे, महादेव बगले, गोपाळराव जंगलगी, राजेश्री पाटील, कमल मुक्काणे, सोमनिंग कमळे, शिरीष शहा, अनिल पाटील, बसवराज घोडके, कल्लप्पा बंदिचोडे, संजय पाटील, इरेश लोखंडे यांच्यासह अन्य उपस्थित होते.

### राष्ट्रवादीतर्फे सांगोल्यात आज आंदोलन

**सांगोला, दि. २८ ऑगस्ट-**

मालवण राजकोट येथे छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याची दुर्घटना घडल्यानंतर राज्यभर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने आंदोलनाची हाक दिली आहे. त्याचाच एक भाग म्हणून गुरुवार दि.२९ ऑगस्ट रोजी स.१०.३० वा.सांगोला येथील छ.शिवाजी



महाराज पुतळ्यासमोर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने आंदोलन करणार असल्याची माहिती शहराध्यक्ष तानाजी पाटील यांनी दिली. राज्य शासनाने या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी असणाऱ्या प्रत्येकावर कठोर कायदेशीर कारवाई करावी. तसेच भविष्यात अशा पद्धतीच्या चुका होणार नाहीत याची पुरेपूर काळजी घ्यावी यासह पुन्हा मालवण राजकोट येथे छत्रपती शिवरायांचा शक्तिशाली पुतळा उभा करावा या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने हे आंदोलन करण्यात येत आहे.तरी सांगोला शहर आणि तालुक्यातील तमाम शिवप्रेमींनी या आंदोलनासाठी उपस्थित राहावे असे आवाहन तानाजी पाटील यांनी केले आहे.

# कृषी पंपांना मोफत विज; ग्राहक संघटनेची तक्रार

**शेतकऱ्यांचा जादा वीज वापर दाखवून महावितरण सरकारकडून जादा अनुदान लाटल्याचा आरोप**

**प्रत्यक्षातील युनिटस्, दरमहा प्रति हॉर्सपॉवरप्रमाणे बिलिंगमध्ये तफावत**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २८ ऑगस्ट-**

राज्य शासनाच्या मुख्यमंत्री बळीराजा मोफत योजनेनुसार शेतकऱ्यांच्या ७.५ अश्वशक्तीपर्यंत जोडभार असलेल्या राज्यातील ४४ लाख ३ हजार शेतीपंप वीज ग्राहकांना मोफत वीज देण्याच्या घेतलेल्या निर्णयावरून आता महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेचे अध्यक्ष वीज तज्ज्ञ प्रताप होगाडे यांनी या योजनेवरून महावितरणला खडे बोल सुनावत शेतकऱ्यांचा जादा वीज वापर दाखवून महावितरण सरकारकडून जादा अनुदान लाटत असल्याचा आरोप केला. शेतकऱ्यांना मोफत वीज योजनेत-खरी लाभार्थी महावितरण कंपनीच असल्याचे सांगत मुख्यमंत्री, ऊर्जामंत्री यांनाही निवेदनाद्वारे ही तक्रार केली आहे.

प्रताप होगाडे यांच्या म्हणण्यानुसार, राज्य सरकारने १४,७६० कोटी रुपये अनुदान देण्याची तरतूद केलेली आहे. हा निर्णय स्वागतार्ह आहे. असे असले तरी प्रत्यक्षात ६० ते ६५ युनिट्स द्यायची आणि दरमहा सरासरी १२५ युनिट्स प्रतिहॉर्सपॉवरप्रमाणे बिलिंग करायचे, त्यामुळे राज्य सरकारकडून १२५ युनिट्सची सबसिडी दिली जाते.याचा अर्थ सरकारकडून दुप्पट सबसिडी लाटायची आणि प्रत्यक्ष दिलेल्या विजेच्या किमतीपेक्षा जास्त रक्कम सबसिडीमधून जमा करायची आणि पुन्हा शेतकऱ्यांच्या डोक्यावर दुप्पट बिलांचा व थकबाकीचा बोजा लादायचा, हा धंदा राजरोसपणे महावितरण कंपनी करते आहे. कंपनी आपल्या फायद्यासाठी आणि गळती लपविण्यासाठी शेतकऱ्यांना बदनाम करते आहे आणि त्याचबरोबर राज्य सरकारची म्हणजे जनतेचीच लूट करते आहे.




राज्यातील जनतेवर व सरकारवर चुकीचा आर्थिक बोजा पडू नये, यासाठी राज्य सरकारने खऱ्या वीज वापराच्या आधारे कंपनीला योग्य सबसिडी द्यावी. राज्यातील ४४ लाख ३ हजार ग्राहकांचा एकूण जोडभार अंदाजे २२०.१५ लाख अश्वशक्ती इतका आहे.आयआयटी, मुंबई या राज्यातील सर्वमान्य व नामांकित संस्थेच्या २०१६ च्या अहवालाप्रमाणे राज्यातील शेतकऱ्यांचा सरासरी प्रतिअश्वशक्ती वीज वापर १०६४ तास म्हणजे जास्तीत जास्त ७९४ युनिट्स इतका आहे.म्हणजेच एकूण वार्षिक वीज वापर जास्तीत जास्त १७४८० दशलक्ष युनिट्स इतका होऊ शकतो. राज्य सरकारने मात्र ३९२४६ दशलक्ष युनिट्स इतका वीज वापर दाखवलेला आहे. याचाच अर्थ शेतकऱ्यांचा वीज वापर सव्वादोन पट दाखविलेला आहे.

वास्तविक हा वापर एकूण वीज वापराच्या १५ ते १६ टक्केच आहे आणि वीज वितरण गळती ३० टक्के वा अधिक आहे. वीज वितरण गळती लपविण्यासाठी व कमी दाखवण्यासाठी शेतकऱ्यांचा वीज वापर ३० टक्के दाखवला जातो. महाराष्ट्र शासन व महावितरणच्या पुढाकाराने राज्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ही योजना राबविण्यात येत आहे. याच्या अंतर्गत नऊ हजार मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविण्यात येत आहेत.यातून निर्माण होणाऱ्या विजेचा उपयोग शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी होणार आहे. तसेच यामध्ये सुमारे ३ रुपये प्रतियुनिट दराने वीज मिळणार आहे. काही महिन्यातच या प्रकल्पातून वीजनिर्मिती सुरू होऊन शेतकऱ्यांसाठीच्या वीज खरेदीचा खर्च व परिणामी सबसिडीची गरज खूप कमी होणार आहे.

> शेतकऱ्यांना सिंचनासाठी मोफत वीज देण्याचा महायुती सरकारचा निर्णय ऐतिहासिक आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांनाच लाभ होणार असून, समाजवादी पक्षाचे प्रदेश कार्याध्यक्ष प्रताप होगाडे यांची केवळ महावितरणचाच फायदा होणार असल्याची तक्रार दिशाभूल करणारी आहे. होगाडे यांच्याकडून शेतकऱ्यांच्या फायद्याच्या योजनेला रेवडी म्हणणे हा शेतकऱ्यांचा अपमान आहे. मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेमुळे राज्यातील शेतकऱ्यांचे कृषिपंपांचे वीजबिल सरकार भरणार आहे. त्यासाठी सरकारने १४,७६० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. सरकारने ही योजना पाच वर्षे चालेल असे शासननिर्णयात स्पष्ट केले असूनही होगाडे यांनी त्याला निवडणूक जुमला म्हणणे चुकीचे आहे.
>
> **-विश्वास वेदपाठक, स्वतंत्र संचालक, महावितरण**

## श्रावणमास प्रवचनमाला-२३

### प्रतिकुलतेला अनकुलतेमध्ये करुन घेणे, हे नाथांचे जीवनचरित्र : डॉ. जयवंत बोधले महाराज

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २८ ऑगस्ट-**

प्रपंच म्हटलं की प्रवृत्ती आणि परमार्थ म्हटलं की निवृत्ती, संत एकनाथ महाराज या प्रवृत्ती आणि निवृत्तीच्याही पलीकडे पोहोचलेले आहेत. त्यांचा प्रपंच हा प्रपंचच राहिला नसून त्यांचा प्रपंच हा परमार्थ झाला आहे. नाथांची परिस्थिती आणि मन:स्थिती अतिशय चांगली आहे. म्हणून, नाथ पारमार्थिकदृष्ट्या शांत आणि स्थिर आहेत. कितीही समोर अडचणी उभ्या राहिल्या तरी न डगमगता मन:स्थिती बिघडू न देता, निश्चयाने पारमार्थिक स्थितीत राहत आहेत, असे डॉ. श्रीगुरु जयवंत महाराज बोधले यांनी प्रवचनमालेच्या २३ व्या सत्रात विशद केले.



**कैशव भट्टांनी नाथांचे वर्णन करताना म्हटले आहे की, निश्चयाचा महामेरू। नाथ म्हणी निश्चल।।**

नाथांच्या जीवनात अनेक घटना घडल्या; अनेक प्रसंगाना तोंड द्यावे लागले. अगदी शांतीला (Peace) सुद्धा शांतता वाटावी; अपकारावर सुद्धा उपकार करणे हे नाथांच्या जीवनाचे वैशिष्ट्यआहे. संत एकनाथ महाराज लोकांसमोर कधी दु:ख व्यक्त करीत नाहीत. ही आलेली दु:खे त्यांना दु:खप्रद वाटत नाहीत. 'प्रतिकूलतेला अनुकूलतेमध्ये करुन घेणे, हे नाथांचे जीवन चरित्र आहे. निश्चयावर ठाम राहणे, हे भक्तीचे मूळ आहे.' प्रसन्नता येण्याकरिता मनात संशय नसला पाहिजे. नाथांच्या मनात कोणत्याही प्रकारचा विकार येत नाही. त्यांच्या बुद्धीला विकल्पाचा स्पर्श नाही. म्हणून, त्यांचे जीवन प्रसन्न आहे, असे डॉ. श्रीगुरु जयवंत महाराज सांगतात. एक ब्राह्मण 'परिस' पिशवीत घेऊन नाथांकडे येतो. नाथ पूजेला बसलेले असल्याने ती परिसाची पिशवी उद्धवाकडे देऊन तो ब्राह्मण यात्रेला गेला. दुसऱ्या दिवशी स्वच्छता करताना उद्धवाने सर्व निर्माल्य गोळा करुन त्या पिशवीत भरून गंगेत टाकून दिले. काही दिवसाने तो ब्राह्मण यात्रेवरुन आला आणि माझी ती पिशवी द्या म्हणाला. तेव्हा, उद्धवाने सांगितले, ती पिशवी मी गंगेत निर्माल्य भरून टाकून दिली. तो ब्राह्मण नाथांकडे तक्रार करत काहीही बडबड करु लागला. तेव्हा, नाथांनी स्वत: गंगेकडे जाऊन नदीत उडी मारली. पाण्यात बुडी घेऊन हातात जे दगड घेतले. त्यामध्ये परिस होते. नाथांनी तो परिस ब्राह्मणाला दिला. तो ब्राह्मण चकित झाला. नाथांच्या चरणी नतमस्तक झाला. चरित्र चिंतनाचा पुढील भाग उद्याच्या सत्रात होईल.

# आरोपीला दहा तासांच्या आत अटक

**■ अनैतिक संबंधातून खून**
**■ सांगोला तालुक्यातील घटना**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २८ ऑगस्ट-**

अनैतिक संबंधाच्या संशयावरून खून झाल्याची घटना सांगोला तालुक्यात मंगळवार दि.२७ ऑगस्ट रोजी सायंकाळी घडली असून सदर प्रकरणातील आरोपीला दहा तासाच्या आत अटक करण्यात आली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी आरोपी सागर किसन इंगोले, रा.खिलारवाडी,ता.सांगोला याची पत्नी व मयत गजेंद्र विश्वनाथ शिंदे (वय-५५) रा.खिलारवाडी,ता.सांगोला यांचे अनैतिक संबंध असल्याच्या संशयावरुन दि.२७ ऑगस्ट रोजी सायंकाळी सातचे सुमारास सागर इंगोले याने गजेंद्र शिंदे यांच्या मोटर सायकलला चारचाकी गाडी आडवी घालुन त्यांना गाडीत शिवीगाळी करीत जबरदस्तीने बसवून खून करण्याच्या उद्देशाने त्यांचे अपहरण केले. तेथुन गादेगाव,वाखरी,कराड रोड या भागात गाडी वेगाने फिरवली व गादेगावच्या पानपट्टीतुन लोखंडी पाईप घेतला.पुढे शिरभावी गावातील फॉरेस्टमध्ये सायंकाळी आणले. त्याठिकाणी गजेंद्र शिंदे यांच्या डोकीत लोखंडी पाईपने जोराने वार करुन साक्षीदार गोपाळ चव्हाण,मुबारक मुलानी रा.खिलारवाडी,ता. सांगोला आणि आरोपीची पत्नी यांच्या समक्ष जीवे ठार मारुन खुन केला.तेथून गोपाळ चव्हाण, मुबारक मुलानी यांना शिरभावी फॉरेस्टमध्ये कॅनॉलच्या पट्टीवर निर्जन स्थळी सोडून त्याच्या पत्नीसह निघून गेला. घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, विक्रांत गायकवाड यांनी भेट देवुन मार्गदर्शन केले व आरोपी अटकेबाबत सुचना दिल्या. मयताचा मुलगा सौरभ गजेंद्र शिंदे (वय-२७, रा. खिलारवाडी, ता. सांगोला) याने तकार दिल्यावरुन सांगोला पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा घडल्यापासून आरोपी सागर इंगोले हा त्याचे अस्तित्व लपवून फरार झाला होता.त्याला पंढरपुरातून ताब्यात घेण्यात आले. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, विक्रांत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि पवन मोरे, सपो फौ. ढवणे, पोहेकॉ. झोळ, कोकरे, घोडसे,पोकॉ.वाघमोडे, सावंजी, खराडे, चोरमले, गणेश कुलकर्णी यांनी केली.

> आरोपी सागर किसन इंगोले याच्याबाबत कोणतीही उपयुक्त माहिती प्राप्त नसताना, तो मोबाईल बंद करुन फरार झाला असताना त्याबाबत गोपनीय बामतीदारामार्फत माहिती काढून गुन्हयाचा शिताफीने व कसोशीने तपास करुन आरोपीस गुन्हा दाखल झाल्यापासून अवघ्या १० तासाच्या आतमध्ये पंढरपूर येथून ताब्यात घेतले आहे.
>
> **-बी. एस. खणदाळे, पोलीस निरीक्षक, सांगोला**



# 'अक्कलकोट एज्युकेशन'चे कार्य कौतुकास्पद

**आ. पंकजाताई मुंडे यांचे प्रतिपादन**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२८ ऑगस्ट-**

शहर व तालुक्यातील गरीब, सर्वसामान्यांसह बहुजन आणि वंचितांना सुविधा उपलब्ध करून शिक्षण लोकाभिमुख करण्याचे काम अक्कलकोट एज्युकेशन सोसायटीने केले हे अत्यंत मोलाचे आहे, असे प्रतिपादन माजी मंत्री आ. पंकजा मुंडे यांनी केले आहे.

अक्कलकोट एज्युकेशन सोसायटी संचलित सी. बी. खेडगी महाविद्यालयास भेटी दिली, यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी आ. मुंडे व मातोश्री प्रज्ञा गोपीनाथ मुंडे यांचा चेअरमन बसलिंगप्पा खेडगी व संचालिका पवित्रा खेडगी यांनी सत्कार केला. प्रारंभी प्राचार्य डॉ. शिवराय आडवितोट यांनी प्रास्ताविक केले. यावेळी बसलिंगप्पा खेडगी समर्थकांनी हलग्यांच्या कडकडाटासह फटाक्यांची आतिषबाजी करीत त्यांचे स्वागत के. याप्रसंगी जिल्हा परिषदेच्या माजी विरोधी पक्षनेते आनंद तानवडे, बाळासाहेब मोरे, माजी नगरसेवक परमेश्वर अरबाळे, धानप्पा कामाठी, जितेश यारोळे, सुशील हिरस्कर, बसवराज बिराजदार, स्वामीनाथ धनशेट्टी, बाबुराव घंटे, संजय मुत्तनकशी, किरण कामनूरकर, बसवराज स्वामी, शिवानंद जकापुरे, सागर लवटे, प्रदीप बनसोडे, नारायण घंटे, सोनू कामाठी, प्रकाश डोंगरे, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, पदाधिकारी उपस्थित होते.

> **अक्कलकोटच्या विकासात यांचे योगदान**
>
> तीर्थक्षेत्र अक्कलकोटच्या जडणघडणीत आणि भाजपच्या प्रचार व प्रसारासाठी माजी उपमुख्यमंत्री गोपीनाथ मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली दिवंगत आमदार बाबासाहेब तानवडे, दानशूर चनबसप्पा खेडगी, स्वर्गीय ब्रम्हानंद मोरे यांचे मोठे योगदान आहे. त्यांच्यानंतर आता आनंद तानवडे, बाळासाहेब मोरे, बसलिंगप्पा खेडगी यांनीसुध्दा पुढाकार घेऊन चांगले कार्य करीत आहेत. याबद्दल मनस्वी आनंद होत आहे.
>
> **-पंकजा मुंडे, आमदार**

# आ. बबनदादा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त क्रिकेट स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. २८ ऑगस्ट-**

आ. बबनदादा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे पंढरपूर तालुका उपाध्यक्ष समर्थ साळुंखे यांच्यातर्फे हाफपिच क्रिकेट स्पर्धेचे रविवारी १सप्टेंबर रोजी होळकर विद्यालय आजोती येथे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धासंबंधी समर्थ साळुंखे ७६२०६०३१६२, गौरव साळुंखे ८७६७२१३५७१, तुषार थाटकर ७४९९१०३५१४ या मोबाईल नंबरवर संपर्क साधून जास्तीत जास्त क्रिकेट श्रप्रेमी संघानी सहभागी व्हावे असे आव्हान आयोजकांनी केले आहे. स्पर्धेप्रसंगी जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे, राष्ट्रवादीचे प्रांतिक सदस्य कल्याणराव काळे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष समाधान काळे, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस महेश बोचरे, साहिल शेख, शहराध्यक्ष शुभम शिरकर, जिल्हा उपाध्यक्ष सौरभ पाटील, जिल्हा सरचिटणीस वंशभूषण शिंदे, जिल्हा उपाध्यक्ष सचिन देठे आदी उपस्थित राहणार आहेत.

# कन्नूर येथील शांतीकुटीर आश्रमात उद्यापासून गणपतराव महाराजांचा जन्मोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**विजयपूर, दि. २८ ऑगस्ट-**

सुक्षेत्र कन्नूर (जि. विजयपूर) येथील शांतिकुटीर येथे ३० ऑगस्ट ते ७ सप्टेंबरदरम्यान श्री गणपतराव महाराजांचा ११६ वा जयंती सप्ताह साजरा करण्यात येणार असल्याची माहिती शांतिकुटीरचे ज्येष्ठ सदस्य रमेश कन्नूर यांनी दिली.





यावेळी शांतिकुटीर ट्रस्टचे अध्यक्ष गोविंदलाल बाहेती, विश्वस्त रमेश कुलकर्णी-कन्नूर यांनी नऊ दिवस चालणाऱ्या साप्ताहिक कार्यक्रमांची माहिती दिली. ३० ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता दासबोध ग्रंथवाचनाने सप्ताहास प्रारंभ होईल. उद्‌घाटन सोहळा विजयपूर ज्ञानयोगाश्रमाचे श्री बसवलिंग महास्वामी, षण्मुखारुठ मठाचे श्री अभिनव सिद्धारुढ महास्वामी, कन्नूर गुरु मठाचे श्री सोमनाथ शिवाचार्य करणार आहेत. सायंकाळी ५ वाजता सुरतचे स्वामी सवितानंद यांचे प्रवचन, त्यानंतर सांगली येथील कीर्तनकारांचे कीर्तन होईल. ३१ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता डॉ. प्रभूसारंगदेव शिवाचार्य आणि बंगळुरू येथील डॉ. आरती ही.बी. यांची प्रवचन, सायंकाळी ५ वाजता बंगलोर बेलीमठ येथील श्री शिवानुभव चरामूर्ती शिवरुद्र महास्वामी प्रवचन, १ सप्टेंबर रोजी सकाळी १० वा. गदगचे जगद्गुरु श्री सदाशिवानंद महास्वामी, मथूरचे श्री राम नारायण अवधानी यांची प्रवचने होतील. यावेळी डॉ. तेजस्विनी अनंतकुमार उपस्थित राहणार आहेत. माणिकनगरचे श्री ज्ञानराज माणिकप्रभू महाराजांचे सायंकाळी ५ वा. प्रवचन होणार आहे. सायंकाळी ६.३० वाजता स्तोत्रिगण- समालोचन, सोमवारी २ सप्टेंबर रोजी सकाळी १० वा. पपू विश्वनाथ चक्रवर्ती स्वामी, पपू स्वामी मंगलानाथानंद यांचे प्रवचन, सायंकाळी ५ वा. पूज्य मुरलीभैय्या, जाजू इचलकरंजी आणि विवेक सबनीस यांचे प्रवचन, सायंकाळी ५.३० वा. एन. के. मोहनकुमार यांची हरिकथा, ३ सप्टेंबर रोजी सकाळी १० वा. सुरबानचे श्री गुरुदेव समर्थ शिवानंद स्वामी, उमाकांत भट, शंकर शास्त्री यांची अमृतवाणी, सायंकाळी ५ वा. डॉ. विजयालक्ष्मी बाळेकुंद्री यांचे प्रवचन, ४ सप्टेंबर रोजी सकाळी १० वा. दत्तावधूत महाराज, मोहनबुवा रामदासी व सायंकाळी ५ वा. चिद्घनानंद महास्वामींचे प्रवचन, ५ सप्टेंबर रोजी सकाळी १० वा. सज्जनगडचे योगेशबुवा रामदासी, स्वामी चिद्रूपानंद स्वामी, दत्ताप्पय्या स्वामींचे प्रवचन, सायं. ५ वा. श्री गणपतराव महाराज आध्यात्मिक सेवा पुरस्कार सोहळा, ६ रोजी सकाळी १० वा. पुण्याच चारुदत्त आफळे, कृष्णानंद शरनरु, सायंकाळी ५ वा. बिदरचे डॉ. शिवकुमार स्वामींचे प्रवचन, ७ रोजी सकाळी ६ वाजता श्री समर्थ सद्गुरुंच्या कन्नूर जन्मस्थानापासून शांतिकुटीरपर्यंत वाद्यांच्या गजरात रथ व पालखी सोहळा, सकाळी १०.३० वाजता भंडारकवठेचे श्री कल्लप्पा महाराज, अभिनव सिद्धरुद्ध स्वामी, संगमेश, अनंतराव कुलकर्णी, गणेश नायक, शांतिकुटीरचे श्रीकृष्ण संपगवांकर यांची प्रवचने होतील. त्याच दिवशी दासबोध ग्रंथसमाप्ती आणि पुष्पवृष्टी होईल. यावेळी आश्रमाचे विश्वस्त डॉ. सतीश कन्नूर, सतीश तिकोटी, श्रीनिवास बाहेती, श्रीकृष्ण संपगावरकर उपस्थित होते.

# अनधिकृत सात दुकाने जमीनदोस्त

## ● रामवाडीतील गंगामाई हॉस्पिटल परिसराने घेतला मोकळा श्वास

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभाग आणि महापालिका झोन क्रमांक ६ यांच्या संयुक्त माध्यमातून शहरातील रामवाडी येथील गंगामाई हॉस्पिटल समोरील अनधिकृत सात दुकाने जेसीबीच्या साह्याने जमीनदोस्त करण्यात आली.



सोलापूर महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने शहरात अतिक्रमण हटवण्याची मोहीम सातत्यपूर्ण सुरू आहे. महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांच्या आदेशानुसार ही मोहीम राबविण्यात येत आहे. रहदारीस अडथळा ठरणारे तसेच फुटपाथ वरील अतिक्रमण काढण्याची कारवाई करण्यात येत आहे. दरम्यान, आज सकाळी ११ ते दुपारी १ वाजेपर्यंत रामवाडी येथील गंगामाई हॉस्पिटल समोरील अतिक्रमण काढण्यात आले. येथील अतिक्रमित सात दुकाने जेसीबीच्या साह्याने जमीनदोस्त करण्यात आली. तब्बल दोन तास या ठिकाणी ही मोहीम राबविण्यात आली.

कारवाई दरम्यान बघण्यासाठी लोकांची मोठी गर्दी झाली होती. तगड्या पोलीस बंदोबस्तात ही कारवाई करण्यात आली. यामध्ये सात दुकाने जमीन दोस्त केली. अतिक्रमण प्रतिबंधक विभाग आणि महापालिका झोन कार्यालय क्रमांक सहा यांनी संयुक्त कारवाई केली. यावेळी दोन्ही विभागाचे कर्मचारी अधिकारी उपस्थित होते. सोलापूर शहरात अनधिकृतपणे रस्त्यावर तसेच फुटपाथवर कोणत्याही स्थितीत नागरिक व व्यापाऱ्यांनी अतिक्रमण करू नये. रहदारीस अडथळा करू नये. अतिक्रमण आढळून आल्यास महापालिका प्रशासनाकडून कारवाई करण्यात येईल, असा इशारा अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे अधीक्षक मुर्तुजा शहापुरे यांनी दिला आहे.



## बाल गणेशाला मागणी

**सोलापूर : बाल गणेश मूर्तीला परप्रांतात मोठ्या प्रमाणात मागणी वाढली असून शहरातील मूर्तिकारांना चांगली संधी मिळत आहे. आत्तापर्यंत दहा ते पंधरा हजार मुर्त्यांची आंध्र प्रदेश, कर्नाटक या राज्यात मागणी वाढली.**

(छायाचित्र : केवल तिवारी)



# श्री सिध्देश्वर वुमेन्स पॉलिटेक्निकमध्ये

## कृष्ण जन्माष्टमीनिमित्त दहीहंडी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

श्री सिध्देश्वर वुमेन्स पॉलिटेक्निकमध्ये कृष्ण जन्माष्टमी निमित्त दही हंडी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रथम कृष्णाचे पूजन करण्यात आले. विद्यार्थीनींनी वो किसना हे, राधा कैसे न जले, राधे राधे या गाण्यावर नृत्य सादरीकरण केले. विद्यार्थीनींनी राधा कृष्णाचा पेहराव केला होता. संपूर्ण कॉलेजमध्ये गोकुळाचे वातावरण निर्माण झाले होते.

तसेच सिव्हील, इलेक्ट्रीकल, काम्प्युटर, इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकम्युनिकेशन, इन्फॉमेशन टेक्नॉलाजी या विभागातर्फे दहीहंडी फोडण्यात आली. कॉलेजचे प्राचार्य गजानन धरणे, प्रा. प्रमोद शिवगुंडे, डॉ. नीता आळंगे, प्रा. प्रतिभा पाटील, प्रा. अतुल कंदले, प्रा. नवनाथ माने, प्रा. श्रीशैल मळेवाडी, सांस्कृतिक विभागप्रमुख सुचेता चौधरी व सर्व विद्यार्थीनी उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वीतेसाठी सांस्कृतिक सदस्य प्रा. हरसुरे, प्रा. देवसानी, प्रा. माळगे, प्रा. कांबळे, प्रा. लोखंडे, प्रा. पंतगे व श्री काळे, कोळी यांचे सहकार्य लाभले. सुत्रसंचालन कु. तारे व स्वामी यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा. सुचेता चौधरी यांनी केले.

# विडी व यंत्रमाग कामगारांना किमान वेतन, १० हजार रुपये पेन्शन देण्यास भाग पाडू

## ● कामगार मेळाव्यात कॉ.आडम मास्तर यांचे आश्वासन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

कामगारांना किमान वेतन, निवृत्ती वेतन १० हजार रुपये आणि सामाजिक सुरक्षा देणे बंधनकारक व अनिवार्य आहे. मात्र शासनाची उदासीनता, प्रशासनाची दिरंगाई यामुळे कामगारांचे मोठे नुकसान होत आहे. म्हणूनच आगामी काळात या लढाईची धार आणखी तेज व उग्र स्वरूपाची राहील आणि श्रमिकांना शासनाकडून सामाजिक सुरक्षेचे कवच देण्यास शासनाला भाग पाडू असा लक्षवेधी इशारा कामगारांच्या मेळाव्यात ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ. नरसय्या आडम (मास्तर) यांनी दिला.



दत्त नगर लाल बावटा कार्यालय येथे श्रमिकांचा विभागीय निर्धार मेळावा माजी नगरसेविका कॉ. सुनंदाताई बल्ला यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी नगरसेवक व्यंकटेश कोंगारी, अशोक बल्ला, ॲड.अनिल वासम, श्रीनिवास कुणे, वीरेंद्र पद्मा, बाळकृष्ण मल्याळ आदींची उपस्थिती होती.

दरम्यान या मेळाव्याची सुरुवात रयतेचा राजा छत्रपती शिवाजी महाराजांचा नौदल दिनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत मालवण येथे ४ डिसेंबर २०२३ रोजी मोठ्या उत्साहात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचा अनावरण सोहळा पार पडला. नौदल दिनानिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची यशोगाथा तळागाळात रुजविण्यासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवणमधील राजकोट किल्ल्यावर उभारण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा कोसळला. हे अत्यंत गंभीर व आक्रोशजनक आहे.

यावेळी अशोक बल्ला, शिवा श्रीराम, सनी कोंडा, किशोर गुंडला, बालाजी गुंडे, बलराज म्हेत्रे, श्रीनिवास तंगडगी, प्रशांत विटे, प्रकाश कुऱ्हाडकर, गोपाळ जकलेर, अंबादास गाडगी, प्रवीण आडम आदींची उपस्थिती होती. प्रास्ताविक अशोक बल्ला यांनी केले. यामेळाव्याचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ॲड.अनिल वासम यांनी केले.

### दोषींवर कडक कारवाई झाली पाहिजे

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याची उभारणी करताना शास्त्रोक्त पध्दतीने व तांत्रिकदृष्ट्या योग्य मार्गदर्शन पद्धतीचा अवलंब न केल्याची शंका उपस्थित होत असून यामध्ये अनेक लोकांचे हात काळे झाल्याचे समजते. याची सखोल चौकशी करून महाराजांचा पुतळा कोसळण्यास जबाबदार असणारे मूर्तिकार, अभियंता, तंत्रज्ञ आणि संबंधित विभागातील दोषींवर कडक कारवाई झाली पाहिजे. त्याचप्रमाणे महाराष्ट्राचे श्रध्दास्थान व अस्मितेला नख लावणाऱ्या बेजाबदार शिंदे सरकार यांनी जनभावना व जनतेचा प्रक्षोभ लक्षात घेऊन सदर घटनेची जबाबदारी स्वीकारत तात्काळ राजीनामा द्यावा. असा ठराव माकपाचे जिल्हा समिती सदस्य अनिल वासम यांनी मांडला. त्यास मेळाव्यातील सर्वांनी एकमताने मंजुरी दिली.

# पान शॉप चालविण्यासाठी दहा हजारांची खंडणी दे

## ● दिनेश घोडकेसह पाचजणांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट -**

गेल्या एक वर्षापासून पान शॉप चालविण्यासाठी दरमहा दहा हजार रुपये दे म्हणत खंडणी मागत हॉटेलमध्ये गोंधळ घालून धमकी देणाऱ्या पाच जणांवर जेलरोड पोलिस ठाण्ययात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याप्रकरणी आदर्श दिलीप मोरे (वय ३०, रा. लक्ष्मी नगर, हत्तुरे वस्ती) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन दिनेश घोडके, अरबाज शेख, गणेश नामदे, वैभव नामदे, प्रशांत पवार (सर्व रा. अशोक चौक) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. आदर्श मोरे यांचे अशोक चौकातील विश्व लाईट हाऊसलगत रोडवर पूनम हॉटेल आहे. ऑगस्ट २०२३ ते २७ ऑगस्ट २०२४ या कालावधीत अशोक चौकातील रोडवर हॉटेल व पान शॉपचा व्यवसाय चालविण्यासाठी दिनेश घोडके व त्याच्या साथीदारांनी मोरे यांस दरमहा १० हजार रुपयांची खंडणी मागितली. दिनेश घोडके याने त्याचे साथीदार अरबाज शेख, गणेश नामदे, वैभव नामदे, प्रशांत पवार यांना पाठवून वेळोवेळी सोबत घेऊन सार्वजनिक कार्यक्रमासाठी दरमहा १० हजार रुपये बेकायदेशीरपणे व जबरदस्तीने खर्चायला मागितले.

पैसे देण्यास मोरे यांनी नकार दिल्याने दिनेश घोडके व इतरांनी मोरे यांच्या पूनम हॉटेलमध्ये गोंधळ घालून धमकी दिली. म्हणून जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक मोरे पुढील तपास करीत आहेत.

# गणेशोत्सवानिमित्त पोलीस आयुक्तालयात आज बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

आगामी काळात साजरा होणाऱ्या गणेशोत्सवानिमित्त सोलापूर शहर पोलिस आयुक्तालयामध्ये २९ ऑगस्ट रोजी बैठक आयोजित करण्यात आली आहे.

सर्वत्र ७ सप्टेंबर ते १७ सप्टेंबर या कालावधीत गणेशोत्सव साजरा करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी, सदस्य, शांतता समिती सदस्य, पोलिस अधिकारी व विविध प्रशासनातील अधिकारी यांची समन्वयाबाबत चर्चा होणार आहे. तरी या बैठकीस मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आयुक्तालयाच्या वतीने करण्यात आले आहे.



# एलएनजी हेच भारताचे भविष्यातील इंधन

## पर्यावरणपूरक बैद्यनाथ एलएनजी तिसऱ्या स्टेशन लॉन्चिंगप्रसंगी नितीन गडकरी यांचे मत



**तभा वृत्तसेवा,**
**नागपूर, दि. २८ ऑगस्ट-**

चार ई म्हणजेच नैतिकता, अर्थव्यवस्था, पारिस्थिती आणि पर्यावरण कोणत्याही देशाच्या भविष्यातील विकासासाठी महत्वपूर्ण आहे. जीवाश्म इंधनाचा अधिक उपयोग पर्यावरणासाठीच हानीकारकच नाही तर आर्थिक समस्यासुद्धा आहे. आपण जीवाश्म इंधनाच्या आयातीवर वर्षाला सुमारे २२ लाख कोटी खर्च करीत आहोत. भारत सरकार देशाला प्रदूषणमुक्त करण्यासाठी कटिबद्ध आहे.

सरकार इथेनॉल, मिथेनॉल, बायो एलएनजी, बायो सीएन जी, हायड्रोजन, वीज या सारख्या पर्यायी इंधनाच्या विकासावर काम करीत आहे. हे भारतातील भविष्यचे इंधन आहेत, असे मत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केले. ते उमरेड रोडवर बैद्यनाथ एलएनजीच्या तिसऱ्या डिस्पेंसिंग स्टेशन लॉन्चिंगप्रसंगी संबोधित करीत होते. कार्यक्रमाला वोल्वो आयशरचे डिप्टी सीईओ राजिंदर सिंह सचदेवा, बैद्यनाथ समूहाचे एमडी सुरेकुमार शर्मा, प्रणव शर्मा, कल्पना शर्मा, श्रुति शर्मा यांच्यासह बी-एलएनजी सीईओ सुब्बाराव उपस्थित होते.

### प्रदूषणमुक्त व स्वस्त इंधनाचा पर्याय

सुब्बाराव म्हणाले, आम्ही भारतात एलएनजी, कॉरिडोरच्या विकासासाठी आवश्यक इको सिस्टमसह वोल्वो आयशरसोबत करारावर स्वाक्षरी करून आनंदी आहोत. या करारामुळे आम्हाला देशभरात एलएनजी स्टेशनचे एक विस्तृत नेटवर्क बनविण्याच्या आमच्या मिशनला मदत होईल. एलएनजी संचालित वाहनांच्या स्वीकार्यतेला चालना देऊन आमचे लक्ष्य एक स्वच्छ आणि हरित भविष्यात सक्रिय रूपाने योगदान देणे आहे.

### जागतिक स्तरावर तिसरे स्थान

ज्यानी मंत्रालयाचा कार्यभार स्वीकारला होता. तेव्हा ऑटोमोबाइल उद्योगाचा व्यापार ७.५ लाख कोटी रूपयावर होता. तर आता १७ लाख कोटीवर पोहचला आहे. त्यामुळे आज भारत जापानला मागे टाकून क्रमशः अमेरिका आणि चीननतर जागतिक स्तरावर तिसऱ्या क्रमांकावर आहे. बी-एलएनजी आणि वाल्वो आयशर कमर्शियल व्हीकल लिमिटेड यांच्यात एका सामंजस्य करारावर स्वाक्षरीसुद्धा करण्यात आल्या. यामुळे पुरवठा प्रक्रियेला तेजी येऊन दूरवर स्वच्छ इंधन पोहोचविण्यात मदत मिळण्याची अपेक्षा आहे.

# रस्त्यांवरील खड्ड्यांच्या तक्रारी निवारण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे ॲन्ड्रॉईड ॲप

## ● अधीक्षक अभियंता माळी यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**


सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत जिल्ह्यात बांधण्यात आलेल्या रस्त्यांवरील खड्ड्यांच्या नागरिकांनी केलेल्या तक्रारी निवारण्यासाठी येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या यंत्रणेने तक्रार निवारण प्रणाली (पीसीआरएस) तंत्रज्ञान विकसित केले असून, या ॲन्ड्रॉईड ॲपवरुन नागरिकांनी जिल्ह्यातील सा. बां. विभागाने निर्माण केलेल्या रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांची माहिती द्यावी, अशी माहिती अधीक्षक अभियंता संजय माळी यांनी आज (दि. २८) आयोजित पत्रकार परिषदेत दिली. दरम्यान, गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या जिल्ह्यातील रस्त्यांबाबतच्या पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना मात्र माळी यांनी बगल दिली.



या पत्रकार परिषदेला कार्यकारी अभियंता अजय भोसले, मनोज ठाकरे, रोहित रव्वा आदी अधिकाऱ्यांचीही उपस्थिती होती. यावेळी माळी पुढे म्हणाले की, सार्वजनिक बांधकाम विभागाने १ लाख १८ हजार किमीपेक्षा जास्त रस्त्यांचे जाळे जिल्ह्यात तयार केले आहे. विभागामार्फत राज्यातील तीन प्रकारचे रस्ते उदा. प्रमुख राज्य महामार्ग, राज्य महामार्ग व प्रमुख जिल्हा रस्ते आदींची देखभाल आणि दुरूस्ती केली जाते. पावसाळ्यात मात्र काही रस्त्यांवर खड्डे पडत असल्याने नागरिकांच्या तक्रारी वाढतात. यामुळे या विभागाला नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागते. सा. बां. विभागाच्या वतीने निर्माण केलेल्या रस्त्यांची चांगली देखभाल व्हावी आणि जनमाणसांत या विभागाची प्रतिमा उंचावण्यासाठी खड्डे तक्रार निवारण प्रणाली (पीसीआरएस) हे ॲन्ड्रॉईड ॲप विकसित केले आहे. यावेळी माळी पुढे म्हणाले की, हा ॲप स्टोअरवरुन डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध आहे. तसेच गुगल प्ले स्टोअरवर आमच्या लिंकसह कोणत्याही ॲन्ड्रॉईड मोबाईलमध्ये स्थापित करता येईल.

जिल्ह्यातील आमच्या कोणत्याही मार्गावर खड्डे पडले असतील तर त्याचे फोटो काढून या ॲपवरून आम्हाला सेंड करता येतील. या ॲपवर मोबाईल नंबर टाकल्यास, कोणालाही एसएमएस द्वारे वन टाईम पासवर्ड (ओटीपी) प्राप्त होईल. मात्र लॉग ईन करण्यासाठी तो ओटीपी प्रविष्ट करावा लागेल. खड्ड्यांची तक्रार नोंदविण्यासाठी रजिस्टर फीडबॅक बटन दाबायचे, आपला मोबाईल जीपीएसच्या सहाय्याने वर्तमान स्थान दर्शविल. त्यानंतर कॅमेरा आयकॉनवर क्लिक करून पीसीआरएस ॲप आपला मोबाईल कॅमेरा उघडेल. यानंतर खड्ड्याचे छायाचित्र काढून ते टिप्पणीसह आपली तक्रार नोंदविता येणार आहे. तक्रार दाखल केल्यावर अवघ्या तीन दिवसात स्थानिक शाखा अभियंता याची दखल घेईल. शाखा अभियंत्यांकडून काम नाही झाल्यास उपअभियंता, कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता दखल घेणार आहेत. तक्रारीसाठी ३० दिवसांपेक्षा अधिक काळ लोटला गेल्यास मुख्य अभियंताद्वारे या तक्रारींचे पुनर्विलोकन आणि निरीक्षण केले जाणार आहे.

यामुळे जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी या नवीन ॲपद्वारे आपल्या भागातील रस्त्यावरील खड्डयांची माहिती नोंदवावी, असे आवाहन अधीक्षक अभियंता माळी यांनी शेवटी केले आहे.




# फौजी : शौर्य आणि संघर्षाची गाथा

**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

स्वातंत्र्याचा उत्सव आपल्याला सैनिकांनी देशासाठी दिलेल्या शौर्य आणि बलिदानाची आठवण करून देतो.आपल्या स्वातंत्र्याचा यंदाचा हा उत्सव द्विगुणित करण्यासाठी मातृपितृ फिल्म्स निर्मित घनशाम येडे प्रस्तुत 'फौजी' हा मराठी चित्रपट येत्या ३० ऑगस्टला चित्रपटगृहात दाखल होत आहे.

सीमेवरच्या जवानांची अंगावर काटा आणणारी शौर्यकथा पोटतिडकीने मांडत, चैतन्य मराठे, भारत देशमुख या दोन जवानाचं आयुष्य आणि त्यांची निस्सीम देशसेवा यांच्यावर 'फौजी' चित्रपटातून प्रकाशझोत टाकण्यात आला आहे. सौरभ गोखले, प्राजक्ता गायकवाड, अरुण नलावडे, नागेश भोसले, संजय खापरे, अश्विनी कासार, शाहबाज खान, टिनू वर्मा, सिद्वेश्वर झाडबुके, हंसराज जगताप, विवेक चाबुकस्वार, सुनील गोडबोले, रोहित चव्हाण, प्रग्या नयन, जान्हवी व्यास, कल्याणी नदकिशोर, मंजुषा खत्री, जयंत सावरकर, घनशाम येडे हे कलाकार चित्रपटात आहेत.

श्रीनिवास सिनेमॅटिक जेलरोड जवळ, सोलापूर
Book The Ticket At BookMyShow
आजपासून शानदार प्रारंभ
नॅचरल स्टार नानीचे सेंटिमेंट ॲक्शन चित्रपट




सरिपोदा शनिवारम
१२।,३।,६।,९। वा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company Solapur Tarun Bharat Media Limited., and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● Mr. Vivek Krishnaji Ghalsasi - Dissertation Editor / ● Mr. Dilip Yeshwant Pethe - Group Chief Editor ● Mr. Prashant Vasantrao Mane - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) Email ID starunbharat@gmail.com and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: https://dainiktarunbharat.com/, ● Epaper: https://epaper.dainiktarunbharat.com/. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.







## क्राईम वृत्त...

### पत्नीला मारहाण; पतीसह तिघांवर गुन्हा

**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

पत्नीचे बाहेर लफडे आहे, असे म्हणत संशय घेत मारहाण करणाऱ्या पतीसह तिघांवर जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी निकिता विकास भोसले (वय २०, रा. हनुमान नगर, भवानी पेठ) या विवाहितेच्या फिर्यादीवरून पती विकास भोसले, सासरे गोपाळ भोसले, दीर अविनाश भोसले (सर्व रा. महाळुंग, ता. माळशिरस) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. १९ एप्रिल २०१९ ते दि.२ एप्रिल २०२४ या कालावधीत निकिता भोसले ही पती विकास भोसले याच्यासोबत सासरी नांदत होती. सासरी नांदत असताना पतीने तिच्यावर संशय घेत शिवीगाळ करत मारहाण करून सासरकडच्या मंडळींनी तिच्या पतीला तुझ्या बायकोचे बाहेर लफडे आहे, असे म्हणत शारीरिक व मानसिक त्रास देऊन आर्थिक छळ केला. याबाबत जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक येळे हे करित आहे.

### सैफूल येथे दुचाकीच्या धडकेत मायलेकी जखमी

**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

विजापूर रोडवरील सैफुल येथे दुचाकीच्या धडकेत मायलेकी जखमी झाल्या. सैफुल रोडवरील सार्वजनिक रस्त्यावरून पौर्णिमा महासिद्ध खूपसंगे (वय ३०, रा. रामनारायन विहार, सैफुल, विजापूर रोड) या व त्यांची आई महानंदा असे मिळून दुचाकी क्रमांक एम एच १३ एडब्ल्यू ८४५६ यावरून नवी पेठ येथे जात होते. त्यावेळी सोरेगाव देशाने जाणाऱ्या अज्ञात इसमाने त्याच्या ताब्यातील दुचाकी क्रमांक १३ एके १२२८ ही भरधाव वेगाने चालवून खूपसंगे यांच्या दुचाकीला धडक दिली. यामध्ये खूपसंगे व त्यांच्या आईला मुक्कामार लागून त्या जखमी झाल्या. याप्रकरणी विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार गायकवाड हे करीत आहेत.

### स्कूल बसची दुचाकीला धडक; दोघेजण जखमी

**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

स्कूलबसच्या धडकेत दोघेजण जखमी झाल्याचे घटना २६ ऑगस्ट रोजी सकाळी आठ वाजण्याचा सुमारास मल्लिकार्जुन नगर ते वालचंद कॉलेज दरम्यान घडली. याप्रकरणी अलविरा शकील शेख (वय १७, रा. मल्लिकार्जुन नगर) याने दिलेल्या फिर्यादीवरुन एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अलविरा शेख व त्यांचे वडील दुचाकी क्रमांक एमएच १३ बीएन ८३५२ यावरून जात असताना स्कूल बस क्रमांक एमएच १३ एएक्स ०५३० या वाहनाने त्यांच्या दुचाकीला धडक देऊन दुखापत केली. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार गायकवाड हे करीत आहेत.

### विवाहितेचा छळ करत मारहाण; पतीसह सात जणांवर गुन्हा

**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

पैशासाठी विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह सातजणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी चांदणी उर्फ चिमूना अरमान शेख (वय २३, रा. नई जिंदगी, विष्णू नगर भाग २) या विवाहितेच्या फिर्यादीवरून पती अरमान शेख, सासरा खलील शेख, सासु कमरी शेख, नणंद अंजुम, नंदेचा पती अमीर, नणंद आसमा, नंदवा अमिर (सर्व रा. जिलेका मंजील, आदर्श कॉलनी, जत, सांगली) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. चांदणी या मे २०२३ ते जून २०२४ या कलावधीत सासरी नांदत होत्या. त्यावेळी सासरी नांदत असताना पती व इतरांनी तिला किरकोळ गोष्टीवरून शारीरिक व मानसिक त्रास देऊन शिवीगाळ करत मारहाण केली. त्यानंतर तुला घरातील कामे नीट करता येत नाही, गॅरेज व्यवसायाकरिता माहेरून दोन लाख रुपये घेऊन ये,नाहीतर घर सोडून जा व मला घटस्फोट द्यावा लागेल असे म्हणून दमदाटी करत बेदम मारहाण केल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस हवालदार कटके हे करीत आहे.

# सोलापूरकरांचे विमानसेवेचे स्वप्न दिवाळीपर्यंत साकारणार

## जिल्हाधिकारी आशीर्वाद यांची प्रयत्नांची पराकाष्ठा

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**



जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी नोव्हेंबर २०२३ ते आजतागायत म्हणजेच तब्बल आठ ते साडेआठ महिने विमानतळ दुरूस्तीचा सतत पाठलाग केल्याने सोलापूर शहराच्या होटगी रोडवरील विमानतळाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. येत्या पंधरवड्यात हे काम पूर्ण होणार असून, येत्या दिवाळीपर्यंत विमानसेवा चालू करण्यासाठी जिल्हाधिकारी आशीर्वाद हे नागरी उड्डयन महासंचालनालयातील अधिकाऱ्यांकडे पत्रव्यवहार करणार आहेत. दरम्यान, जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी गतीने या विमानतळावरील कामे केल्यानेच दिवाळीपर्यंत विमानसेवा चालू होण्याचे संकेत सध्यातरी मिळू लागले आहेत.



होटगी रोडवरील या विमानतळावर २००८ साली सोलापूर-मुंबई-सोलापूर अशी आठवड्यातून ३ दिवस विमानसेवा सुरू होती. पण अवघ्या १८ महिन्यात 'किंगफिशर' या कंपनीचे दिवाळे निघाल्यानंतर सोलापूरची विमानसेवा बंद पडली. यानंतर काही वर्षानंतर हा विषय पुन्हा समोर आला. तर श्री सिध्देश्वर साखर कारखान्याच्या चिमणीची अडचण समोर आणून ही सेवा ठप्प ठेवली गेली. साखर कारखान्याची चिमणी पाडल्यानंतर पुन्हा विमानतळ व्यवस्थापन आणि जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी स्थानिक लोकप्रतिनिधींच्या सहकार्याने ही विमानसेवा चालू करण्यासाठी विशेष प्रयत्न चालू केले. यासाठी विशेष बैठका घेवून विमानतळासाठी लागणारी आर्थिक तरतूद संबंधित यंत्रणेकडून करण्यात आली. या कामासाठी 'आरसीएस' कडून जवळपास ६५ कोटींचा निधी घेवून विमानतळ दुरूस्तीचे काम नोव्हेंबर २०२३ पासून सुरू करण्यात आले. तब्बल आठ-साडेआठ महिने हे काम चालले. यामध्ये संरक्षण भिंत, रणवे, वाहन पार्किंग, इमारतींची डागडुजी आदी विविध कामे करण्यात आली. जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी अगदी मनावर घेवून दर १५ दिवसाला कामाच्या प्रगतीची पाहणी करून आणि याबाबत संबंधित यंत्रणेशी पाठपुरावा केला होता. यामुळे सध्या अत्यंत देखण्या रूपात हे विमानतळ उभे असून, ते विमान अन् प्रवाशी बांधवांच्या प्रतिक्षेत आहे.

### येत्या १० दिवसात उर्वरित काम पूर्ण

गत महिन्यात डायरेक्टर जनरल ऑफ सिव्हील एव्हिएशनच्या (डीजीसीए) टीमने या विमानतळाची पाहणी केली आहे. त्यांनी सांगितलेल्या काही त्रुटी आमच्या टीमने काढल्या आहेत. यामुळे येत्या १० दिवसांत राहिलेले दुरूस्तीचे काम पूर्ण करून याचा अहवाल पुन्हा डीजीसीए यांच्याकडे देवून विमानतळाचा परवाना मागणार आहोत. यानंतर डीजीसीएची टीम विमानतळाची पुन्हा एकदा पाहणी करेल आणि विमानतळ चालू करण्यासाठी हिरवा सिग्नल देणार आहे. आमची तांत्रिक कामे पूर्ण झाली असून, यानंतर केंद्रीय नागरी उडय्यन मंत्री आणि लोकप्रतिनिधींच्या विशेष प्रयत्नातून प्रवाशी विमानसेवा चालू होणार आहे.

- **बानोथ चॉपला,** विमानतळ व्यवस्थापक

### लवकरच डीजीसीएच्या अधिकाऱ्यांसोबत उच्चस्तरीय बैठक

सोलापूरमधील बहुप्रतीक्षित होटगी रोड विमानतळाच्या या महत्त्वपूर्ण प्रकल्पाच्या पार्श्वभूमीवर, सोलापूर विकास मंचच्या वतीने माजी आमदार नरसिंग मेंगजी यांनी केंद्रीय नागरी उड्डयन राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची नुकतीच दिल्ली येथे भेट घेतली. यावेळी सोलापूरच्या नागरी विमानसेवेचे काम वेळेत होण्यासाठी नागरी उड्डयन महासंचालनालयच्या टीमकडून तपासणी करवून घ्यावी आणि या तपासणीमुळे विमानतळाच्या कामाची गुणवत्ता तपासली जाईल आणि आवश्यक ती मंजुरी प्रक्रियाही वेगाने पार पडेल, असे त्यांना सांगितले. यामुळे मंत्री मोहोळ यांनी डीजीसीच्या अधिकाऱ्यांसोबत उच्चस्तरीय बैठक आयोजित केली आहे. या बैठकीत विमानतळाच्या कामांची गुणवत्ता तपासण्यासाठी लवकरच एक तपासणी टीम पाठवण्याचा निर्णय त्या बैठकीत घेतला जाईल, अशी माहिती मेंगजी यांना दिली.


### जिल्ह्याला विमानसेवेची अत्यंत गरज

सोलापूरमध्ये विमानसेवा लवकर सुरू झाल्यास शहर आणि जिल्ह्यात नवनवे उद्योजक येवून उद्योगांना चालना मिळेल. यामुळे शहरात वाढत असलेल्या सुशिक्षित बेरोजगारीवर मात करता येईल. इतरही क्षेत्रातील लोकांना विमानसेवेची अत्यंत गरज आहे. यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून बंद असलेली विमानसेवा लवकर पूर्ववत व्हावी.

- **राम रेड्डी,** उद्योजक तथा अध्यक्ष, सोलापूर इंडस्ट्रीज असो.

# उजनीच्या पाण्यावर २२ दिवसांत ६.७०१ मि. युनिट वीजनिर्मिती

## दररोज तीन लाख युनिट विजेची निर्मिती



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २८ ऑगस्ट-**

सोलापूर जिल्ह्याची वरदायिनी असणारे उजनी जलाशय १०० टक्के भरल्यानंतर ४ ऑगस्टपासून भीमा नदीत पाणी सोडण्यास सुरुवात झाली. त्याचवेळी धरणावरील विद्युत प्रकल्पासही दररोज १६०० क्युसेक पाणी सोडण्यात आले. मागील २२ दिवसांत या विद्युत प्रकल्पातून तब्बल ६.७०१ मिलियन युनिट वीज तयार झाली आहे. अजूनही धरणातून या प्रकल्पाला पाणी सोडणे सुरूच असून किमान एक महिनाभर विद्युत निर्मिती अशीच सुरू राहू शकते अशी परिस्थिती आहे.

जुलैअखेर उणे पातळीत असलेले उजनी धरण अवघ्या काही दिवसांतच उपयुक्त साठ्यात आले. त्यानंतर धरण ओव्हरफ्लो झाल्यानंतर भीमा नदीसह कॅनॉल, बोगदा, उपसा सिंचन योजनांमधूनही पाणी सोडण्यात आले. त्याचवेळी धरणावरील विद्युत प्रकल्पासाठीही २४ तास पाणी सोडले जात आहे. दररोज तीन लाख युनिट (प्रतितास १२ हजार ५०० युनिट) वीज निर्मिती तेथून होत आहे. उजनीसह अन्य धरणांवरील विद्युत प्रकल्पातून तयार होणारी वीज 'महावितरण'कडून अंदाजे साडेतीन रुपये दराने खरेदी केली जाते. सध्या उजनी धरणात दौंडवरून एक लाख क्युसेकचा विसर्ग जमा होत असून अजून पावसाळा एक महिनाभर आहे. त्यामुळे उजनीवरील विद्युत प्रकल्पातून आणखी एक महिनाभर तरी वीज निर्मिती सुरू राहील, अशी परिस्थिती आहे.उजनी धरणातील पाण्यावर जिल्ह्यातील शेती अवलंबून असून पावणेबारा लाख हेक्टरपैकी जवळपास दोन लाख हेक्टरला उजनीचेच पाणी आहे. जिल्ह्यातील खरीप पिकांखालील क्षेत्र वाढीस उजनी धरणाचा मोठा वाटा असून सध्या ४० हून अधिक कारखाने सोलापूर जिल्ह्यात आहेत.

चालू वर्षामध्ये उजनी धरण पूर्ण क्षमतेने भरल्यानंतर वीज निर्मितीसाठी पाणी उपलब्ध झाल्यापासून या वीज निर्मिती प्रकल्पातून ६.७०१ मिलियन युनिट वीज निर्मिती झाली असून सध्या या प्रकल्पातून प्रतितास १२ हजार ५०० युनिट वीज निर्मिती केली जात असून, दिवसाकाठी ३ लाख युनिट वीज निर्मिती केली जात आहे. सदर वीज इंदापूर येथील १३२ केव्ही वीज उपकेंद्रास दिली जात आहे. प्रकल्प आणखी दोन ते तीन महिने सुरु राहिल्यास मोठ्या प्रमाणात वीज निर्मिती होईल.

**-रायभान आबांडे,**
अतिरिक्त कार्यकारी अभियंता, उजनी वीज निर्मिती प्रकल्प

# मुळेगाव तांड्यावर हातभट्ट्यांवर पौलिसांची कारवाई

## ४००० लिटर गुळमिश्रित रसायन जागेवरच नष्ट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट -**



दक्षिण सोलापूर तालुक्यातील मुळेगाव तांड्यावरील हातभट्टयांवर सोलापूर तालुका पोलिसांनी कारवाई करीत ४ हजार लिटर गुळमिश्रीत रसायन जागेवरच नष्ट केले. तसेच १ लाख ६५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला.

आगामी काळात येणारेगणपती उत्सवव व इतर महत्वाचे उत्सव शांततेत पार पाडून उत्सवाच्या दरम्यान कोणताही अनुचित प्रकार होऊ नये, या अनुषंगाने सोलापूर तालुका पोलीस ठाणेच्या हद्दीतील मुळेगावं ताडा येथे चोरून चालणाऱ्या अवैध हातभट्टी दारूच्या भट्टया उध्दवस्त करण्यात आल्या. अवैधरित्या चालणाऱ्या हातभट्टीवर टाकलेल्या छापा कारवाईत एकूण १ लाख ४८ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यामध्ये ४००० हजार लिटर गुळमिश्रीत रसायन, २० बॅरेल मध्ये भरून ठेवलेली गावंठी हातभट्टी दारू तयार करणे करीता लागणारे साहित्य तसेच अवैधरित्या दारूची हातभट्टी उध्दवस्त करून प्लॅस्टीक बॅरेल जागीच फोडुन त्याातील गुळमिश्रीत रसायन जागेवरच नष्ट करण्यात आले आहे.

सदर बाबत पोलीस नाईक शंकर मुजगोंड यांनी पोलीस ठाणेस दिलेल्या फिर्यादी वरून एकाविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. यापुढेही चोरून अवैध व्यवसाय करणा-या इसमांची गोपनियरित्या माहिती प्राप्त करून त्याांचे विरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर यांनी सांगितले.

ही कारवाई पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलिस अधीक्षक प्रितम यावलकर, पोलीस उपविभागीय अधिकारी संकेते यांचे नेतृत्वाखाली सहायक पोलीस निरीक्षक अभंग सहायक पोलीस निरीक्षक कदम, पोलिस उपनिरीक्षक जाधव, कांबळे, सहायक फौजदार बागवान, बाणेवाले, हवालदार सय्यद, महिला हवालदार कुंभार, पोलिस नाईक शेख, मुजगोंड व उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाकडील सहायक पोलिस निरीक्षक झालटे, पोलिस नाईक शेख, मंजुळकर, पोलीस अंमलदार कुंभार यांनी केली.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### बोचरेवस्ती, करकंब जिल्हा परिषद शाळेत दहीहंडी उत्सव उत्साहात

**करकंब, दि. २८ ऑगस्ट-**

बाचरे वस्ती, करकंब येथील जि. प. प्रा. शाळेत श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमीत्त दहीहंडीचे आयोजन करण्यात आले होते. या दहीहंडी उत्सवात पहिली ते सातवीचे ८० विद्यार्थी सहभागी झाले. बालकृष्ण रूपातील आदर्श माने व राधेच्या रूपातील स्वराली माने ही राधा-कृष्णाच्या रूपातील जोडी सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. शेवटी गोपालकृष्ण कन्हैय्याने दहीहंडी फोडल्यानंतर खाऊ वाटपाने कार्यक्रमाची सांगता झाली. हा उत्सव यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक अनिल जगताप, शिक्षक नवनाथ कवडे, संतोष कापसे, हेमंत माने, संतोष थोरात यांनी परिश्रम घेतले. शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष दिलीप माने, सदस्य अंकुश माने, पालकांचे विशेष सहकार्य लाभले.



### कर्मवीर पाटील विद्यालयातील मुलींच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना करा : भैस

**पिलीव, दि. २८ ऑगस्ट-**

महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील बदलापूर येथे शाळेतील अलपवयीन मुलीवर जी अत्याचाराची घटना घडली ती पुरोगामी महाराष्ट्राच्या दृष्टीने अतिशय निंदनीय आहे. या पारशवभुमीवर पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विदयालय व रमेश खलिपे ज्युनिअर कॉलेजमध्ये मुलींच्या सुरक्षीततेच्या दृष्टीने कडक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी पिलीव महीला राष्ट्रवादी काँग्रेसच्या पिलीव शहराधयक्ष पूनम भैस यांनी विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजी कापसे यांच्याकडे निवेदनादवारे केली आहे. यावेळी आनंता जामदार, दामोदर लोखंडे, अतुल नष्टे, संजय पाटील, प्रमोद भैस, आदी मान्यवर यावेळी उपस्थितीत होते.

### कणबस गं. येथे आजपासून श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर पुराण

**अक्कलकोट, दि. २८ ऑगस्ट-**



दक्षिण सोलापूर तालुक्यातील कणबस (गं) येथे ग्रामदैवत श्री गंगाधर महाराजांच्या सप्ताह सोहळानिमित्त गुरुवारी २९ ऑगस्ट ते बुधवारी ४ सप्टेंबर पर्यंत दररोज रात्री ८ ते १० पर्यंत श्री गंगाधर मंदिरात श्री ष. ब्र. १०८ गुरुशांतलिंगेश्वर शिवाचार्य महास्वामी-कल्लहिप्परगे यांच्या रसाळ वाणीतून श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर चरित्रामृत या महापुराणाचे आयोजन करण्यात आले आहे. यासोबतच कलबुर्गीचे प्रसिद्ध गवई वे. वीरय्या हित्तलशिरूर तसेच सोलापूरचे प्रसिद्ध तबलावादक परमेश्वर स्वामी यांचा भक्तीगीतांचा संगीत कार्यक्रम होणार आहे. श्री अम ोगसिद्ध गायन संघ कणबसचे मुख्य गायक पप्पू अमोगसिद्ध घुळी महाराजांच्या रसाळ वाणीतून कन्नड डोळ्ळीन पदगळू कार्यक्रम होणार आहे. दररोज रात्री१० वाजता महापुराणानंतर सर्व भाविक भक्तांसाठी महाप्रसादाची सोय करण्यात आली आहे. याचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### छत्रपती शिवरायांचा पुतळा कोसळल्याप्रकरणी करमाळ्यात होणार निषेध अन् निदर्शने

**करमाळा, दि. २८ ऑगस्ट**

मालवण येथील राजकोट किल्लयावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले होते. या कार्यक्रमास आठ महिने झाले आणि केवळ आठ महिन्यातच छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळला आणि संबंध महाराष्ट्रातील शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. त्याबद्दल समस्त शिवभक्त करमाळा शहर व तालुक्याच्या वतीने या घटनेचा जाहीर निषेध करण्यात येणार आहे. या घटनेच्या निषेधार्थ छत्रपती चौक करमाळा येथे उद्या गुरुवार २९ ऑगस्ट रोजी सकाळी १०.३० वाजता या घटनेचा जाहीर निषेध केला जाणार आहे. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास दुग्धाभिषेक केला जाणार आहे. समस्त शिवभक्तांनी जास्तीत जास्त संख्येने छत्रपती चौक करमाळा येथे उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

### करमाळ्यात आज महिला सन्मान रॅली

**करमाळा, दि. २८ ऑगस्ट-**

कोलकत्ता, अंबरनाथ, पुणे, कोल्हापूर व बदलापूर अशा अनेक ठिकाणी देशांमध्ये महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ होते आहे. ही निंदनीय गोष्ट आहे. त्याविरुद्ध आवाज उठवण्यासाठी गुरुवारी २९ ऑगस्ट रोजी तहसील कार्यालय, करमाळा येथे महिला अत्याचार विरोधी कृती समितीने आंदोलन करण्याचे ठरले आहे. सध्या देशात डॉक्टर महिला, प्राथमिक शाळेमध्ये शिकणारी मुलगी या सर्वांवरील अत्याचारांच्या घटना मोठ्या प्रमाणावर वाढलेल्या दिसत आहेत. ही कृत्ये क्रूर व अमानवीय आहेत. आपण रोज असुरक्षित व भययुक्त वातावरणात जगत आहोत. याविरुद्ध केवळ हळहळ करून किंवा संताप व्यक्त करून भागणार नाही. सरकार कोणत्याही पक्षाचे असो स्त्रियांना सुरक्षित व सन्मानाने जीवन जगता येणे हा स्त्रियांचा माणूस म्हणून अधिकार आहे. त्यासाठी सरकारने योग्य ती काळजी घेतलीच पाहिजे. रॅलीचा मार्ग छत्रपती शिवाजी महाराज पुतळा-दत्त पेठ-गुजर गल्ली-डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा-गायकवाड चौक-महात्मा फुले-सावित्रीबाई फुले पुतळा-तहसीलदार कार्यालय असा असेल. तहसीलदारांना निवेदन देऊन रॅलीची सांगता होणार आहे.

# भाजपाच्या उमेदवारीबाबत संभ्रम

## माळशिरस विधानसभा मतदारसंघ; महाविकास आघाडीकडून उत्तमराव जानकर यांचीच चर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २८ ऑगस्ट-**



माळशिरस विधानसभा मतदारसंघात भाजपाकडून कोणाला उमेदवारी मिळणार, याबाबत मोठ्या प्रमाणात संभ्रम निर्माण झाला असून, महाविकास आघाडीकडून उत्तमराव जानकर यांचे नाव फायनल मानले जात आहे. भाजपाकडून आ. राम सातपुते यांच्याबरोबरच अनेकजण इच्छुक आहेत.

महाराष्ट्रात विधानसभा निवडणूक अवघ्या दोन महिन्यांवर येऊन ठेपली आहे. सध्या सर्वच पक्ष विधानसभा निवडणुकीच्या जोरदार तयारीला लागले आहेत. लोकसभा निवडणुकीत भाजपाला बसलेला जोरदार झटका यामुळे सध्या तर भाजपा सावध पवित्र्यात आहे. माढा लोकसभा मतदारसंघात रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांचा व सोलापूर लोकसभा मतदारसंघात आ. राम सातपुते यांचा झालेला पराभव भाजपच्या चांगलाच जिव्हारी लागला आहे. माढा लोकसभा मतदारसंघात पोषक वातावरण असताना व सर्व घटक पक्षाचे आमदार असतानाही पराभव झाला तर सोलापूर लोकसभा मतदारसंघातसुद्धा प्रणिती शिंदे वगळता सर्व आमदार महायुती व भाजपाचे असताना झालेला पराभव सध्या माळशिरस तालुक्यातून भाजपा कोणाला संधी देणार याविषयी तालुक्यात सध्या जोरदार चर्चा सुरु आहे. यामध्ये माळशिरस तालुक्याचे विद्यमान आ. राम सातपुते यांनी गेल्या पाच वर्षात विकासकामांसाठी हजारो कोटी रुपयांचा निधी आणून तालुक्यात प्रचंड विकासकामे केली. मात्र सोलापूर लोकसभा मतदारसंघात पराभव झाल्यानंतर ते तालुक्यात फारसे सक्रिय दिसत नाहीत. यामुळे कार्यकर्ते मोठ्या संभ्रमात आहेत तर भाजापकडून अतुल सरतापे तसेच माजी उपसभापती किशोर सुळ हेही इच्छुक आहेत. तर उस्मानाबाद लोकसभेचे माजी खा. शिवाजीराव कांबळे यांचे पुत्र उद्योगपती भूषण कांबळे हेही माळशिरस तालुक्यातून निवडणूक लढविण्यास इच्छुक आहेत. सध्या ते तालुक्यात सक्रिय असून त्यांनी गावभेटीवर भर दिल्याचे दिसत आहे. सध्या भाजपामधून निवडणूक लढविण्यास हे इच्छुक असून यापैकी कोणाला भाजपा संधी देणार याविषयी मात्र साशंकता आहे. पण सध्या अतिशय सक्रिय असणारे आमदार सध्या मतदारसंघात बऱ्याच दिवसांपासून नाहीत. यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम आहे.



### मविआ सुसाट... भाजपामध्ये मरगळ

भाजपा सध्या माळशिरस विधानसभेच्या आखाड्यात कोणाला उतरवणार याकडे लक्ष लागले आहे. लोकसभा निवडणुकीनंतर भाजपामध्ये सध्या थोडीसी मरगळच आली आहे तर दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे उमेदवार उत्तमराव जानकर यांनी तालुक्यात प्रत्येक कार्यक्रमात हजेरी लावत प्रचंड मोठा जनसंपर्क वाढविला आहे. त्यामानाने भाजपमध्ये सध्या तर शांतता पाहवयास मिळत आहे.

# बार्शीतील अस्मिता अभियानाला चांगला प्रतिसाद

## आ. राऊत यांच्या हस्ते उद्घाटन; शहरासह ग्रामीण भागातील दिव्यांगांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी. दि. २८ ऑगस्ट -**



जिल्हा समाज कल्याण, आरोग्य आणि शिक्षण विभाग, जिल्हा प्रशासन, सोलापूर जिल्हा परिषद, जिल्हा सामान्य रुग्णालय, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने ग्रामीण रुग्णालय बार्शी येथे दिव्यांग व्यक्ती अस्मि ता अभियानांतर्गत नोंदणी व तपासणी-विशेष मोहीम शिबीर घेण्यात आले. याचे उद्घाटन आ. राजेंद्र राऊत यांच्या हस्ते करण्यात आले.

दिव्यांग व्यक्ती अस्मिता अभियानांतर्गत अनेक गरजू विद्यार्थी आणि व्यक्तींना यामुळे सहज व सुलभ अपंग प्रमाणपत्र मिळण्यास मदत होईल. पात्र लाभार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घ्यावा. दिव्यांग प्रमाणपत्र शिबिरासाठी दिव्यांगांना कोणतीही अडचण येणार नाही याची दक्षता वैद्यकीय अधिकारी यांनी घ्यावी, असे आ. राजेंद्र यांनी सांगितले. बार्शी शहरातील गाडेगाव रोड येथे २० कोटी मंजूर उपजिल्हा रुग्णालयाच्या नवीन इमारतीच्या बांधकामाची पाहणी आ. राऊत यांनी करुन ठेकेदाराला सूचना केल्या. यावेळी तहसीलदार एफ. आर. शेख, महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी रेश्मा पठाण, ग्रामीण रुग्णालय वैद्यकीय अधिकारी बोपलकर, निवडणूक निर्णयाधिकारी संजीवन मुंडे, कौरव माने, वैद्यकीय अधिकारी, रुग्णालयाचे कर्मचारी उपस्थित होते.

### विकासाचेच राजकारण करणार : आ. राऊत

आमदार झाल्यापासून ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनतेला चांगल्या प्रकारची आरोग्य सेवा देण्यासाठी यश येत आहे. ही माझ्यासाठी समाधानाची बाब आहे. तसेच मतदारसंघाचा विकासासाठी आवश्यक ते प्रयत्न करुन कायम विकासाचे राजकारण करणार आहे. या उपजिल्हा रुग्णालयाच्या माध्यमातून तालुक्यातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात फायदा होणार असून त्यांना उपचारासाठी इतर ठिकाणी जावे लागणार नाही, असे आ. राजेंद्र राऊत यांनी सांगितले.

# मैंदर्गी येथे विजेच्या धक्क्याने विवाहित तरुणाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २८ ऑगस्ट-**



घरावरील लोखंडी पत्रे काढत असताना विजेचा धक्का लागून एका ३६ वर्षीय विवाहित तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना तालुक्यातील मैंदर्गी येथे घडली.

शरणप्पा यंकप्पा बुरुड (वय ३६, रा. विणकर वसाहत, मैंदर्गी) असे या घटनेत मरण पावलेल्या तरुणाचे नाव आहे. शरणप्पा हे रविवारी सकाळी नऊच्या सुमारास गावामधील यल्लप्पा बुरुड यांच्या घरी दुरुस्तीचे काम सुरू असताना घरावरील पत्रे खराब झाल्याने काढत होते. त्यावेळी अचानक विजेचा धक्का लागल्याने पत्र्यावरून खाली कोसळले. त्यांना गंभीर जखमी अवस्थेत ग्रामीण रुग्णालय अक्कलकोट येथे उपचाराकरिता दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून पाहिले असता ते उपचारापूर्वीच मयत झाल्याचे सांगितले. मयत शरणप्पा बुरुड यांच्या घरची परिस्थिती एकदम गरीब व हालाखीची आहे, म्हणून ते मिळेल तेथे मजुरीचे काम करत होते. बुरुड यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, आई, वडील व भाऊ असा परिवार आहे. या घटनेची नोंद अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्यात झाली आहे. तपास पोलीस नाईक जगदीश राठोड करीत आहेत.

# महाराष्ट्र विद्यालयातील खेळाडूंची विभागीय शालेय फुटबॉल, वुशू स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २८ ऑगस्ट-**



१४ वयोगटातील मुलांच्या जिल्हास्तरीय शालेय फुटबॉल स्पर्धेचे आयोजन वालचंद इंजिनिअरिंग कॉलेज सोलापूर येथे करण्यात आले होते. या स्पर्धामध्ये जिल्ह्यातून पहिला क्रमांक मि ळवत महाराष्ट्र विद्यालय बार्शीच्या संघाची विभागीय स्तरासाठी निवड झाली.

संघातील खेळाडू पुढीलप्रमाणे गणेश देशपांडे, ओजस डुरे, प्रसाद काशीद, राजवीर शिनगारे, सोहम पायघन, गोविंदराज सावळे, क्षितिज घोडेराव, सार्थक शिंदे, अथर्व गाडेकर, प्रथमेश पवार, विराज जिरंगे, सोहम गोसावी, ज्ञानेश्वर शिंदे, सार्थक मोहिते, अलोक शेळके, आर्यन शिनगारे व आर्यन जाधव तसेच जिल्हास्तरीय शालेय वुशू स्पर्धेत महाराष्ट्र विद्यालयाची खेळाडू तनिष्का काकासाहेब गुंड हिने ६१ ते ६५ वजनीगटात प्रथम क्रमांक मिळवली. तिची देखील विभागीयस्तरासाठी निवड झाली आहे. या स्पर्धा पंढरपूर येथे पार पडल्या.

या खेळाडूंना क्रीडाशिक्षक पी. डी. पाटील, योगेश उपळकर व विकास पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थाध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष एन. एन. जगदाळे, संस्थेचे सचिव पी. टी. पाटील, सहसचिव ए.पी. देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य व्ही. एस. पाटील, बी. के. भालके, प्राचार्या के. डी. धावणे, उपमुख्याध्यापक आर. बी. सपताळे, पर्यवेक्षक एस. सी. महामुनी, पर्यवेक्षिका एन. बी. साठे यांनी अभिनंदन केले.

# महा ई-सेवा केंद्रांकडून जनतेची लूट

## तात्काळ कारवाई करा अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा शिवसेनेचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. २८ ऑगस्ट-**



माळशिरस तालुक्यातील म हा ई-सेवा केंद्र चालकांकडून गोरगरीब जनतेची लूट होत असल्याने महा-ई-सेवा केंद्रांवर तातडीने कारवाई करावी अन्यथा माळशिरस तहसील कार्यालयावर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा पत्राद्वारे शिवसेना तालुका प्रमुख सतीश सपकाळ यांनी तहसीलदारांना निवेदनाद्वारे दिला आहे.

माळशिरस तालुक्यातील नातेपुते, अकलूज, पिलीव, वेळापूर यासह तालुक्यात इतर ठिकाणी असणाऱ्या महा ई-सेवा केंद्र, आधारकार्ड केंद्र या ठिकाणी शासकीय दरसूचीप्रमाणे पैसे न घेता मनमानी पद्धतीने जाणीवपूर्वक आर्थिक शोषण करण्याच्या हेतूने नागरिकांकडून अव्वाच्या सव्वा ३००, ५०० अशी रक्कम घेऊन नागरिकांची आर्थिक पिळवणूक करण्यात येत आहे. याबाबत एखाद्या व्यक्तीने एवढे पैसे का घेता? शासकीय दरपत्रकाप्रमाणे का घेत नाही? अशी विचारणा केली असता ते अरेरावीची भाषा करीत स्थानिक गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींना मध्यस्थी घालून त्या नागरिकाला अपम ानास्पद वागणूक देत आहेत. असा अनुभव नागरिकांसह बहुतांश पदाधिकाऱ्यांनाही येत आहे. नातेपुते येथील एका ई-महा सेवा केंद्र चालकाने दरपत्रकाप्रमाणे पैसे घेण्याऐवजी जास्त पैशाची मागणी केली. पैसे न दिल्याने त्यांनी चक्के कागदपत्रे फाडून टाकल्याचा प्रकार घडला. ही अरेरावी थांबावी आणि त्यांच्यावर तात्काळ कारवाई व्हावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

# ओंकार साखर कारखाना परिवार शेतकऱ्यांच्या हितासाठी कटिबद्ध : प्रशांत बोत्रे-पाटील



**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २८ ऑगस्ट-**

निमगाव म. (ता. माळशिरस) येथील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या वतीने ओंकार साखर कारखाना परिवाराचे संचालक प्रशांत बोत्रे पाटील यांचा सन्मान करण्यात आला. बोत्रे-पाटील म्हणाले, ओंकार साखर कारखाना चांदापुरी युनिट एक च्या वतीने ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेऊन त्यावर तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जाईल. परिवाराचे चेरअमन बाबुराव बोत्रे-पाटील यांच्या मार्गदर्शकनाखाली २०२४ व २०२५ या सीझनला कारखान्याच्या प्रतिदिन गाळप क्षमतेत वाढ होणार असून इथेनॉल वीज प्रकल्प कंपोस्ट खत पेट्रोल पंप हे प्रकल्प चालू होणार आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना कोणताही अडचण येणार नाही, याची काळजी कारखाना प्रशानाकडून घेतली जाईल, अशी ग्वाही बोत्रे-पाटील यांनी दिली. यावेळी ऊस उत्पादक शेतकरी प्रकाश मगर, बाळासाहेब मगर, नवनाथ मगर, ब्रह्मदेव मगर, रामचंद्र मगर, मल्हारी मगर, संतोष मगर यासह बहुसंख्य शेतकरी उपस्थित होते.

# दक्षिणच्या आखाड्यात आता ‘उदय’

## सिद्धेश्वर कारखान्याची चिमणी कळीचा मुद्दा; काँग्रेसकडून अनेकजण इच्छुक

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. २८ ऑगस्ट-**



दक्षिण सोलापूर मतदारसंघात लोकसभा निवडणुकीतील मताधिक्य पाहता भाजपाचा पॅटर्न राबवून पुनश्च कम ळाचा ‘उदय’ होणार असल्याची चर्चा सुरू आहे. लोकसभा निवडणुकीत दक्षिणच्या मतदारांनी लोकप्रतिनिधींच्या कार्यपद्धतीवर नाराजी व सिद्धेश्वर कारखान्याची चिमणी पाडकाम यामुळे दक्षिणमधील लिंगायत मतदारांसह इतर समाजातील मतदारांनी काँग्रेसला भरघोस मतदान करून भाजपाची पिछाडी केली. त्यामुळे भाजपाला पुन्हा अच्छे दिन येण्यासाठी सोलापुरातून कमळाचा ‘उदय’ होईल, अशी जोरदार चर्चा सुरू आहे.

ॲटी इन्कम्बन्सी रोखण्यासाठी भाजपा नवख्या उमेदवारांना संधी देऊन पुन्हा कमळ फुलविण्याचे संकेत कार्यकर्त्यांमधून मिळत आहेत.

काँग्रेसकडून ग्रामीण व शहरी भागात पक्ष अजेंडा पोहोचविला जात असताना भाजपाकडून मात्र तालुक्यात पक्षयंत्रणा कुचकामी दिसून येते. लोकसभा निवडणूक निकाल पाहता माजी खा. डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामी यांचे ३८ हजारांचे मताधिक्य कमी होऊन काँग्रेसला दहा हजारांचे मताधिक्य मिळाल्याने भाजपा मतदारांमध्ये घट झाल्याचे दिसून येते. लोकसभा निवडणुकीबरोबर विधानसभा निवडणूक झाले असते तर काँग्रेसचे मताधिक्य आणखी वाढले असते, अशी भीती वर्तविण्यात येत आहे. पंतप्रधान मोदींची लोकप्रियता, राममंदिर, भाजपाचे केंद्रीयस्तरावरील विकास यामुळे काँग्रेसला १० हजारांचे मताधिक्य मिळाले.

२०२३ मध्ये भाजपामध्ये प्रवेश केलेले महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी विशेष निमंत्रित सदस्य उदयशंकर पाटील यांनी दक्षिणमध्ये जनसंपर्क वाढविल्याने मतदारांसाठी आशेची नांदी ठरत आहे. पाटील भाजपाच्या उमेदवारीबद्दल बोलत नसले तरी सिद्धेश्वर कारखान्याचे माजी चेअरमन धर्मराज काडादी व माजी महापौर अरूणा वाकसे यांची घेतलेली भेट, लोकप्रतिनिधींकडून दुर्लक्षित व भाजपाच्या जुन्या नेत्यांसोबत खलबते पाहता पाटील यांच्या उमेदवारीविषयी चर्चा सुरू आहे. उदयशंकर पाटील हे २००४ मध्ये सुशिलकुमार शिंदे यांच्याविरुद्ध निवडणूक लढवून ३५ हजार मतदान मिळविले होते.

लिंगायत समाजातील सर्व शक्तिनिशी काँग्रेसला लढा देणारे नेतृत्व म्हणून पाटील यांची ओळख आहे. तसेच अनेक वर्षांपासून हिंदुत्वाचा अजेंडा तळागाळात पोहोचविण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न केल्याने दक्षिणच्या विकासासाठी भाजपा पाटील यांना संधी देणार असल्याचे कार्यकर्त्यांमधून बोलले जात आहे. दक्षिण तालुक्यातील विविध गावभेट दौऱ्यामागे विधानसभेसाठी इच्छुक असल्याचे बोलले जात आहे.

### दक्षिणच्या मतदारांचे ऋण फेडणे अशक्य

माझे व दक्षिण सोलापूरमधील मतदारांचे आई व मुलाचे नाते आहे. अंगावरचे कातडे करून त्याचे जोडे बनविले तरी मी दक्षिणच्या मतदारांचे २००४ पासूनचे ऋण फेडू शकत नाही. माझा पक्ष माझ्यासाठी सर्वस्व आहे. पक्ष देईल ती जबाबदारी पार पाडणार आहे.

**- उदयशंकर पाटील,**
विशेष निमंत्रित सदस्य, प्रदेश कार्यकारिणी, भाजपा

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## श्री गजानन महाराजांचा ३० ऑगस्टपासून वर्षावास महोत्सव

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट -**
श्री स्वामी समर्थ चिन्मय पादुका मठ (श्री बाळप्पा मठ) गुरुमंदिर अक्कलकोट व विश्व फाऊंडेशन शिवपुरी तसेच येथील श्री सद्गुरू परीचायी सेवा समिती आणि आई फाऊंडेशन आयोजित परमसद्गुरु श्रीगजानन महाराज यांच्या चिन्मय पादुकांचे पूजन व दर्शन सोहळा अर्थात वर्षावास महोत्सव ३० ऑगस्ट ते २ सप्टेंबर या कालावधी पर्यंत सहस्त्रार्जुन मंगल कार्यालय सिद्धेश्वर पेठ येथे आयोजित केला आहे. भाविक भक्तांनी या कार्यक्रमास उपस्थिती दर्शवून परम सद्गुरु श्री गजानन महाराज यांच्या चिन्मय पादुकांच्या दर्शनाचा लाभ घ्यावा. असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

**कार्यक्रम असा :** शुक्रवार सायं. ५.३० : श्रीच्या पादुकांचे आगमन, स्वागत, दर्शन, अग्निहोत्र. शनिवार सकाळी स. ६.१६ : सूर्योदय अग्निहोत्र. १० ते १२ : टाळ (हरे राम हरे कृष्ण) श्री सोनामाता कन्या विद्यालय. रविवार : स. ६.१६ सूर्योदय अग्निहोत्र. स. १० ते १२ : महामृत्युंजय मंत्र हवन. सोमवार : स. ६.१६ व १० ते १२ सूर्योदय, अग्निहोत्र. स. ७ ते ११ : गजानन चिंतामणी पारायण, आरती. स. ११.३० ते २.३० : पादुका महापूजन, दर्शन महाप्रसाद.



## संक्षिप्त वृत्त...



### सावडीच्या वक्तृत्व स्पर्धेत स्वराज दवणे प्रथम

**करमाळा, दि. २८ ऑगस्ट-**
सावडी (ता. करमाळा) येथे अखंड हरिनाम सप्ताह निमित्त शालेय स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यातील वक्तृत्व स्पर्धेत स्वराज दवणे याने प्रथम क्रमांक मिळवला. हिराभारती महाराज अखंड हरिनाम सप्ताह सावडी येथे शालेय विविध गुणदर्शन स्पर्धांचे आयोजन केले होते. यात लहान गट तिसरी ते सातवी व मोठा गट आठवी ते दहावी दरम्यान वक्तृत्व स्पर्धा आयोजित केले. या स्पर्धेमध्ये लहान गटात त्रिमूर्ती विद्यालय व रामराजे कोकाटे जुनिअर कॉलेज टाकळीचा विद्यार्थी कुमार स्वराज रविंद्र दवणे याचा प्रथम क्रमांक आला. त्याबद्दल सावडी गावचे सरपंच भाऊसाहेब शेळके, स्वप्निल जाधव व अन्य कार्यकर्त्यांनी शाळेवर येऊन ३,१११ रुपये रोख सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन त्याचा सन्मान केला यावेळी विद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र कोकाटे, शिक्षक-शिक्षकेतर, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



### ठोंबरे, लायन्स परिवाराच्या वतीने बुंजकरवस्ती जिल्हा परिषद शाळेला शैक्षणिक साहित्य भेट

**सांगोला, दि. २८ ऑगस्ट-**
स्व. मधुसुदन पंढरीनाथ ठोंबरे गुरूजी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त बुंजकरवाडी, सांगोला येथील जि. प. प्राथमिक शाळा येथे ठोंबरे परिवार व सांगोला लायन्स क्लब यांच्याकडून शैक्षणिक साहित्य, म्युझिक सिस्टम भेट व खाऊ वाटप करण्यात आले. यावेळी लायन्सचे माजी प्रांतपाल प्रा. प्रबुद्धचंद्र झपके, सां. ता. शि. प्र. मंडळाचे सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, सांगोला विद्यामंदिरचे प्राचार्य अमोल गायकवाड, लायन्सचे अध्यक्ष उन्मेष आटपाडीकर, राजमाने, विजय इंगोले, प्रा. धनाजी चव्हाण उपस्थित होते. यावेळी प्रा. प्रबुद्धचंद्र झपके यांनी या शाळेची स्थापना करण्यामागे स्व. मधुसुधन ठोंबरे यांचे योगदान महत्त्वपूर्ण असून त्यामुळेच आज या परिसरातील अनेक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत असे सांगत ठोंबरे परिवाराने हाती घेतलेल्या उपक्रमाचे कौतुक केले. प्रास्ताविक मुख्याध्यापिका गवसने यांनी तर आभार प्रदर्शन स्मिता शिंदे-गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन सचिन बुंजकर यांनी केले.

### महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समितीच्या विविध मागण्यांवर मंत्रालयात सोमवारी बैठक

**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**
विविध मागण्यांसंदर्भात महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांची सोमवार दि. २ सप्टेंबर २०२४ रोजी मंत्रालयात नगर विकास विभागाचे प्रधान सचिव यांच्या समवेत बैठक आयोजित करण्यात आली आहे.व्यापाऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी बैठकीची वेळ मिळण्यासंदर्भात महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी केली होती. त्यानंतर उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या आदेशानुसार सोमवार दि. २ सप्टेंबर रोजी सकाळी १२.३० वाजता मंत्रालयात सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे ही बैठक आयोजित केली आहे. सेस रद्द करावा. यूजर चार्जेसचा कायदा रद्द करावा. परराज्य व आयात माल रिपॅक केलेल्या व प्रक्रिया केलेल्या मालावरील नियमन रद्द करावे. बाजार समिती अनुज्ञप्ती ऑनलाईन करावी. अनुज्ञप्ती नूतनीकरण पाच वर्षासाठी करावे. भाडेपट्ट्यासाठी पणन संचालकांचे सन १९९१ चे परिपत्रक निरस्त करावे. महाराष्ट्रातील मुख्य बाजार समित्या राष्ट्रीय बाजार समित्यांमध्ये घ्याव्यात व त्याचे नियम कृती समिती बरोबर चर्चा करून ठरवावे. सर्व बाजार समित्यांवर युडीपीसीआर प्रमाणे बांधकाम परवानगी द्यावी. युडीपीसीआर प्रमाणे परवानगीच्या विकसन शुल्क महानगरपालिका व बाजार समितीमध्ये समप्रमाणात देण्यात याव्यात. कृषी उत्पन्न बाजार समितीमधील भूखंडावरील महापालिका टॅक्स कमी करावे. बाजार समिती सेस आकारणी रद्द करून शासनाकडून अनुदान द्यावे. बाजार समितीच्या संचालक पदी नाशवंत व बिगर नाशवंत मालासाठी वेगवेगळ्या व्यापारी प्रतिनिधी असावेत यासह विविध विषयांवर यावेळी चर्चा होणार आहे.

### जगदंबा फॅमिलीतर्फे आसरा चौकातील बालाजी सरोवरसमोर गिफ्ट शॉपी प्रदर्शन, विक्री

**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**
गोरी व गणपती सणानिमित्त आसरा चौकातील बालाजी सरोवरसमोर कोकण फॅमिली टेरस गिफ्ट शॉपी प्रदर्शन व विक्री ठेवली आहे. ऑनलाइन किंवा पुणे, मुंबई येथे जाऊन वेगवेगळे गिफ्ट खरेदी करावे लागू नये म्हणून जगदंब फॅमिली व जगदंब नर्सरीच्या माध्यमातून मूरादाबाद, दिल्ली, लखनौ व जयपूरमधून नवीन वरातीचे वेगवेगळे गिफ्ट आहेत. यामुळे गौरी व गणपतीच्या देखाव्यात भर पडणार आहे. या प्रदर्शनात वेगवेगळे गिफ्ट बारचे वेगवेगळी व्हरायटी कलरचे दगड प्रदर्शनात पाहायला मिळणार आहे. नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जगदंब नर्सरीचे डायरेक्टर प्रद्युम्नसिंह राजपूत व जगदंब फॅमिलीचे धारासिंह राजपूत, विरेंद्र शिखरे सचिन कांबळे यांनी केले आहे.

# पंढरपुरातील आरक्षित जागेवर भूमाफियांचा डल्ला

## खेळाडूंच्या स्टेडियमसाठी 'जुनी शर्त' नोंद असूनही 'ती' जागा प्लॉटिंगसाठी केली डेव्हलप

### आदेश व खरेदी व्यवहार रद्द न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा आरपीआयचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २८ ऑगस्ट-**
पंढरपूर तालुक्यातील कासेगाव हद्दीतील गट नंबर १४/१ अ/२/ अ ही जागा ८ एकर जागा वीस वर्षांपूर्वीच नगरपालिका प्राधिकरणाने पंढरपूर शहरातील खेळाडूंसाठी स्टेडियम उभे करण्यासाठी आरक्षित केली आहे. सदर जागेवर 'जुनी शर्त' असून सुद्धा पंढरपूर येथील भूमाफियाने ही जागा बोर्ड लावून प्लॉटिंगसाठी डेव्हलप केली असल्याचा आरोप आरपीआयचे नेते दीपक चंदनशिवे यांनी केला आहे. याबाबत



आवाज उठवण्यासाठी दीपक चंदनशिवे यांनी कार्यकर्त्यांना सोबत घेऊन तहसील कार्यालय गाठत पंढरपूर तालुक्याचे तहसीलदार व सहनिबंधक यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे. या गंभीर प्रकरणी चौकशी करून तात्काळ कारवाई करावी अन्यथा खेळाडू व नागरिकांना सोबत घेऊन आंदोलनाचा इशारा दिला आहे.

पंढरपूर शहरात स्टेडियम व्हावे व पंढरपूर तालुक्यातून अनेक खेळाडू निर्माण व्हावेत. यासाठी येथील जनतेची अनेक वर्षापासून स्टेडियम व्हावे ही मागणी होती. मात्र पंढरपूर शहर व तालुक्यातील काही निवडक भूमाफिया या जागेवरती प्लॉट पाडून विक्रीसाठी बोर्ड लावून विक्री करीत असून सदरची शासकीय आरक्षित जागा हडप करण्याचा काळा धंदा होत असल्याचे दिसून येत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

यापूर्वी अनेक पंढरपूर शहरातील व लगतचे भूखंड असेच हडप केल्याचे अनेक तक्रारी येऊन सुद्धा या भूमाफियांवर कुठल्याही प्रकारची कारवाई झाली नाही हे भूखंड माफिया मुजोर झाले आहेत. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने हा आदेश व हे खरेदी व्यवहार रद्द नाही झाल्यास पंढरपूर तहसील समोर खेळाडू व नागरिकांना सोबत घेऊन तीव्र स्वरूपाचे आंदोलन केले जाईल त्याच बरोबर पंढरपूर शहरात ग्रामीण भागातील मुला मुलींसाठी समाज कल्याण विभाग अंतर्गत वसतिगृह असून ते जागे अभावी मागील वीस वर्षांपासून भाड्याच्या बिल्डिंगमध्ये सुरु आहे. मागासवर्गीय ग्रामीण मुला मुलींच्यासाठी वसतिगृह बांधण्यासाठी जागेची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून करुनही नगरपालिका जागा उपलब्ध करून देत नाही.तर स्टेडियमसाठी शासकीय आरक्षित जागा असे भूखंड माफिया हडप करून प्रचंड माया जमवत आहेत. अशी खंत यावेळी दीपक चंदनशिवे यांनी व्यक्त केली.

#### डाव हाणून पाडणार

नगरपालिकेने खेळाडूसाठी स्टेडियम उभे करण्यासाठी सदरची जागा आरक्षित केली असताना आणि या जागेवर जुनी शर्त नोंद असताना सुद्धा भूखंड माफियांनी डल्ला मारण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. त्या जागेवर खेळाडू च्या उज्ज्वल भविष्यासाठी स्टेडियमच उभे राहिले पाहिजे. शासनाने याची गंभीरपणे दखल घेणे गरजेचे आहे अन्यथा खेळाडू व नागरिकांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन करणार आणि त्या भुमाफियांचा डाव हाणून पाडणार

-दीपक चंदनशिवे

## मांगी एमआयडीसीसाठी जिद्दीने प्रयत्न करणार

### माया झोळ : पोफळज येथे विधानसभेसाठी कॉर्नर बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २८ ऑगस्ट-**
करमाळा तालुक्यामध्ये व्यावसायिक, शैक्षणिक सुविधा, आरोग्याची दूरवस्था, मांगी एमआयडीसीसाठी पाठपुरावा, रोजगार निर्मिती, भिगवण येथील दत्तकला शिक्षण संकुलाबरोबरच देवळाली येथील प्रस्तावित व्यावसायिक शिक्षण संकुलाच्या माध्यमातून शैक्षणिक अडचण सोडवण्याचा प्रयत्न करणार असल्याचे माया झोळ सांगितले.



करमाळा विधानसभा मतदारसंघातीलपोफळजमध्येदत्तकला शिक्षण संस्थेच्या सचिवा माया झोळ यांची कॉर्नर बैठक झाली, यावेळी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी संभाजी शिंदे होते. येत्या काळात प्रा. रामदास झोळ यांच्या माध्यमातून तालुक्यात अनेक विकासकामे होणार आहेत. विधानसभेला प्रा. रामदास झोळ यांच्या पाठीमागे उभा राहण्याचे आवाहन माया झोळ यांनी केले. यावेळी अमोल सुरवसे, शिवाजी धुमाळ, अण्णा पवार, दत्तात्रय धुमाळ, सचिन पवार, लक्ष्मण पालखे, शरद पवार, धनंजय पवार, अभिजित पवार, प्रवीण पवार, विशाल हजारे, सागर कांबळे, शैलेश पवार, उमेश पवार, सचिन रगडे, हर्षद पवार, रमेश सुरवसे, महादेव क्षीरसागर, बलभीम पवार, पोपट राऊत, कांतीलाल गव्हाणे, दादासाहेब हातीकर, लक्ष्मण साळवे, जालिंदर पवार, नाना पवार, गजेंद्र पवार, अशोक शिंदे, सतीश पवार, माणिक देशमुख उपस्थित होते.

## दक्षिणमध्ये बळीराजाची उडीद काढण्यासाठी लगबग

### पावसाने विश्रांती घेतल्याने वाढली धावपळ

### मजुरीचे दर वाढले

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. २८ ऑगस्ट-**
आठ दिवसांपासून पावसाने विश्रांती घेतल्याने दक्षिणमधील शेतकरी उडीद काढण्याच्या लगबगीत दिसून येत आहे. सर्वत्र एकाच वेळी उडीद काढण्यासाठी घाई होत असल्याने महिला व पुरुषांच्या मजुरीमध्ये पन्नास ते शंभर रुपयांची वाढ झाली आहे.

दक्षिण तालुक्यात यंदा सर्वच पावसाने दमदार हजेरी लावल्याने खरीप पिके जोमात आहेत. रोहिणी, मृग, मघा नक्षत्रांच्या पावसाने जोरदार बरसल्याने पिके जोमात होती. मात्र मघा नक्षत्राने सतत आठ दिवस दमदार हजेरी लावल्याने मूग, उडीद, सोयाबीन, तूर व भुईमूग यासह अनेक पिके पाण्यात थांबल्याने उत्पादनावर परिणाम होत आहे. सततच्या जोरदार पावसामुळे काढणीला आलेले मूग, उडीद पिके करपून गेली आहेत तर तुरीमध्ये पाणी थांबल्याने तूर वाळून गेली आहेत. अनेक ठिकाणी भुईमुगासह इतर पिकांमध्ये आठ दिवस पाणी असल्याने हिरवी पिके पिवळसर झाली आहेत. त्यामुळे काढणीला आलेल्या उडीद व मूगवर पावसाचे परिणाम होऊ नये म्हणून अधिक मजूर लावून काढणी करण्यात येत आहे. पावसाने विश्रांती घेतल्याने सर्वच शेतकऱ्यांकडून उडीद काढणीला प्राधान्य देण्यात येत आहे. त्यामुळे महिलांची मजुरी अडीचशे रुपयांवरून साडेतीनशे रुपयांवर पोहोचली आहे. तर पुरुषांची मजुरी ३०० रुपयांवरून ४५० रुपयांवर पोहोचली आहे. उडीद पिकाचे उत्पन्नापेक्षा अधिक काढणीवर खर्च होत असल्याने शेतकरी हवालदिल बनला आहे. मजुरी व मळणी यंत्रामुळे शेतकरी मेटाकुटीस आला आहे. उडिदाची आवक अधिक झाल्याने भाव एक हजाराने कमी झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्याची धावपळ दिसून येत आहे.



#### मजुरी वाढीचा फटका

पावसाळ्यापूर्वी महिलांची मजुरी दोनशे ते अडीचशे रुपये होती. आता मजुरी साडेतीनशे रुपयांवर पोहोचली आहे, तर पुरुषांची मजुरी थनशे रूपयांवरुन साडेचारशे रुपयांवर पोहचली आहे. त्यामुळे कमी भावामुळे मजुरीचा फटका शहन करावा लागत आहे.

#### उडिदाची काढणी अन् रास

उडीद पाक दिवसभर अधिक मजूर लावून काढणी पटापट करण्यात येत आहे. दिवसभर काढलेल्या उडिदाची संध्याकाळी रास करून विक्रीसाठी प्रयत्न होताना दिसून येत आहे. ऊन पावसामुळे शेतकरी मात्र जीव मुठीत धरून काम करीत आहे.

## सोमेश्वरच्या दर्शनासाठी सांगोल्यातून नऊ बस रवाना

### नागरिकांचा चांगला प्रतिसाद

### आ. शहाजीबापू पाटील यांच्या पुढाकारातून श्रावण यात्रा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २८ ऑगस्ट-**
शिवसेनेच्या वतीने आ. शहाजीबापू पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना महिला शहर संघटक आशा यावलकर यांच्या पुढाकाराने महिलांसाठी २८ ऑगस्ट रोजी सांगोला शहरातील आयोध्या नगरी ते सोमेश्वर करंजे अशा मोफत श्रावणमास यात्रेला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यासाठी ९ बस रवाना झाल्या असून ४०० महिला सहभागी झाल्या आहेत.


आ. शहाजीबापू पाटील यांच्या हस्ते नारळ वाढवून दर्शन सोहळ्यासाठी बस रवाना झाल्या. यावेळी शिवसेना महिला आघाडीच्या तालुकाप्रमुख राणी माने, आशा यावलकर यांच्यासह शेकडो महिला उपस्थित होत्या. यावेळी आ. शहाजीबापू पाटील यांनी यापुढे देखील देवदर्शनाची सेवा अविरतपणे सुरु ठेवण्याची भावना व्यक्त केली. महिलांवर कुटुंबाची जबाबदारी असल्याने त्यांना देवदर्शनासाठी घराबाहेर पडता येत नाही. मात्र या श्रावणमास यात्रेतून देवदर्शनाचा आनंद घेता येणार असल्याचे तसेच महिलांना एकत्र करुन देवदर्शन घडविण्याचा आ. शहाजीबापू पाटील यांचा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे उपस्थित महिलांनी सांगितले. या यात्रेला जाण्यासाठी १५ ते ६० वयोगटातील शेकडो मुली व महिलांनी नावनोंदणी केली होती. महिलांसाठी सोमेश्वर करंजे येथे दुपारी जेवणाची सोय करण्यात आली होती.



# भावी आमदार दक्षिणच्या बांधावर

## पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान; भरपाई देण्याची हमी

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. २८ ऑगस्ट-**
मघा नक्षत्राच्या जोरदार पावसामुळे खरीप हंगामातील पिके पाण्यात थांबल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. अति पावसामुळे मूग, उडीद, तूर भुईमूग यासह इतर पिकांचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी विधानसभेसाठी इच्छुक असलेले भावी आमदार चक्क दक्षिण सोलापूरच्या शिवारातील बांधावर जाऊन पिकांची पाहणी करत आहेत. शेतकऱ्यांना भरपाईची हमीही देत आहेत.




मघा नक्षत्राने यावर्षी सतत आठ दिवस जोरदार बरसल्याने दक्षिणमधील बहुतांश शेतकऱ्यांची पिके पाण्यात होती. आठ दिवस पिके पाण्यात थांबल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे. या पिकांची पाहणी करण्यासाठी एमके फाउंडेशनचे अध्यक्ष महादेव कोगनुरे यांनी येळेगाव, मंद्रुप व कंदलगावसह अनेक गावातील शेतकऱ्यांना भेटून नुकसानग्रस्त पिकांची पाहणी केली तर भाजपाचे नेते व बाजार समितीचे संचालक अप्पासाहेब पाटील-वडकबाळकर यांनी मंद्रुप, भंडारकवठे, निंबर्गी, विंचूर, येळेगाव, कंदलगाव, गुंजेगाव यासह इतर गावातील नुकसानग्रस्त पिकांची पाहणी करून नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे.

शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा उपप्रमुख आणप्पा सतुबर यांनी हत्तूर, वडकबाळ, वांगी यासह इतर क्षेत्रातील नुकसान पिकांची पाहणी करून पंचनामा करण्याची मागणी केली आहे.

#### हसापुरेंनी घेतला आढावा

काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष सुरेश हसापुरे यांनीही निंबर्गी, मंद्रुप, भंडारकवठेसह अनेक गावांतील नुकसान पिकांचा आढावा घेऊन शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा केली. माजी आ. दिलीप माने यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची भेट घेऊन विनाअट व त्वरित नुकसानभरपाई व पीक विमा देण्याची मागणी केली आहे.

# बंजारा समाजाच्या नव्या विकास पर्वाची सुरुवात : आ.राणाजगजितसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ ऑगस्ट-**

बंजारा / लमाण तांड्याला स्वतंत्र महसुली गावाचा दर्जा देणे, तांड्याची स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणे तथा सर्वंकष विकास करत बंजारा समाजाला मुख्य प्रवाहात आणून त्यांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महायुती सरकारने संत सेवालाल महाराज बंजारा / लमाण तांडा समृद्धी योजना आणली आहे. या योजनेच्या माध्यमातून तांड्यांचा बृहत विकास आराखडा तयार करण्यात येणार आहे. या योजनेमुळे समाजाच्या विकासाचे एक नवे पर्व सुरू होणार असून समन्वयाने विकास आराखडा तयार करण्याचे आवाहन आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी बंजारा समाज बांधवांशी संवाद साधताना केले.

बंजारा/ लमाण समाज बांधवांसह या समितीवर निवड करण्यात आलेल्या अशासकीय सदस्यांनी आज आ. राणाजगजितसिंह पाटील यांची भेट घेवून शासनाचे आभार व्यक्त केले, त्यावेळी ते बोलत होते.



या योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दोन समित्या गठीत केल्या असून या समित्यांवर प्रत्येकी दोन अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. धाराशिव जिल्ह्यासाठी जिल्हास्तरीय समितीमध्ये विलास राठोड व राणीताई राठोड यांची तर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीवर अतुल राठोड व संतोष चव्हाण यांची निवड करण्यात आली आहे.

जिल्ह्यात व मुख्यतः तुळजापूर तथा उमरगा तालुक्यामध्ये अनेक तांडे असून स्वतंत्र महसुली दर्जा व ग्रामपंचायत नसल्याने येथे विकास कामे करताना अडचणी येत होत्या. त्यामुळे तांड्यांच्या विकासासाठी स्वतंत्र योजनेची गरज विचारात घेऊन महायुती सरकारने संत सेवालाल महाराज बंजारा/लमाण तांडा समृद्धी योजना आणली आहे.

या योजनेच्या माध्यमातून तांड्याला महसुली गावाचा दर्जा देणे, स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणे, तांडा घोषित करणे, गावठाण जाहीर करणे या बाबी करण्यात येणार असून प्रत्येक तांड्याचा विकास आराखडा तयार करण्यात येणार आहे. प्राप्त आराखड्या मधून कामांची गरज व प्रधान्यक्रम ठरविण्यात येणार आहे.

या योजनेच्या माध्यमातून तांड्यांचा मोठ्या प्रमाणात विकास होणार असून ही एक नव्या पर्वाची सुरुवात असल्याचे आ. राणाजगजितसिंह पाटील यावेळी बोलताना म्हणाले.

महायुती सरकारने या योजनेसाठी रुपये ५०० कोटीची तरतूद केली असून केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे. त्यामुळे सर्व तांड्यातील प्रमुख व्यक्तींनी एकत्रित येऊन हेवेदावे बाजूला ठेवत तांड्याचा आराखडा तयार करण्यासाठी समन्वयाने काम करण्याचे आवाहन आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी उपस्थितांना केले. तसेच सामान्य घटकापर्यंत या योजनेचा लाभ पोहोचण्यासाठी प्रभावीपणे काम करण्याच्या सूचना या योजनेअंतर्गत नियुक्त करण्यात आलेल्या शासकीय सदस्यांना त्यांनी यावेळी केल्या.

यावेळी भाजपाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य विद्यानंद राठोड, नळदुर्ग नगरसेवक निरंजन राठोड, धाराशिव बाजार समितीचे उपसभापती शेषेराव चव्हाण, प्रवीण पवार, जळकोटवाडी माजी सरपंच वसंत पवार, राहुल राठोड, मा.नगरसेवक छमाबाई राठोड, अलियाबाद उपसरपंच अमृता चव्हाण, गंघोरा सरपंच श्रीमती बबिता राठोड, अनिल पवार, जकणी तांडा सरपंच शिवाजी जाधव, बाळू जाधव, वसंत जाधव, सतीश राठोड, दत्ता राठोड, दिनेश राठोड, श्रीमंत राठोड, महेश चव्हाण, अनिल राठोड, विलास सुरवसे, संजय चव्हाण, तुकाराम चव्हाण, देविदास राठोड, प्रभाकर चव्हाण, तुकाराम राठोड, पिंटू राठोड, ज्ञानदेव राठोड यांच्यासह बंजारा समाजाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### आदर्श प्राथमिक विद्यामंदिर शाळेत दहिहंडी उत्सव साजरा

**धाराशिव, दि.२८ ऑगस्ट -**

धाराशिव शहरातील आदर्श प्राथमिक विद्यामंदिर शाळेमध्ये गोकुळ अष्टमीनिमित्त विविध कार्यक्रम घेऊन दहीहंडी फोडण्यात आली. यावेळी गोकुळ अष्टमीनिमित्त विद्यार्थ्यांना मित्रत्वाबाबत श्रीकृष्ण, सुदामाची कथा, तसेच नेहमी सत्य वागावे असे विद्यार्थ्यांना शिकवण्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षीका स्नेहल केवटे, शिक्षीका स्वाती गायकवाड यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार सोनाली भोसले यांनी मानले. कार्यक्रमासाठी शाळेतील सर्व विद्यार्थी, पालक उपस्थित होते. कार्यक्रमानंतर सर्व विद्यार्थ्यांना शाळेतर्फे खाऊचे वाटप करण्यात आले.



### तांदुळवाडीत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी

**वाशी, दि.२८ ऑगस्ट -**

तांदळवाडी तालुका वाशी येथे साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती मोठ्या थाटात साजरी करण्यात आली यावेळी लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन जाणीव संघटनेचे जिल्हाध्यक्ष रामभाऊ लगाडे, श्रावण क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जगदीश गायकवाड यांनी सूत्रसंचालन व प्रस्ताविक केले. यानंतर लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावर जाणीव संघटनेचे जिल्हाध्यक्ष रामभाऊ लगाडे म्हणाले की अण्णाभाऊंनी अनेक साहित्य काव्य लघुकथा शायरी यातून प्रखर प्रबोधन केले. त्यांनी समाजाचे रूढी परंपरा यावर प्रहार केले. पृथ्वीही शेषाच्या मस्तकावर तरली नसून ती श्रमिकाच्या तळहातावर तरली आहे, असे विचार मांडले. यानंतर श्रावण क्षीरसागर यांनी मातंगाचा इतिहास व सध्या परिस्थिती यावर अमोल असे मार्गदर्शन केले. यानंतर नितीन गायकवाड यांची आरोग्य सेवक म्हणून लातूर येथे नियुक्ती झाली. यासाठी जयंती कमिटीच्या वतीने त्यांचा नागरिक सत्कार करण्यात आला. याप्रसंगी अध्यक्ष सचिन गायकवाड, उपाध्यक्ष ओमकार गायकवाड, सचिव किरण गायकवाड, खजिनदार अजय गायकवाड, सदस्य सुशिल बोराडे, विशाल गायकवाड, महेश गायकवाड किसन गायकवाड सुरज गायकवाड उपस्थित होते. यानंतर सायंकाळी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेची तांदळवाडीमध्ये वाजत गाजत भव्य मिरवणूक काढण्यात आली.



### मुरूम शहरात विश्वकर्मा संघटनेची स्थापना

**मुरूम, दि.२८ ऑगस्ट -**

उमरगा तालुक्यातील मुरूम शहरात दि.२७ रोजी हुबळी मठाचे मठादिपती राजशेखर शिवाचार्य, जिल्हाध्यक्ष परमेश्वर सुतार, जिल्हा उपाध्यक्ष धनराज पांचाळ, जिल्हा सचिव संदीप पांचाळ, मुरूम शाखा अध्यक्ष गोविंद महामुनी यांच्या प्रमूख उपस्थित विश्वकर्मा शाखेचे व नामफलकाचे उदघाटन सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी मुरूम शहर शाखा उपाध्यक्ष लक्ष्मण पांचाळ, सचिव परमेश्वर पांचाळ, प्रमुख मार्गदर्शक दिलीप पांचाळ, कार्यकारिणी सदस्य महादेव महामुनी, सदस्य मल्लिनाथ सुतार, विवेकानंद महामुनी, बाळू सुतार, संजय सुतार, अमोल पांचाळ, शिवा सुतार, मोहन सुतार आदीसह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### विलास राठोड यांचा सत्कार

**जळकोट, दि.२८ ऑगस्ट -**

येथून जवळच असलेल्या आलियाबाद ग्रा.पं.चे माजी सदस्य, भाजपाचे सरचिटणीस व विविध सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे विलास राठोड यांची जिल्हा अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील संत सेवालाल महाराज बंजारा, लमान तांडा सुधार समृद्धी योजनेच्या अशासकीय सदस्यपदी नियुक्ती झाल्याबद्दल जळकोट येथील श्री गणेश कृषि विज्ञान मंडळ व कृषि वाचनालय व समर्थ क्लासेस यांच्यावतीने सत्कार करण्यात आला. आलियाबाद येथील राठोड यांच्या निवासस्थानी झालेल्या कार्यक्रमात विलास राठोड यांचा मेघराज किलजे व रामशेट्टी पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी मनोज चव्हाण, व्यंकट पवार, श्रीमंत राठोड, सचिन राठोड, हरिदास राठोड, दिनेश राठोड आदि आलियाबाद तांड्यातील युवक, कार्यकर्ते उपस्थित होते.

## महाव्दार परिसरात वाहने आणण्यास मज्जाव तरीही वाहनांची गर्दी

**तुळजापूर, दि.२८ ऑगस्ट -**

श्री तुळजाभवानी मंदीर महाव्दार परिसरात वाहने आणण्यास मज्जाव असताना श्रावण मासातील मंगळवार दि.२७ रोजी भाविकांची प्रचंड गर्दी असताना ही या दिवशी दुपारी मोठ्या प्रमाणात येथे वाहने येवुन थांबल्याने भाविकांमध्ये या बाबतीत नाराजी व्यक्त केली जात होते.

देवीदारी व्हीआयपी व सर्वसामान्य गरीब भाविक असा भेदभाव का असा सवाल भाविकांमधुन केला जात आहे.श्री तुळजाभवानी मंदीर महाध्दार परिसरात वाहतुक कोंडी होवू नये, वाहने व्हीआयपीचे वाहने दिपक चौकातील व्हीआयपी वाहने लावण्यासाठी केलेल्या जागेत लावले जातात.

पोर्णिमा मंगळवार दिनी ही एका मोठ्या व्हिआयपीचे वाहने सकाळी मंदीर परिसारात सोडले जात असल्याची चर्चा आहे.

## विद्यार्थ्यांना सुविधा पुरविण्यासाठी प्रस्ताव सादर करा

### जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंम्बासे यांच्या पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालय प्रशासनाला सुचना

**धाराशिव, दि.२८ ऑगस्ट-**

पीएमश्री जवाहर नवोदय विद्यालयातील विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या सुविधा पुरविण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याच्या सुचना जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे यांनी पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालय प्रशासनाला २८ ऑगस्ट रोजी आयोजित विद्यालय सल्लागार समितीच्या बैठकीत दिल्या.यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष, शिक्षणाधिकारी सुधा साळूंके, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता, तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय प्राचार्य रविंद्र आडेकर, जवाहर नवोदय विद्यालयाचे प्राचार्य के.वाय.इंगळे, शिक्षणतज्ञ डॉ.सतिश कदम,शिक्षक एस.डी. खोब्रागडे, एस.एस.माने,पालक प्रतिनिधी डॉ.रामेश्वर यादव, कार्यालय अधीक्षक एम.पी.कुलकर्णी व ए.एन.बोडके यांची उपस्थिती होती.

यावेळी प्रास्ताविक करताना प्राचार्य श्री. इंगळे यांनी पीएम श्री जवाहर विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या विविध समस्याबाबतची माहिती दिली. यावेळी विविध विषयावर चर्चा करण्यात आली.

जिल्हाधिकारी डॉ.ओम्बासे यांनी नवोदय विद्यालय प्रशासनाला निर्देश देऊन विद्यालयाने मांडलेल्या विविध समस्यांच्या बाबतीत जिल्हा प्रशासनास प्रस्ताव सादर करण्यात यावा.विद्यालयातील विद्यार्थ्यांना कंप्युटर उपलब्ध करुन देण्यासाठी नाविण्यपूर्ण योजनेतून निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.विद्यार्थ्यांना शुध्द व स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे यासाठी आर.ओ उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच विद्यार्थ्यांचे आरोग्य सुधारावे यासाठी ओपन जिमचाही प्रस्ताव क्रीडा विभागास सादर करुन त्यासाठी पाठपुरावा करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले. जवाहर नवोदय विद्यालय परिसरातील संरक्षण भिंतीची उंचीही वाढविण्याचे प्रस्तावित असून ते नगर परिषदेच्या माध्यमातून करण्याची प्रक्रिया सुरु आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने परिसरातील सर्व इमारतींचे स्ट्रकचरल ऑडीट करण्यात यावे याची मागणी जवाहर नवोदय विद्यालय प्रशासनाने जिल्हाधिकारी यांच्याकडे केली होती.त्यासही त्यांनी लवकरात लवकर करुन घेण्याच्या सुचना दिल्या.तसेच तुळजापूर येथील पीएम श्री जवाहर नवोदय येथून १० वी नंतर लातूर येथे पुढील शिक्षण घेण्यासाठी जातात. परंतू यापुढे विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासह विविध स्वरुपाचे कोचिंगची व्यवस्था करण्यात येणार आहे.त्यासाठी विद्यालयाने निधी देवून ऑनलाईन क्लाससारख्या सुविधा विद्यार्थ्यांना निर्माण करुन देण्याच्या सुचना यावेळी डॉ. ओंबासे यांनी केल्या.

**पाणीटंचाईची समस्या सुटणार**

पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालय येथे दर उन्हाळयामध्ये विद्यार्थ्यांसह निवासी शिक्षकांना पाण्याची समस्या जाणवते. हा प्रश्नही सल्लागार समितीच्या बैठकीत चर्चेसाठी आला. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांनी विद्यालयास कायमस्वरुपी पाण्याची व्यवस्था करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगून तसे प्रस्ताव तयार करण्याच्या सुचनाही त्यांना दिल्या.

**मुलांनाही मिळणार वॉटर हिटरचे पाणी**

पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालय येथे यापूर्वी केवळ मुलींच्या वस्तीगृहासाठीच सोलर वॉटर हिटर बसविण्यात आले होते.परंतू सल्लागार समितीच्या बैठकीत पालक प्रतिनिधींनी मुले हे थंड पाण्याने आंघोळ करतात,त्यांना आंघोळीसाठी वॉटर हिटर बसविण्याची मागणी केली.यासाठी निधीची तरतूद करुन देण्यात येईल.त्यासाठीही प्रस्ताव सादर करण्याच्या सुचनाही जिल्हाधिकारी डॉ.ओम्बासे यांनी यावेळी दिल्या.

## कराटे स्पर्धेत तामलवाडी, सुरतगाव येथील विद्यार्थ्यांचे घवघवीत यश



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ ऑगस्ट-**

छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या पहिल्या ओपन इंटरनॅशनल शोतोकान कराटे स्पर्धेमध्ये तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी, सुरतगाव येथील विद्यार्थ्यांनी दि.२५ ऑगस्ट रोजी घवघवीत यश प्राप्त केले.

छत्रपती संभाजीनगर येथे ओपन इंटरनॅशनल कराटे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेमध्ये धाराशिव जिल्ह्यातील १३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. यामध्ये काता व कुमिते या प्रकारात विहान रोडे याने १ गोल्ड व १ ब्राँझ पदक, अमनकुमर बिंद १ गोल्ड व १ ब्राँझ पदक, अर्पिता गुंड २ सिल्व्हर, विहान रोडे १ सिल्व्हर व १ ब्राँझ पदक, स्वरूप बनसोडे १ सिल्व्हर व १ ब्राँझ पदक, आर्या गवळी २ ब्राँझ पदक, राजश्री गुंड २ ब्राँझ पदक, गौरवी गुंड २ ब्राँझ पदक, ज्ञानेश्वरी डोके २ ब्राँझ पदक, नोमन शेख १ व सिल्वर १ ब्राँझ, संगीता कुंभार ३ ब्राँझ, ओंकार कुंभार २ ब्रॉन्झ व वैष्णवी कुंभार २ सिल्व्हर या खेळाडूंनी वरील पदकांची कमाई केली असून जिल्ह्याच्या शिरपेचात कराटेरुपी तुरा रोवून जिल्ह्याची मान उंचावली आहे.

या विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक दिनकर रोकडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

## महादेव मंदिरात शिवलिंग प्राणप्रतिष्ठापणा कलशारोहन सोहळा उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**मुरुम, दि.२८ ऑगस्ट-**

उमरगा तालुक्यातील मुरूम येथोल महादेव नगर येथे दि.२८ रोजी श्रीमहादेव मंदिरामध्ये शिवलिंग प्राणप्रतिष्ठापणा व कळशारोहन सोहळा संपन्न होणार झाला. नारळ मठ मठादिपती श्री.म.नि.प्र.जय मल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामी यांच्या शुभहस्ते व नंदगाव मठाचे मठादिपती श्री.म.नि. प्र. राजशेखर महास्वामी, जेवळी मठाचे मठादिपती श्री.म.नि. प्र. गंगाधर महास्वामी यांच्या आशीर्वाचंनाने व चरमूर्ती मठाचे मठादिपती श्री.म.नि. प्र.सिद्धमल महास्वामी, केसरजवळगा मठाचे मठादिपती

श्री.म.नि.प्र.विरंतेश्वर महास्वामी,उस्तुरी मठाचे मठादिपती श्री.म.नि. प्र. कोरनेश्वर महास्वामी यांच्या दिव्य सानिध्यात आणि डिसीसी बँकेचे चेअरमन तथा काशी, उजैन,श्रीशैल पिठाचे संचालक बापूराव पाटील, पंचायत समिती उमरगा माजी सभापती



ॲड. राजासाहेब पाटील, युवानेते प्रशांत पाटील, पंचायत समिती उमरगा माजी सभापती मदन पाटील, माजी सरपंच कंटेकुर गोविंद पाटील, मुरूम नगर परिषद माजी उपनगराध्यक्ष श्रीकांत बेंडकाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत दि.२८ ऑगस्ट वार बुधवार रोजी सकाळी ११ वाजता महादेव नगर येथील महादेव मंदिरात शिवलिंग प्राणप्रतिष्ठापणा व कळसारोहन सोहळा व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी शिवलिंगचे विधिवत पूजन, कळसाचे महादेव नगर येथे महिला भगिनींनी डोक्यावर कळस घेऊन वाजत-गाजत प्रदक्षिणा संपन्न झाला. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शिवलिंग प्राणप्रतिष्ठापणा व कळसारोहन सोहळा असंख्य भाविक भक्तांच्या उपस्थितीत भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. याप्रसंगी राजशेखर महास्वामी, गंगाधर महास्वामी, कोरनेश्वर महास्वामी,सिद्धमल महास्वामी आदींचा आशीर्वाचन कार्यक्रम पार पडला याप्रसंगी शहरातील असंख्य भाविक भक्तांची उपस्थिती होती. मंदिर समितीच्या वतीने शंकर गणेश मंडळ पदाधिकारी, शिवा दुर्गे, सागर खुणे, अविनाश च्यारे, सचिन फनेपुरे, अशोक अंतरेड्डी, राजकुमार लामजाने, गुरुशांत स्वामी, गणेश गुरव, सुशील बोंडवे, बंडू बेळ्ळे, मल्लिनाथ बेळ्ळे, बसवराज पनाळे, बबलू तोडकरी, बाळू विभूते, प्रकाश फनेपुरे, प्रशांत स्वामी, राहुल सर्राट्टे, सागर धुमुरे, प्रकाश भोसले, आकाश च्यारे, ओम भोसले, विकास च्यारे, प्रवीण पंडित, दुधाराम जाधव, राचप्पा दुर्गे, गौरी सरसंबे, ओमकार ओंबतटक्के, राहुल जमादार, महांतेश दुर्गे आदींनी सोहळा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी परिश्रम घेतला. सूत्रसंचालन, प्रास्ताविक आभार धनराज हळ्ळे यांनी मानले.

---

**उस्मानाबाद येथील ५वे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**
**वारसाचे प्रमाणपत्राबद्दल जाहीरनामा**

**सीएनआर-एमएचओएस०२-००१७०२०२४**
**किरकोळ अर्ज क्रं. ५९६/२०२४**
**निशाण क्रमांक-६** **पारुबाई/निरंक**

ज्यापेक्षा मयत कै.देविदास सोमा राठोड, रा.तावरजखेडा, ता.जि.उस्मानाबाद हे दिनांक ११/०९/२०११ रोजी किंवा त्यासुमारास तावरजखेडा, ता.जि.उस्मानाबाद येथे मयत झाले असून अर्जदार १. पारुबाई देविदास राठोड, २. भारत देविदास राठोड (मयत), २/१. उषाबाई भारत राठोड, २/२. अजय भारत राठोड, २/३ विजय भारत राठोड, ३. मोहन देविदास राठोड (मयत), ३/१. ताईबाई मोहन राठोड, ३/२. सोमनाथ मोहन राठोड, ३/४. कृष्णा मोहन राठोड, ४. कलावती मधुकर चव्हाण, ५. शांताबाई उत्तमराव चव्हाण, ६. कालींदा तुकाराम चव्हाण, ७. वाळुबाई संतराम चव्हाण, यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत कै.देविदास सोमा राठोड यांच्या नावचे वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा अर्जदारास सदरहू प्रमाणपत्र हे कै.देविदास सोमा राठोड यांचे मृत्यू पश्चात शासकीय व निमशासकीय कामासाठी अर्जदारांचे नावे वारसा हक्काने नांवे लावणेकामी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

सदरहू अर्जदार मयत कै.देविदास सोमा राठोड यांचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचे हक्क शाबीत दिसल्यास त्याचा सदरहू मयत कै. देविदास सोमा राठोड चे वारसाचे प्रमाणपत्र देईल.

**दिनांक १९.०८.२०२४ रोजी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.**
**पुढील नेमलेली तारीख : २०/०९/२०२४**

स्वाक्षरित/-
(व्ही.के.बेग)
कनिष्ठ लिपिक

स्वाक्षरित/-
(एम.व्ही.सरडे)
सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, उस्मानाबाद

---

**जाहीर प्रकटन**

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसीलदार उमरगा यांचे कार्यालय**
**(दंडणीय विभाग)**

**जा.क्र.२०२४/दंडणीय/कावि-८१२** **दिनांक २०/०५/२०२४**

समस्त गावकरी मौजे. बलसुर ता.उमरगा जि.धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात अर्जदार कलिमाबी काशिम फकीर रा.बलसुर ता.उमरगा जि. धाराशिव यांनी जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत मागणी केली आहे.

जन्म झालेल्याचे नावः कलिमाबी काशिम फकीर

सदरील व्यक्तीचा मौजे. बलसुर ता. उमरगा जि. धाराशिव या ठिकाणी दि. ०७/०८/१९४१ या दिवशी जन्म झाला असून प्रमाणपत्र मिळणे संबंधी सदरील कार्यालयात दिनांक. ०४/०३/२०२४ रोजी अर्ज केला आहे.

वरील जन्म बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा. आक्षेप मुदतीनंतर च्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसीलदार**

---

**जाहीरनामा**
**उमरगा येथील श्रीमती एस.एच.राठी २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, उमरगा**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३५४/२०२४** **नि.क्रं**
**अजित हरिदास भोसले, वय-३२ वर्षे,रा.जकेकुरवाडी, ता.उमरगा,जि.उस्मानाबाद**

ज्यापेक्षा मयत कै. हरिदास यशवंत भोसले हे दिनांक १२/०९/२०२३ हे मृत्यू समयी ठिकाण रा. जकेकुरवाडी, ता. उमरगा, जि. उस्मानाबाद येथे मयत झाले असुन अर्जदार १. लक्ष्मीबाई हरिदास भोसले, वय-६३ वर्षे, २. प्रेमीला सचिन पाटील, वय-४० वर्षे, ३. अश्विनी विठ्ठल सुरवसे, वय-२९ वर्षे, ४. निकीता हरिदास भोसले, वय-२० वर्षे, हे वरील मयताचे वारस असल्याच्या नात्याने त्यांचे पश्चात शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यकता आहे म्हणुन वारसा प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार मयताचे वारसदार असल्याबाबत आक्षेप असल्यास या जाहीरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यांत येते की जर सदर मुदतीत कोणी योग्य त्या हरकती दाखल न केल्यास अर्जदाराच्या वारसा प्रमाणपत्र मिळाल्याच्या मागणीबददल पुरावा घेवुन त्याची कै. हरिदास यशवंत भोसले वारस असल्याबददलचे वारस प्रमाणपत्र हे न्यायालय वरील अर्जदारांना देईल.

**आज दिनांक २२/०८/२०२४ रोजी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.**
**पुढील तारीख ०३/१०/२०२४**

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक

स्वाक्षरित/-
सहा.अधिक्षक

२ रे सह दिवाणी न्यायालय, उमरगा

## संक्षिप्त वृत्त



### समर्थ विद्यालयात तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटन

**उदगीर, दि. २८ ऑगस्ट-**

तालुक्यातील एकुर्का रोड येथील समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात सोमवारी तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटक व अध्यक्ष म्हणून संस्थासचिव प्राचार्य प्रमोद चौधरी उपस्थित होते. तर प्रमुख पाहूणे म्हणून पर्यवेक्षक सिद्धार्थ बोडके, संस्थासदस्य प्रा. एम. व्ही.स्वामी, प्रा. बी. एस. बाबळसूरे, तालुका क्रीडा संचालक कोल्हे आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक प्रा. एम. व्ही. स्वामी यांनी केले. सूत्रसंचालन रसूल पठाण यांनी तर आभार अमर जाधव यांनी मानले.



### विश्वजीत गायकवाड फाउंडेशनतर्फे श्रावण सोमवारनिमित्त महाप्रसाद

**उदगीर, दि. २८ ऑगस्ट-**

श्रावण सोमवार निमित्त येथील किल्ल्यातील उदागीर महाराज मंदिरात इंजि. विश्वजीत अनिलकुमार गायकवाड फाउंडेशन मार्फत पहाटे अभिषेक करण्यात आला आणि दुपारी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. श्रावण महिन्यातील चौथा सोमवार दि. २६ रोजी येथील प्रसिद्ध अशा उदागीर महाराज मंदिर येथील महादेवाला इंजि. विश्वजीत अनिलकुमार गायकवाड फाउंडेशनचे अध्यक्ष विश्वजित गायकवाड यांच्या हस्ते अभिषेक आणि महाआरती करण्यात आली. दुपारी महाप्रसाद वाटप करण्यात आले. श्रावण सोमवार असल्याने भाविक भक्तांनी किल्ल्यातील मंदिरात भल्या पहाटेपासून गर्दी केलेली होती. पहाटे आरती वेळी उपस्थित भक्तासोबत विश्वजीत गायकवाड यांनी महाआरती केली. यावेळी आशिष गुरधाळे, अक्षर जेवरीकर, विशाल हाळीकर, जय सोनावणे, अनिल मस्के, गौरव हनवंते, आकाश धोत्रे, अमर देडे, यश शिंदे, ऋषी लांडगे, सूर्यभान कांबळे,माधव सूर्यवंशी, वैभव गुप्ता, विराट हलीकर, युवराज शिंदे,आदित्य मादळे, अल्केश वाघमारे, विलास भंडे, कुलदीप शिंदे, गोविंद कांबळे, संदेश गायकवाड यांच्यासह नागरिक उपस्थित होते

### वैशाली देशमुख यांची हनुमान विद्यालयास भेट

**लातूर, दि. २८ ऑगस्ट-**



विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशाली देशमुख, रीड लातूरच्या अध्यक्षा दीपशिखा देशमुख यांनी लातूर तालुक्यातील रमजानपूर आणि बोकनगाव येथील महिलांचा व बचत गटांच्या महिलांव्यानंतर लातूर तालुक्यातील बींदगीहाळ येथील हनुमान शिक्षण प्रसारक मंडळाच्या हनुमान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयास भेट दिली. यावेळी डॉ. सारिका देशमुख, शेषेराव पाटील, व्यंकटराव पाटील सी. बी. शेख, धनराज दाताळ, राजकुमार पाटील, संरपंच पुनम कांबळे, जयप्रकाश शिंदे, मुख्याध्यापक आर. आर. पाटील, लक्ष्मण शिंदे आदी उपस्थित होते. यावेळी संस्थेच्या वतीने राजकुमार पाटील, व्यंकटराव पाटील यांनी स्वागत केले या सस्थेंसाठी मुख्यमंत्री असताना विकासरत्न विलासराव देशमुख यांनी सहकार्य केले याचा संथेच्या सचिवांनी उल्लेख केला.



### धनेगावात शिवपार्वतीचा विवाह सोहळा

**वलांडी, दि. २८ ऑगस्ट-**

तालुक्यातील धनेगाव येथील महादेव मंदीरात रौप्यमहोत्सवी अखंड शिवनाम सप्ताह साजरा होत आहे.या सप्ताह दरम्यान शिवकथेचे आयोजन करण्यात आले आहे.या कथेच्या सहाव्या दिवशी शिव पार्वती विवाह सोहळा पार पडला.या सोहळ्यास भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिवकथाकार विरक्त मठ निलंग्याचे संगन बसव महाराज यांच्या सुमधूर वाणीतुन संगीतमय कथेने भाविक श्रवणाने तृप्त झाले.मांजरा नदीच्या तिरावर राष्ट्रसंत शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या तपोनुष्ठाने पावन झालेल्या भुमीत अखंड शिवनाम सप्ताहास २५ वर्ष झाले.त्यानिमित्ताने धनेगाव ग्रामस्थांच्यावतीने रौप्यमहोत्सवी वर्ष मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. बुधवारी सकाळी गावच्या मुख्य मार्गावरुन हळदी कार्यक्रमानंतर,गुगळ काढत भक्तीमय वातावरणात भाविक कथा स्थळी दाखल झाले. कथे दरम्यान शिव पार्वती विवाह सोहळा सद्गुरू च्या आशिर्वादाने भाविकांच्या उपस्थितीत पार पडला.यावेळी विवाह सोहळ्यात दाखल झालेल्या नागरिकांनी मांजरा काठ गजबजला होता.विवाहसोहळ्यानंतर महाप्रसादाने सांगता झाली. सप्ताहाची सांगता शुक्रवारी होणार असुन या धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सप्ताह कमिटीने केले आहे.

# रिक्त पदाचा प्रश्न मार्गी लावणार

## क्रीडा मंत्री संजय बनसोडे ; बाह्यरुग्ण इमारतीचे उद्घाटन



**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि. २८ ऑगस्ट-**

लातूर जिल्ह्याच्या नंतर आपले उदगीर शहर हे सर्वात मोठे असून उदगीर तालुक्यासह शहर व आजूबाजूच्या गावातील गोर - गरीब रुग्ण मोठ्या संख्येने या सामान्य रुग्णालयात उपचार घेण्यासाठी येत असतात आता विविध आजारावरील औषधासोबत सोनोग्राफी व एक्सरे सुविधा उपलब्ध असून

या सर्व सामान्य रुग्णांवर योग्य उपचार करून त्यांना आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करुन त्यांना उत्तम आरोग्याची सेवा द्या असे मत राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी व्यक्त केले. ते उदगीर शहरातील सामान्य रुग्णालयात नव्याने उभारण्यात आलेल्या बाह्यरुग्ण (ओपीडी) इमारतीच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

यावेळी माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, राहुल केंद्रे, बसवराज पाटील कौळखेडकर, रामराव बिरादार, रामचंद्र तिरुके, उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार राम बोरगावकर , प्रदीप ढेले, एम. एम पाटील, विकास जाधव, भरत चामले, समीर शेख, प्रवीण भोळे, बालाजी भोसले, शिवशंकर धुपे, श्याम डावळे, सय्यद जानीमियाँ, शशिकांत बनसोडे, सुधीर भोसले, मनोज पुदाले, प्रकाश राठोड, मधुमती कनशेट्टे, काजल मिरजगावे, रंजना चिघळे, ॲड. वर्षा कांबळे, वैशाली कांबळे, रमेश शेरीकर, बसवराज रोडगे, गिरीष उप्परबावडे, गणेश गायकवाड, मुकेश भालेराव, संघशक्ती बलांडे, प्रदीप जोंधळे, आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना ना. संजय बनसोडे यांनी सामान्य रूग्णालयात गेल्या अनेक वर्षापासुन रूग्णांना अडचण होत असल्याचे आपल्या निर्दशनास आल्याने २ कोटी रुपयाचा निधी उपलब्ध करुन देवून या बाह्य रूग्ण विभागाची इमारत बांधली आहे. आता यापुढे कुठलाही रुग्ण आरोग्य सेवेपासुन वंचित राहणार नाही. भविष्याय वैद्यकीय अधिकारी व कर्मचा-यांच्या कामाचा ताण लक्षात घेवुन या सामान्य रूग्णालयातील रिक्त पदे भरण्यासाठी आपण शासनाकडे पाठपुरावा करणार असुन मतदार संघतील रूग्णांना पहिल्या आमदार फंडातुन १२ रुग्णवाहिका उपलब्ध करुन दिल्या. या रुग्णवाहिकेचा लाभ अनेक गरजू रूग्णांना होत आहे. या इमारतीत असंसर्गजन्य रोग तपासणी विभाग, पुरुष वैद्यकीय विभाग व आयुष विभाग, स्त्री वैद्यकीय विभाग, शल्य चिकित्सा, कान - नाक - घसा विभाग, आदी विभाग रुग्णांच्या सेवेत सुरु करण्यात आले आहेत. या सामान्य रुग्णालयाच्या माध्यमातून ग्रामीण भागासह सर्व जनतेच्या आरोग्याची काळजी घेण्यात येणार आहे. मागील काळात आपण आपल्या मतदार संघातील नागरिकांना चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात म्हणून गुडसुर, घोणसी, मंगरूळ, कौळखेड येथे प्राथमिक आरोग्य केंद्र उभारले तर वाढवणा बु. येथे विशेष बाब म्हणून १५ कोटीचे ग्रामीण रूग्णालय उभारल्याने आता आपल्या भागातील रुग्णांच्या आरोग्याचा प्रश्न मिटणार आहे. भविष्यात उदगीर येथे मेडिकल कॉलेज उभारणार असल्याचा आपला माणस असल्याचे क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनी सांगितले. कार्यक्रमास सामान्य रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी, विविध पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व उदगीर शहर परिसरातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## काशीलिंगेश्वर नगर ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेला नागरिकांचा प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २८ ऑगस्ट-**

लातूर शहरालगतच्या काशीलिंगेश्वर नगर ग्रामपंचायतच्या वतीने सोमवारी सकाळी ग्रामपंचायत कार्यालयाच्या परिसरात नागरिकांच्या विविध प्रश्नावर व समस्यांचे निराकरण करण्यासाठी ग्रामसभा आयोजित करण्यात आली होती. ग्रामपंचायतचे प्रशासक निलेश सोमाणी व ग्रामसेवक शंकर भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या ग्रामसभेला नागरिकांनी उत्तम प्रतिसाद दिला.

ग्रामसभेत ग्रामसेवक शंकर भोसले यांनी ग्रामपंचायत प्रशासनाच्या वतीने आजपर्यंत झालेल्या कामांचा लेखाजोखा मांडून आढावा सादर केला. ग्रामसभेत उपस्थित नागरिकांनी मांडलेल्या विविध प्रश्नावर चर्चा होऊन काही ठराव सर्वानुमते पारित करण्यात आले. यामध्ये ग्रामपंचायत द्वारा नवीन अंगणवाडी मंजुरी साठीचा प्रस्ताव देणे, नवीन रेशन दुकानाच्या मागणीचा प्रस्ताव तहसीलदार यांना सादर करणे, १८ जुलै २०१६ शासन निर्णयाप्रमाणे ग्रामपंचायत हद्दीतील शिल्लक घरांच्या नोंदी घेणे यासह विविध ठराव एकमताने संमत करण्यात आले. ग्रामपंचायत द्वारा परिसरात अनेक कच्च्या रस्त्यांच्या मजबुतीकरणाची कामे पूर्ण केली असून ग्रामपंचायत कार्यालयासमोरील ओपन स्पेस विकसित करून नागरिकांसाठी वॉकिंग ट्रॅकची व्यवस्था केल्याने नागरिकांच्या वतीने ग्रामपंचायत प्रशासनाचे अभिनंदन करून प्रशासक निलेश सोमानी व ग्रामसेवक शंकर भोसले यांचा सत्कारही याप्रसंगी विजय धुमाळ यांनी केला. या ग्रामसभेला विजय धुमाळ, सुमित साळुंखे, अरविंद कापसे, प्रभाकर सूर्यवंशी, गोपाळ कदमापुरे, प्रशांत गणे, शुभम जाधव, रवि सुर्यवंशी, कपिल शिंदे, बाबू जाधव, मुरकुटे, ॲड. खंडागळे कावळे उपस्थित होते.

## लोकसभा निवडणुकित राष्ट्रीय सेवा योजनेने नवा पॅटर्न निर्माण केला : उपजिल्हाधिकारी आयरे

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २८ ऑगस्ट-**

लातूर शहराने उद्योग आणि शिक्षण क्षेत्रामध्ये आपल्या कार्यकुशलतेने नावलौकिक मिळविला आहे. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना +२ या विभागातील स्वयंसेवकांनी एक वेगळा पॅटर्न निर्माण केला, असे गौरव उद्गार उपजिल्हाधिकारी प्रियांका आयरे यांनी व्यक्त केले महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेद्वारा संचालित महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर द्वारा आयोजित राष्ट्रीय सेवा योजना +२ लोकसभा निवडणूक-२०२४ स्वयंसेवक प्रमाणपत्र वितरण व राष्ट्रीय सेवा योजना परिचय कार्यक्रमात त्या प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय सेवा योजना विभागीय समन्वयक प्रा. डॉ. संदिपान जगदाळे, जिल्हा समन्वयक प्रा. विजय गवळी, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्रा. भाग्यश्री पाटील, रूपाली देशमुख, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. रत्नाकर बेडगे, प्रा. डॉ. शिवप्रसाद डोंगरे इत्यादींची उपस्थिती होती. पुढे बोलताना प्रियांका आयरे म्हणाल्या की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांवर संस्कार घडविले जातात व राष्ट्रीय सेवा योजना ही माणूस बनवण्याचे काम करत असते. मी रासेयो मध्ये स्वयंसेवक असताना २७ दिवसाच्या कॅम्प मध्ये सहभागी होऊन काम केले आहे. याप्रसंगी विभागीय समन्वयक प्रा. डॉ. संदीप जगदाळे बोलताना म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विविध कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सणांचे आयोजन करण्यात यावे व या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व्हावे व त्यातून विद्यार्थी सक्षम घडावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या निमित्ताने बोलताना जिल्हा समन्वयक प्रा. विजय गवळी म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजनेचे ब्रीदवाक्य नॉट मी बट यु अशा पद्धतीचे आहे. या ब्रीद वाक्याप्रमाणे राष्ट्राची सेवा करण्यासाठी स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी सतत प्रयत्नशील असले पाहिजे. प्रास्ताविक डॉ. रत्नाकर बेडगे यानी केले तर अध्यक्षीय समारोप प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यानी केला. यावेळी प्रा. विश्वनाथ स्वामी, प्रा. रवींद्र सुरवसे, प्रा. देविदास वसावे, प्रा. शैलेश कानडे, प्रा. मीनाक्षी नीला, प्रा. वैशाली जयशेटे, प्रा. व्यंकट दुडिले, प्रा. दयानंद टेंकाळे, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे उपस्थित होते. त्यांना मान्यवराच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. सूत्रसंचालन प्रा. किसनाथ कुडके यांनी केले तर आभार प्रा. डॉ. शिवप्रसाद डोंगरे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बालाजी डावकरे, कृष्णा कोळी, संतोष येंचवाड, संगमेश्वर मुळे, शिवशंकर खुब्बा, गुरुप्रसाद बिराजदार यांनी प्रयत्न केले

## महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा संप पुढे ढकलला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

प्रलंबित मागण्यासाठी २९ ऑगस्टपासून महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी बेमुदत संपावर जाणार होते. परंतु सरकारी-निमसरकारी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीस मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या आश्वासनांतर हा संप पुढे ढकलण्यात आला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी संपावर न जाता कामावर जावे, असे आवाहन सोलापूर जिल्हा कॉलेज कर्मचारी युनियनचे अध्यक्ष दत्ता भोसले व सरचिटणीस राजेंद्र गिड्डे यांनी केले आहे.



## एक पेड माँ के नाम अभियानांतर्गत ४० वृक्षांची लागवड

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि. २८ ऑगस्ट-**

महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा येथे राष्ट्रिय छात्र सेना, राष्ट्रिय सेवा योजना व माजी विद्यार्थी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने एक पेड मां के नाम अभियानाअंतर्गत ४० वृक्षांची लागवड महाविद्यालय परिसरात करण्यात आली.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. एन. कोलपुके, तसेच प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी मा. सकलेश पिंपळे, वरिष्ठ न्यायाधीश, मालेगाव जि. नाशिक यांची विशेष उपस्थिती होती.

यावेळी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. डी. एस. चौधरी, वरिष्ठ प्राध्यापक डॉ. डी.एच.जाधव, डॉ. बी. एस. गायकवाड, एनएसएस कार्यक्रमाधिकारी डॉ. एस.जी. बेंजलवार, डॉ. व्ही. पी. सांडूर, एन. सी. सी. केअर टेकर ऑफिसर डॉ. एस. पी. बसूदे, प्रा. आर. एन. हिरेमठ, डॉ. डी. ओ. बिरादार, प्रा. श्रीनिवास काकडे, शेख मामा तसेच एनएसएस आणि एनसीसी मधील विद्यार्थी उपस्थित होते.

# जिल्ह्यात शस्त्रबंदी, जमावबंदी आदेश जारी

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २८ ऑगस्ट-**

कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत २८ ऑगस्ट रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते ११ सप्टेंबर, रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील.

शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगता येणार नाही, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे बाळगणे किंवा जमा करणे किंवा तयार करण्यास मनाई राहील. व्यक्तीचे प्रेत, आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. तसेच जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणजे वाद्य वाजविण्यास मनाई राहील. ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहोचेल अशा किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे, हावभाव करणे, सोंग आणणे, चित्रे, चिन्हे फलक किंवा इतर कोणत्याही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन किंवा प्रसार करणे यास मनाई करण्यात आली आहे. जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राहण्यासाठी कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास, मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अंत्ययात्रा, विवाह, कामावरील पोलीस किंवा इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही. तसेच शस्त्रबंदी व जमावबंदी काळात सभा, धार्मिक मिरवणूक, मोर्चा, उपोषण यांना परवानगी देण्याचे सर्व अधिकार हे पोलीस अधीक्षक, पोलीस उपअधीक्षक व संबंधित पोलीस निरिक्षक, पोलीस उपनिरीक्षक यांना राहतील. त्यांनी परवानगी देण्यापूर्वी उपविभागीय दंडाधिकारी यांच्याशी सल्लामसलत करून परवानगी द्यावी.

# आमदार देशमुखांमुळे लातूर ग्रामीणचा चौफेर विकास

## विलास कारखान्याचे चेअरमन वैशाली देशमुख

### रमजानपूर, बोकनगावामध्ये बचतगटांचा मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २८ ऑगस्ट-**

विलासरत्न वलासराव देशमुख यांच्या प्रेरणेने लातूर ग्रामीणचे लोकप्रिय आमदार धीरज देशमुख यांनी गेल्या पाच वर्षांत लातूर ग्रामीणच्या विकासासाठी कोट्यावधी रुपयांचा निधी आणला आहे. या निधीतून रस्ते, आरोग्य सुविधा मोठ्या प्रमाणात निर्माण करता आले आहेत. आपल्या सर्वांच्या आशीर्वादाने आपले आमदार धीरज देशमुख यांना लातूर ग्रामीणचा विकास केला आहे, असे प्रतिपादन विलास सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन वैशाली देशमुख यांनी केले.

लातूर तालुक्यातील रमजानपुर व बोकनगाव येथे दि.२७ ऑगस्ट रोजी महिला बचत गटांचा मेळावा घेण्यात आला. त्याप्रसंगी बचत गटांच्या महिलांना संवाद साधताना श्रीमती वैशालीताई देशमुख बोलत होत्या. यावेळी रीड लातूरच्या अध्यक्षा दीपशिखा देशमुख यांच्यासह डॉ. सारिका देशमुख, सुनिता अरळीकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

लातूर तालुक्यातील रमजानपूर येथे हनुमान मंदीर सभागृहात बचत गटांच्या महिलांची बैठक झाली. यावेळी झालेल्या बैठकीत बोलतांना श्रीमती वैशालीताई विलासराव देशमूख म्हणाल्या, ग्रामीण भागातील मुलं इंग्रजी भाषा अभ्यासासाठी घाबरतात. इंग्रजी ही ज्ञान भाषा आहे. ती ग्रामीण भागातील शेतकजयांच्या मूलांना आली पाहीजे.यासाठी पहिलीपासून इंग्रजी भाषा शिकवली पाहिजे, असा निण्य विकासरत्न विलासराव देशमूख मुख्यमंत्री असताना त्यांनी घेतला होता. या अनुषंगाने त्यावेळी इंग्रजी विषय हा पहिली पासून सुरु झाला आहे. आज रीड लातूच्या माध्यमातून दीपशीखा देशमूख ग्रामीण भागातील मुलांना पुस्तके देऊन मदत करीत आहेत.



विकसरत्न विलासराव देशमूख यांनी या भागाचा आणि या भागातील लोकांच्या विकासात योगदान दिले आहे. आज माजी मंत्री दिलीपराव देशमूख यांच्या मार्गदर्शनांने माजी मंत्री आमदार अमित देशमूख व आमदार धीरज देशमूख हेच काम पुढे घेऊन जात आहेत. बैठकीच्या माध्यमातून आपल्याला भेटता याव व संवाद साधता आला पाहिजे यासाठी आलो आहोत, असेही त्या म्हणाल्या. सूत्रसंचालन विजयकुमार गुत्ते यांनी केले.

बोकनगाव येथील महादेव मंदिर सभागृहात बचत गटांच्या महिला मेळावा झाला. यावेळी श्रीमती वैशाली देशमुख यांनी महिलांशी संवाद साधला. लातूर ग्रामीणचे आमदार धीरज देशमुख हे लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन आहेत. त्यामुळे या बँकेच्या माध्यमातून महिलांकडून एक रुपयाही न घेता जिल्हा बँकेच्यामार्फत जवळपास २५ हजार महिलांना खाते काढून दिले आहे तसेच जिल्हा बँकेच्या माध्यमातून शेतकजयांना पाच लाखापर्यंत बिनव्याजी कर्जाची सुविधा उपलब्ध करुन दिले आहे या सर्व सुविधा राबवत लातूर ग्रामीणचे लोकप्रिय आमदार धीरज देशमुख यांनी ग्रामीण भागातील विकास कामाचा ध्यास घेतला आहे.त्यामुळे आपण तमाम मतदारांनी पुन्हा संधी देऊन धीरज देशमुख यांना सर्वाधिक मतांनी निवडून आणावे, असे आवाहन केले.

यावेळी रमजानपूर येथील महिला बचत गटांच्या मेळाव्यात इंदरबाई सोमवंशी, चित्रलेखा पावडे, मंगलबाई जेवळे, श्रीमती काळे आदी महिलांची उपस्थिती होती.

बोकनगाव येथील महिला बचत गटांच्या मिळाव्यास गावच्या सरपंच सुरेखा स्वामी, उपसरपंच किशोर दाताळ, संचालक बंडू शिंदे, संचालक धनराज दाताळ, सचिन दाताळ, पंडित दाताळ, मुरलीधर दाताळ, गुरुलिंग स्वामी, कल्पना शिंदे, संध्या दाताळ, उषा स्वामी, प्रगती दाताळ, रुक्मिणी वाघमारे, रंजना गोरे, प्रेमलता दत्ता, चंद्रकला कांबळे, संगीता कांबळे, ताहिरा, अश्विनी दाताळ, पार्वती दाताळ, मीरा माने, राधिका दाताळ, सोजरवाई चव्हाण यांच्यासह महिला उपस्थित होते.

# लातूर दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले




## श्रावण सोमवारनिमित्त ५१ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि. २८ ऑगस्ट-**

उदगीरी किल्यात श्रावण सोमवारनिमित्त उदागिर बाबा मठसंस्थानच्यावतीने आयोजित रक्तदान शिबिरात ५१ जणांनी रक्तदान केले.

उदागीर बाबा मठ संस्थान समाधी किल्ला उदगीर येथे महारक्तदान शिबीराचे आयोजन करण्रात आले होते.या रक्तदान शिबिराचे उद्घाटन उदगीर शहर पोलिस स्टेशनचे पोलीस



निरीक्षक अभिषेक शिंदे यांच्या हस्ते उदागिर बाबा महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करुन करण्यात आले. मठसंस्थानच्यावतीने मठाधिश जयशगिर गुरु सतिषगिर महाराज यांचे हस्ते उपस्थितांचे स्वागत करण्यात आले. यावेळी किरण महाराज, तेजस महाराज गोस्वामी, सोनू महाराज गोसावी उपस्थित होते. शिबीर यशस्वी करण्यासाठी अमोल भवाळ, बालाजी पवार, संतोष रावनकोळो, विजयकुमार चिखले, संदीप उपरवाडे, श्रीधर सावळे, वेंकट भुये, राजू रत्नपारखे, सचिन कारामुंगे, रामकिसन नागरगोजे, अमोल लोकरे, आलोक नुत्ते आदींनी परिश्रम घेतले.

## संक्षिप्त वृत्त



### आ. अमित देशमुख यांच्या हस्ते श्री सिद्धेश्वरांची महाआरती

**लातूर, दि. २८ ऑगस्ट-**

श्रावणी सोमवार निमित्त माजी मंत्री आ.अमित देशमुख यांच्या हस्ते लातूरचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वरांची महाआरती करण्यात आली. लातूरचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वराच्या दर्शनासाठी श्रावण महिन्यात मोठी गर्दी होते. त्यातही सोमवारी हजारोंच्या संख्येने भक्त दर्शनासाठी येत असतात. देवालयाच्या वतीने दर सोमवारी श्री सिद्धेश्वरांची महाआरती केली जाते.श्रावणी सोमवारचे औचित्य साधून माजीमंत्री आ.अमित देशमुख यांच्या हस्ते सोमवारी (दि.२६) ही महाआरती संपन्न झाली. आ.देशमुख यांनी श्री. सिद्धेश्वरांचे दर्शन घेऊन आरती केली.लातूरकरांना सुखी ठेवण्याची प्रार्थना त्यांनी श्री सिद्धेश्वरांच्या चरणी केली. यावेळी विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष विक्रमतात्या गोजमगुंडे,सचिव अशोक भोसले, माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, देवस्थानचे प्रशासक सचिन जांबुतकर, विश्वस्त रमेशसिंह बिसेन, रविशंकर जाधव,गोरोबा लोखंडे,संजय निलेगांवकर यांच्यासह महाआरती समितीचे विशाल झांबरे, सचिन आलमले,आशिष साठे,राम गोरड, सुधीर भुतडा आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी भाविक-भक्त आणि नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



### दैठणा ग्रा.पंचायतर्फे ग्रामसभेचे आयोजन

**दैठणा, दि. २८ ऑगस्ट-**

दैठणा येथे ग्रामपंचायतकडून ग्रामसभा घेण्यात आली. या ग्रामपंचायतच्या सर्वसाधारण बैठकीत मागील वर्षाचा ग्राम विकास कामातील लेखाजोखा जनतेसमोर मांडण्यात आला. नवीन कामासाठी अनेक गोष्टी गावच्या गरजेनुसार स्वीकारण्यात आल्या अशाप्रकारे अनेक ठराव संमत करण्यात आले त्यापैकी सर्वात महत्त्वाचा ठराव म्हणजे तंटामुक्ती समितीचे पुनर्गठन करण्यात आले आणि मग गेल्या वर्षी निवड केलेले तंटामुक्तीचे अध्यक्ष रामेश्वर बिरादार यांची वर्षभरातील उत्कृष्ट कामगिरी पाहून त्यांनी केलेले कार्य त्यांच्याकडून गाव पातळीवर अनेक तंटे गावातच सोडवण्यात त्यांना आलेले यश त्यांच्या वर्षभरातील कामाचे मूल्यमापन दैठना येथील गावकऱ्याकडून असे करण्यात आले की त्यांना २०२४ मधील तंटामुक्तीचे अध्यक्ष म्हणून पुनश्च एकदा निवड करण्यात आले आणि यांना सहकार्य करण्यासाठी उपाध्यक्ष म्हणून धनंजय स्वामी यांची निवड करण्यात आली. बैठकीला गावातील मान्यवर विद्यमान सरपंच शेषराव कांबळे व तसेच आजी उपसरपंच योगीराज बिरादार व दैठणा येथील ग्राम पंचायतचे कर्मचारी ग्रामसेवक तोटे, अमोल बिरादार, परमेश्वर बिरादार, जिल्हा मध्यवर्तीचे संचालक व्यंकटराव बिरादार, एम.एस. बिरादार, सुखदेव पाटील, माजी सरपंच सदविवेक मिरकले, धनराज बिराजदार, निळकंठ बिरादार, रामेश्वर बिरादार, धनंजय स्वामी, प्रमोद सांगवे, रमेश पाटील, मधुकर बिरादार, गिरीधर शिवनखेडे, प्रकाश नमनगे, शहाजी कांबळे, रणजीत हुले, विलास पाटील, गणपत येडले, पांडुरंग पाटील, दयानंद चांबरगे, श्रीशैल बिरादार, अनंत सांगवे, चंद्रकांत दावणगावे उपस्थित होते.

### दैठणा ग्रामपंचायतकडून गावामध्ये तणनाशकाची फवारणी

**दैठणा, दि. २८ ऑगस्ट-**

ता.शिरूर आनंतपाळ येथील ग्रामपंचायतीच्या वतीने संपूर्ण गावात रिकाम्या जागेवर वाढलेली पावसाळ्यात वेगवेगळ्या जातींच्या गवतामुळे घाणीचे साम्राज्य वाढून रोग राई पसरु नये म्हणून सरपंच शेषेरावजी कांबळे उपसरपंच योगेश बिरादार यांच्या प्रयत्नातून तणनाशक फवारणी झालेली आहे.या फवारणीचा परिणाम म्हणून गावातील प्रमुख व गल्ली बोळातील रस्त्याच्या कडेला व रिकाम्या जागेवर विविध जातीचे गवत वाढल्याने डासांच्या प्रमाणात वाढ झालेली पाहून यामुळे रोगाचा प्रादुर्भाव वाढून रोगराई पसरु नये यासाठी ग्राम पंचायतीच्या वतीने संपूर्ण दैठणा गाव ग्रामपंचायत च्या कार्यक्षेत्रात गावांमध्ये तन नाशक औषधाची फवारणी करण्यात आली आहे. याकामाचे दैठणा ग्रामस्थांकडून कौतुक केले जात आहे. कारण आज सर्व दैठणा गाव प्रत्येक गल्ली प्रत्येक रस्ता प्रत्येक घरासमोरील परिसर वापरात नसलेले जागे या झालेल्या फवारणीमुळे अतिशय स्वच्छ दिसत आहेत.

# थेरगाव जिल्हा परिषद शाळेला ठोकले कुलूप

**तभा वृत्तसेवा,**
**शिरूर अनंतपाळ, दि. २८ ऑगस्ट-**

शिरूर अनंतपाळ तालुक्यातील मौजे थेरगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत प्रवेशीत विद्यार्थ्यांची संख्या साठ आहे. या शाळेत पहिली ते चौथी पर्यंतचे वर्ग आहेत परंतु या साठ विद्यार्थ्यांना अध्यापन करण्यासाठी दोन शिक्षकांची नेमणूक केली आहे एका शिक्षकांकडे मुख्याध्यापकपद व बीएलओ तसेच ऑफिसचे काम मिटींग, फोन संदेश या कामात व्यस्त असतात त्यांना त्या शाळाबाह्य कामामुळे मुलांना वर्गात जाऊन अध्यापन करण्यासाठी वेळ मिळत नसल्याने एका शिक्षीकेकडे संबंधित चार वर्ग एकत्रित करून मुलांना शांत बसविण्या पलीकडे काहीच करता येत नाही त्यासाठी आज दिनांक २७/८/२४ रोजी ग्रामसभा घेऊन शाळेच्या पालकांनी ग्रामसभेत हा प्रश्न मांडला पालकांच्या आग्रहास्तव थेरगावचे ग्रामसेवक के. एस. विभुते, सरपंच रेखा जाधव, उपसरपंच सुनील शिंदे, अविनाश शिंदे, बाळासाहेब चामले, शंकर सूर्यवंशी, उज्वला कांबळे, भारत सोनवणे, ज्ञानदेव भांगे, पालक उध्दव भांगे, गोवर्धन सुर्यवंशी, राजेंद्र सूर्यवंशी, विवेकानंद शिंदे,वाघंबर शिंदे, सोमनाथ पांचाळ,फुलबाज पांचाळ, संगीता कांबळे, कविता सोनवणे, सुरेखा सोनवणे ,छाया सोनवणे, राजेंद्र नरहांडे यांनी शाळेत जावून पाहणी करून ग्रामसेवक, सरपंच,उपसरपंच गावातील प्रतिष्ठित नागरिकांच्या उपस्थित शाळेला कुलूप ठोकले.

कुलूप लावण्याअगोदर मुख्याध्यापक मलवाडे यांनी गटशिक्षणाधिकारी, केंद्र प्रमुख, केंद्रीय मुख्याध्यापक यांना फोन केला परंतु कोणीही फोन उचलला नाही म्हणून पालकांच्या विनंतीस मान देऊन हा विषय ग्रामसभेत मांडल्यामुळे ग्रामपंचायतच्या ठरावानुसार शाळेला कुलूप ठोकण्यात आले. गावकऱ्यांनी व पालकांनी संबंधितांना चौकशी केली असता अशी परिस्थिती पंधरा जून म्हणजे शाळा चालू झाल्यापासून चालू आहे असे शिक्षकाने सांगितले या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत प्रवेशीत ९० टक्के गोरगरीब अर्थीक दृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थी आहेत सर्वच पालक दिवसभर रोजंदारीवर काम करतात व संध्याकाळी घरी आल्यावर आपल्या पाल्यांना शिक्षणाविषयी विचार पुस



> आमच्या मुलांचे भवितव्य धोक्यात येण्याची दाट शक्यता असल्याने मी स्वतः माझ्या लेकरांना शाळेत व्यवस्थीत शिक्षण मिळत नसल्याने खासगी क्लासेसला प्रवेश देवून त्या क्लासचा अर्थीक भुर्दंड सोसावा लागत आहे आमच्या चार मुलांच्या टीसी काढून बाहेरच्या शाळेत टाकणार आहे
>
> **- रविकिरण सूर्यवंशी,** पालक थेरगाव

> शासनाचे नियम शिक्षकांना शाळाबाह्य कामे लावायची असतील तर गोरगरीब लेकरांचे भवितव्य धोक्यात आहे. वरुन शासन म्हणतंय सरकारी शाळा टिकवा सरकारी नौकरदाराची लेकरं खाजगी शाळेत शिक्षण घेतात आणि गोरगरीब लोकांचीच या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत प्रवेशीत आहेत शासनाने शाळाबाह्य कामे शिक्षकांना लावू नये
>
> **- सुनील शिंदे, उपसरपंच**

> १५ जून पासून एका शिक्षीकेकडे चार वर्ग सांभाळायचे काम आहे मला शाळा बाह्य काम असल्याने मला वर्गावर जावून शिकवायला वेळच मिळत नाही याचा विचार शासनाने केला पाहिजे
>
> **- मलवाडे, मुख्याध्यापक**

करण्यासाठी वेळ मिळत नाही म्हणून या लहानग्या विद्यार्थ्यांचे भवितव्य शिक्षकांवर अवलंबून आहे परंतु शासनाचे अधिकारी वर्ग आमच्या गोरगरीब, अर्थीक दृष्ट्या दुर्बल घटकातील मुलांना शिक्षण घेवू देईल असे आम्हाला वाटत नाही असे पालक वर्गातून बोलले जात आहे फोन संदेश,मिटींग,बि.एल.ओ तसेच शाळेतील ऑफिस काम या पुर्ण कामासाठी एक शिक्षक दिवसभर गुंतलेला असतो मग एक शिक्षक चार वर्ग सांभाळायचे कशी काय करावे शिक्षक वर्गात मुलांना शिकवायला गेले तर तीन वर्गात गोंधळ होतो कोणत्या वर्गात जाऊन शिक्षण द्यावे गट शिक्षणाधिकारी पागे यांना विनंती करुनही याकडे दुर्लक्ष करत आहेत त्यामुळे थेरगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आमच्या पाल्याचे भवितव्य धोक्यात असल्याचे दिसून येत आहे म्हणून सर्व पालक आमची मुलं बाहेरगावी इतरत्र शाळेत पाठवण्याची तयारी करत आहोत अशी कुजबूज पालक वर्गातून ऐकायला मिळत आहे एक शिक्षक चार वर्ग सांभाळायचे कशी म्हणून पालक वर्गातून या शाळेबद्दल नाराजी व्यक्त केली जात आहे तसेच अशा प्रकारे लेखी तक्रार मा.गटविकास अधिकारी पागे पंचायत समिती शिरूर अनंतपाळ यांच्याकडे केली असल्याचे उपसरपंच सुनील शिंदे हे तरुण भारतशी बोलताना म्हणाले. जर दोन दिवसांत शिक्षक नाही मिळाला तर आमच्या लेकरांच्या टीसी आम्हाला देण्यात यावे असेही पालकांच्या तोंडुन ऐकण्यात आले.

## अटल फाऊंडेशनच्या प्रदेश मंत्रीपदी परळकर

**लातूर दि. २८ ऑगस्ट-**



अटल फाऊंडेशन, दिल्ली येथील संस्थेच्या राष्ट्रीय अध्यक्षा श्रीमती अपर्णा सिंह यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष गणेश राजे यांच्या सहीने समृध्द व्यापारचे संपादक दत्तात्रयपरळकर यांची निवड करण्यात आली आहे.

अटल फाऊंडेशन हे अटल अनाथाश्रम, अटल वृध्दाश्रम, अटल संस्कृतीची शाळा, अटल शेतकरी व्यवस्था, अटल हॉस्पिटल, अटल महिला सक्षमीकरण, अटल वृक्षारोपण, अटल शिक्षण, अटल सेवा, अटल स्वच्छ्ता मोहीम, अटल स्वावलंबन आशा एक ना अनेक मोहिमा राबवित असते. या फाऊंडेशनच्या राष्ट्रीय अध्यक्षा श्रीमती अपर्णा सिंह आहेत. फाऊंडेशनची स्थापना १९ सप्टेंबर २०१८ करण्यात आली आहे. तेंव्हा पासून आजतागायत सामाजिक काम करण्यात कसलीही तडजोड फाऊंडेशन करत नाही. राष्ट्रीय उपाध्यक्ष अमोल श्रीराम कुल्थिया, सुनील यादव आहेत, राष्ट्रीय महामंत्री रमेशभाई भुतडा, बबली त्यागी हे आहेत, राष्ट्रीय मंत्री जयवीर सिंह, कुलदीप शर्मा तर महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष गणेश राजे हे आहेत.

## सकल मराठा समाजाच्या वतीने सर्व पक्षाचे घातले श्राद्ध

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि. २८ ऑगस्ट-**

मराठा योद्धा मनोज जरांगे-पाटील यांच्या नेतृत्वाखाली मराठा समाजाला ओबीसी मधून आरक्षण मिळावे यासाठी महाराष्ट्रभर आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाला आज एक वर्ष पूर्ण होऊन ही अद्याप सरकारने हा प्रश्न मिटवला नाही. तसेच गांभीर्य नसलेल्या सरकारच्या निष्काळजीपणामुळे मालवण येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळ्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे असल्याने तो आठ महिन्यांतच कोसळला ही महाराष्ट्रासाठी अत्यंत लाजिरवाणी गोष्ट असल्याचे सांगत सकल मराठा समाजाच्या वतीने

निलंगा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सर्व



पक्षाच्या निषेधाचे फलक लावून श्राद्ध घालून निषेध करण्यात आले.

यावेळी मराठा समाजाच्या बांधवांनी शास्त्रशुद्ध पद्धतीने विधीवत वर्षश्राद्ध घातले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकातही भ्रष्टाचार करणाऱ्या या संवेदनहीन सरकारचाही जाहीर निषेध करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून उपविभागीय अधिकारी कार्यालयापर्यंत सकल मराठा बांधवांनी पदयात्रा काढून मनोज जरांगे-पाटील तुम आगे बढो हम तुम्हारे साथ हैं. असे घोषणाबाजी करत सर्व पक्षाचे निषेध करून मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण द्यावे, व मालवण येथील घटनेतील दोषींवर कारवाई करावी अशा मागणीचे निवेदन उपविभागीय अधिकारी, निलंगा यांना देण्यात आले. यावेळी अनेक मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## ऑर्थोपेडिक असोसिएशनच्या सीएमईला उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. २८ ऑगस्ट-**

संचेती हॉस्पिटल पुणे, महाराष्ट्र ऑर्थोपेडिक असोसिएशन व लातूर ऑर्थोपेडिक असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने लातुरात आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय सीएमईलाअस्थिरोग तज्ज्ञांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या सीएमईला ६५ ते ७० अस्थिरोग तज्ज्ञ डॉक्टर्सनी आपली उपस्थिती नोंदवली.

लातूरच्या कार्निव्हल रिसॉर्टमध्ये पार पडलेल्या या अस्थिरोग तज्ज्ञांसाठीच्या मणक्याच्या विकारावरील एक दिवसीय कार्यशाळेचे उदघाटन खा. डॉ. शिवाजी काळगे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी संचेती हॉस्पिटलचे डॉ.सिद्धार्थ अय्यर, डॉ. शैलेश हदगावकर, डॉ.अपूर्व शिंपी, लातूर ऑर्थोपेडिक असो.चे अध्यक्ष व या कार्यशाळेचे संयोजक डॉ. अशोक पोद्दार,



डॉ. संतोष माळी आदींची प्रमुख उपस्थिती होती.

मणक्याच्या विकारावरील या एकदिवसीय कार्यशाळेत केवळ आपल्या देशातच नव्हे तर जगभरात चाललेल्या वैद्यकीय तंत्रज्ञानातील बदलाविषयी तज्ज्ञांनी आपली मते व्यक्त केली. यावेळी कार्यशाळेस उपस्थित अस्थिरोग तज्ज्ञांना मणक्याच्या विकारावरील शस्त्रक्रियांचे थेट प्रक्षेपणही दाखविण्यात आले. यावेळी ज्येष्ठ ऑर्थोपेडिक सर्जन , महाराष्ट्र ऑर्थोपेडिक असोसिएशनचे संस्थापक तथा स्पाईन सोसायटीचे संस्थापक सदस्य डॉ. के. व्ही. चौबल यांचे नुकतेच निधन झाल्याने ऑर्थोपेडिक असो.च्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या कार्यशाळेस डॉ. द्वारकादास तापडिया, डॉ. गिरीश कोरे, डॉ. राजेंद्र मालू, डॉ. बलशेटवार, डॉ. लामतुरे, डॉ. हाके पाटील, डॉ. तुषार पिंपळे, डॉ. अक्षर भोसले, डॉ. डॉ. राजकुमार दाताळ , डॉ. काझी यांच्यासह अंबाजोगाई, उमरगा, उदगीर, अहमदपूर, कळंब आदी ठिकाणचे अस्थिरोग तज्ज्ञ उपस्थित होते.

# ४ सप्टेंबरला बुद्ध विहाराचे लोकार्पण

## क्रीडामंत्री संजय बनसोडे यांनी केली पूर्व तयारीची पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि. २८ ऑगस्ट**

उदगीर शहरात नव्याने उभारण्यात आलेल्या बुद्ध विहार व अन्य विकास कामांच्या लोकार्पण सोहळ्यासाठी महामहिम राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांना उदगीरचे आमदार तथा राज्याचे क्रीडामंत्री संजय बनसोडे यांनी काही दिवसांपूर्वीच दिल्ली येथे भेट घेवून निमंत्रण दिले होते. त्यानुसार येत्या ३० जुलै रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा उदगीर दौरा निश्चित झालेला होता मात्र पावसाअभावी सदर दौरा पुढे ढकलण्यात आला होता. त्या अनुषंगाने आता येत्या चार सप्टेंबर रोजी महामहिम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू हे उदगीरला बुध्द विहाराच्या लोकार्पण सोहळ्यासाठी येत आहेत. त्यांच्या या दौरा संबंधी प्रशासनाच्या वतीने तयारी करण्यात येत आहे त्या कामाची पाहणी राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी केली व प्रशानाला उर्वरीत तयारी संबंधी सूचना दिल्या.

उदगीरकरांच्यावतीने राष्ट्रपतींचे जोरदार स्वागत करण्यात येणार असल्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी सांगितले. यावेळी बुद्धवंदना होणार असून पूज्य भन्ते उपस्थित राहणार आहेत त्यानंतर महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या मैदानावर मान्यवरांच्या उपस्थितीत सभा व मार्गदर्शन होणार आहे. यासाठी महामहिम राष्ट्रपती द्रोपदी



मुर्मू यांचा खास वेळ असुन यावेळी राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय मंत्री रामदास आठवले, लातूरचे पालकमंत्री गिरीश महाजन व जिल्ह्यातील सर्व आमदार व सर्व लोकप्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनी दिलेले निमंत्रण राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी स्वीकारले असुन महामहिम राष्ट्रपतींचा प्राथमिक दौरा प्रशासनाकडे आलेला आहे. त्यानुसार ४ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या नांदेड विमानतळावर येणार आहेत. तेथून हेलिकॉप्टरद्वारे उदगिरात दाखल होणार आहेत. उदगीर शहरातील नव्याने उभारण्यात आलेल्या भव्य - दिव्य अशा बुद्ध विहाराचे लोकार्पण त्यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयावर त्यांची जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे. राष्ट्रपतींच्या दौऱ्यानिमित्त प्रशासनाकडून जय्यत तयारी सुरू करण्यात आली असून, या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी उदगिरात येऊन हेलीपॅड व अन्य तयारीच्या अनुषंगाने पाहणी केली होती. या अनुषगांने क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनी या पूर्व तयारीची काल पाहणी केली.

यावेळी उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार राम बोरगावकर, उपविभागीय पोलीस अधिकारी सोहेल शेख, गटविकास अधिकारी प्रवीण सुरडकर, नरेंद्र मेडेवार, एल.डी. देवकर, मुख्याधिकारी सुंदर बोंदर, रामचंद्र तिरूके, बाळासाहेब मरलापल्ले, नजीर हाशमी, आदी उपस्थित होते. उद्घाटन सोहळ्याला उदगीर व जळकोट तालुक्यातील सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन क्रीडामंत्री संजय बनसोडे यांनी केले आहे.




## विजय जीएनएम स्कूलच्या वतीने महिला अत्याचाराच्या निषेधार्थ कँडल मार्च

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. २८ ऑगस्ट-**

श्री दादासाहेब शिक्षण प्रसारक मंडळ लातूर द्वारा संचलित विजय जीएनएम नर्सिंग स्कुलच्या वतीने बांगलादेशातील महिलांवरील महिलांवरील झालेल्या अन्याय अत्याचार तसेच कोलकाता येथील महिला डॉक्टरवर झालेल्या बलात्कार व निर्घृण हत्येचा निषेधार्थ आक्रोश कँडल मार्च काढण्यात आला.

मंगळवारी सायंकाळी चार वाजता रवींद्रनाथ टागोर नगरपासून हा आक्रोश कँडल मार्च मिनी मार्केट मार्गे गांधी चौकात आला. गांधी चौकात नर्सिंग स्कुलच्या विद्यार्थी - विद्यार्थिनींनी 'चिडिया' चिडिया नावाचे पथनाट्य सादर करून देशात घडणाऱ्या महिलांवरील अत्याचाराचे प्रात्यक्षिक प्रस्तुत करून जनजागृती केली. देशात अशा घटना भविष्यात घडू नये, यासाठी कठोर कायदा व्हावा अशी मागणीही यावेळी करण्यात आली. त्याचप्रमाणे सिंधुदुर्ग मधील छत्रपती शिवरायांच्या पुतळा कोसळल्याच्या घटनेचाही संस्थेच्या वतीने तीव्र शब्दात निषेध करण्यात आला. याप्रसंगी संस्थेच्या अध्यक्षा अंजली शरदराव जाधव किणीकर, संस्थेचे सचिव शरद विजयकुमार जाधव किणीकर, कोषाध्यक्ष दिग्विजय शरदराव जाधव किणीकर, संस्था सदस्य सचिन पाटील, बसवराज बिराजदार, मकबूल वलांडीकर, माधवराव बिराजदार, शंकर गड्डे, तज्ज्ञ संचालक शमभाऊ चव्हाण, मनोज आडाणे, प्राचार्य सिद्धेश्वर नागरगोजे, मोहित भालेराव, विजय पाटील उपस्थित होते.